अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०१२ | किंमत १५ रुपये












## मराठी नवसाहित्याचे एक शिल्पकार

# व्यंकटेश माडगूळकर

## यांच्या ४१ पुस्तकांचा संच नव्या दिमाखदार स्वरूपात १८ मे रोजी प्रसिद्ध होणार

## आपल्या संवेदनशील लेखणीतून ग्रामीण जीवन रेखाटणाऱ्या

# व्यंकटेश माडगूळकर

## यांच्या साहित्यकृती

## आता नव्या स्वरूपात



सत्तांतर
माणदेशी माणसं
नागझिरा
वावटळ
करुणाष्टक
काळी आई
प्रवास एका लेखकाचा
ओझं
अशी माणसं:अशी
साहस
वाघाच्या मागावर
जंगलातील दिवस
पांढऱ्यावर काळे
गावाकडच्या गोष्टी
कोवळे दिवस
सीताराम एकनाथ
वारी
हस्ताचा पाऊस

जांभळाचे दिवस
ऊंबरठा
एक एकर
चित्रे आणि चरित्रे
परवचा
पारितोषिक
बाजार
चरित्ररंग
मंतरलेले बेट
पांढरी मेंढरे हिरवी कुरणे
पुढंचं पाऊल
सिंहाच्या देशात
मी आणि माझा बाप
सरवा
चित्रकथी
रानमेवा
गोष्टी घराकडील
जनावनातील रेखाटने

डोहातील सावल्या
वाळूचा किल्ला
सुमीता
वाटा
बेलवण
छोटा जवान

संपूर्ण संचाची किंमत
रु. ५१९५/-

सवलतीत रु. ३४९५/-
(पोस्टेज रु. १३५/-)

सवलत १४ मे २०१२ पर्यंत












# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक पाचवा


अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुरस्कार** | २८ |
| **पुस्तक परिचय** | ३४ |
| **व्यंकटेश माडगूळकर विशेष** | |
| कादंबरीलेखन | ६४ |
| करुणाष्टक | ६८ |
| खोली-लिहिण्यावाचण्याची | ७४ |
| माडगूळकरांचे कथाविश्व | ८० |
| **ओळख लेखकांची** | ८८ |
| **श्रद्धांजली** | १०० |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०२ |
| **बालनगरी** | १०४ |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**


***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***

संपादकीय

# पाठ्यपुस्तकातले राजकारण

कोणत्याही भाषेतील ग्रंथव्यवहारात पाठ्यपुस्तकांचा मोठा वाटा असतो.

पश्चिम बंगालमध्ये ज्योती बसू यांच्या नेतृत्वाखालील डाव्या पक्षांनी तीसावर वर्षे सत्ता चालवली. मार्क्सवादी विचारांची मोहिनी तेथील जनतेच्या मनावरून उतरवण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना दीर्घकाळ लढा देत आपली ताकद वाढवावी लागली. त्यांच्या या अविरत संघर्षाला बंगाली मतदारांनी अखेर मानाचा मुजरा केला आणि ममता बॅनर्जींना निर्विवाद नव्हे पण सरकार बनवण्याएवढे बहुमत मिळवून दिले. मार्क्सवादी पक्षाच्या तीस वर्षांच्या पकडीनंतर पश्चिम बंगालने पुन्हा मुक्तीचा अनुभव घेतला, असे काहींनी म्हटले. मार्क्सवादी कारकीर्दीत बंगालची आर्थिक, औद्योगिक पीछेहाट झाली. तेथील कामगार संघटनांच्या दहशतवादामुळे नवीन उद्योगधंदे येण्याची प्रक्रिया थांबली. पुढे ज्योती बसूंना आपली चूक उमगली. कारखानदारांची मनधरणी सुरू झाली. परंतु टाटासारख्यांनी नॅनो प्रकल्पाचा प्रस्ताव मांडला तेव्हा ममता बॅनर्जींनी तो हाणून पाडला. बंगालमध्ये येऊ पाहणारे उद्योगपती आणि परदेशी भांडवल थंडावले... मार्क्सवादी शासनाची आणि सत्तेची जी काही राजकीय आर्थिक चिरफाड आवश्यक आहे ती राजकीय आर्थिक विश्लेषक करत राहतील. भारतात लोकशाही आहे. मतदारांच्या हाती मत देण्याचा अधिकार आहे. सत्तापालट होतच राहणार. संमिश्र सरकारांचीही मोडतोड आपल्या अंगवळणी पडत आहे.

ममता बॅनर्जींनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा स्वीकारल्यावर मार्क्सवादी राजवटीतील काही भयावह आणि विचित्र गोष्टी बाहेर येऊ

लागल्या आहेत; आणि भारतीय लोकशाहीची वेगवेगळ्या प्रकारे कशी पायमल्ली होऊ शकते हे आता बाहेर येऊ लागले आहे.

त्यातलीच एक बाब म्हणजे पश्चिम बंगाल मधील पाठ्यपुस्तकांचे मार्क्सवादीकरण. गेल्या ३० वर्षात बंगाली विद्यार्थ्यांना लेनिन, रशियन क्रांती, कार्ल मार्क्स, चीनची क्रांती, साम्यवादाचा इतिहास, मार्क्सवादी लेखकांचे आणि नेत्यांचे साहित्य अभ्यासावे लागत आहे. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ, महात्मा गांधी-सुभाषचंद्र बोस-नेहरू-पटेल - बेचाळीसचे चलेजाव आंदोलन, स्वातंत्र्योत्तर लोकशाही, निवडणुका वगैरे विषयांना मार्क्सवादी पाठ्यपुस्तकांमध्ये स्थानच नाही.

इतिहासाचे हे एकांगी, पक्षपाती सादरीकरण पाठ्यपुस्तकांद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासावे लागत असल्याने कम्युनिझम हीच एकमेव आदर्श राज्यपद्धती आहे असे त्यांच्या मनावर बिंबवले जाते. भारतात लोकशाही आहे; बहुपक्षीय लोकशाही राज्यप्रणालीत नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क आहे; एकाच एका पक्षाची अधिकारशाही येथे अभिप्रेत नाही. याचे खरे तर धडे देण्याची गरज आहे. पण मार्क्सवादी कम्युनिस्टांनी पाठ्यपुस्तकांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या नावाने साम्यवादीकरण करून विद्यार्थ्यांचा बुद्धिभेद चालवला. हे सर्व जनतेपुढे यायला हवे होते. ममता बॅनर्जी सत्तेवर येईपर्यंत थांबण्याची गरज नव्हती. परंतु बेटर लेट दॅन नेव्हर या न्यायाने या प्रश्नाकडे लक्ष वेधले जात आहे ही लक्षणीय गोष्ट आहे.

ममता बॅनर्जी यांनी सत्तेवर आल्याबरोबर शालेय इतिहास अभ्यासक्रम परिवर्तन समितीची स्थापना करून पाठ्यपुस्तकातील एकांगी इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची घोषणा केली. बंगालच्या जनतेने या घोषणेचे स्वागत केले. कम्युनिस्ट राजवटीत सरकार विरुद्ध ब्र काढणेही अशक्यप्राय होते. प्रतिगामी म्हणून लगेच मुस्कटदाबी केली जात असे. गेल्या दोनतीन पिढ्यांतील विद्यार्थ्यांना गांधी, सुभाष वगैरे राष्ट्रनेते होते हेच सांगण्यात आले नव्हते. 'महानायक'साठी संदर्भ साहित्य गोळा करण्यासाठी विश्वास पाटील कलकत्त्याला गेले होते. नेताजी स्मारकाला त्यांनी भेट दिली. त्यावेळी सुभाषचंद्रांचे पुतणे शिशिरकुमार बोस यांनी सांगितले, "ज्योती बसू किंवा अन्य कोणी मार्क्सवादी मंत्री या स्मारकाला भेट देण्यासाठी आजवर एकदाही आलेले नाहीत. त्यांनी या स्मारकाला एक रुपयाचीही मदत केली नाही. कम्युनिस्ट हे सुभाषबाबूंना नेता वा

क्रांतिकारक समजत नाहीत. सुभाषबाबूंचे नाव कधी घेत नाहीत. लेनिनचे, मार्क्सचे नावच उठताबसता ते घेत असतात.'' या स्मारकाला केंद्रिय मंत्री असताना शरद पवार यांनी आपणहून भेट दिली होती आणि भरघोस मदतही केली होती, हेही त्यांनी आवर्जून संगितले. सुभाषबाबूंवर कम्युनिस्ट राजवटीत फारसे लेखन बंगालमध्ये झाले नाही, होऊ शकले नाही, याचे मग आश्चर्य वाटत नाही. बंगाली लेखक सुनील गंगोपाध्याय यांनी विश्वास पाटील यांच्या 'महानायक'चा गौरव करून म्हटले होते, सुभाषबाबूंवर या तोडीची एकही बंगाली कादंबरी नाही.

हे उदाहरण पाठ्यपुस्तकांच्या राष्ट्रीयीकरणानंतरच्या प्रक्रियेचे व्यापक स्वरूप लक्षात आणून देण्यास पुरेसे आहे. कम्युनिस्टांना लेनिन ग्रेट वाटतो; महात्मा गांधी नाही. मार्क्स - एंजल्स मोठे वाटतात. नेल्सन मंडेला नाही. तेथील इतिहासाच्या पुस्तकात रशियन आणि चिनी क्रांतीवर धडे आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, चिपको आंदोलन, हरित क्रांती, लोकशाही आंदोलने, आणीबाणीचे दिवस, बांगला देश निर्मिती वगैरे विषय वर्ज्य वाटतात.

ममता बॅनर्जी यांनी इतिहास विषयक पाठ्यपुस्तके सुधारणा समिती नेमून शिक्षणक्षेत्रातील पक्षपातीपणा आणि सत्यापलाप, एकांगीपणा दूर करण्यासाठी टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे. ममता बॅनर्जी यांनी एक व्यंगचित्र इ-मेल वर काढल्याबद्दल प्रा. अंबिकेश महापात्रा (जादवपूर विद्यापीठ) यांना तुरुंगात टाकले अशीही बातमी आली आहे. ममताजींचा एककल्लीपणा विलक्षण आहे. त्यांनी मार्क्सवाद्यांच्या पाठ्यपुस्तकीय एकांगीपणा विरुद्ध सुरू केलेला उपक्रम चांगला आहे. परंतु त्यांनीही विरोधकांची मुस्कटदाबी करणे टाळावे असे वाटते.

यासाठी पाठ्यपुस्तके ही सरकारच्या नियंत्रणाखाली असू नयेत असे आम्हाला वाटते. 'बालभारती'ची एकाधिकारशाहीही इष्ट नाही. ज्ञान हे मुक्तच असले पाहिजे. विद्यार्थी-शिक्षकांना निवडीला वाव हवा अशीच आमची भूमिका आहे. लोकशाहीची ती एक गरज आहे. प्रयोगशील, नि:पक्षपाती, अभिनिवेशी एकांगीपणारहित, ज्ञानलालसा जागवणारी आणि समतोल पाठ्यपुस्तके ऐहिक जीवनाला पायाभूत ठरतात.

❐

# सस्नेह निमंत्रण

आपल्या संवेदनशील लेखणीतून ग्रामीण जीवन रेखाटणाऱ्या

# व्यंकटेश माडगूळकर

यांच्या साहित्यकृती आता नव्या स्वरूपात,
या ४१ पुस्तकांचा प्रकाशन समारंभ
**श्री. द. मा. मिरासदार** यांच्या हस्ते संपन्न होत आहे.
तरी आपण या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे ही विनंती!

प्रमुख पाहुणे
**श्री. द. मा. मिरासदार** (ज्येष्ठ साहित्यिक)
अध्यक्ष
**श्री. राजन गवस** (साहित्यिक)

स्थळ : बाल शिक्षण 'इंग्लिश मिडियम' हॉल
मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे - ३८

दिनांक : शुक्रवार दि. १८ मे, २०१२
वेळ : सायंकाळी ६.०० वा.

प्रेषक
श्रीमती ज्ञानदा नाईक श्री. अनिल मेहता श्री. सुनील मेहता
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

संपूर्ण संचाची किंमत ५१९५/-
पुस्तक प्रकाशनाच्या दिवशी संपूर्ण संचाची किंमत ३७९५/-




*** टोरांटो येथे विश्व साहित्य संमेलन**

सॅनहोजे, दुबई, सिंगापूर विश्व संमेलनांनंतर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने विश्व साहित्य संमेलनासाठीच्या स्वतंत्र नियमावलीवर नुकतेच शिक्कामोर्तब केले. घटनेत केलेल्या नव्या दुरुस्तीनुसार येत्या ऑगस्टमध्ये कॅनडातील टोरांटो येथे चौथे विश्व मराठी साहित्य संमेलन होईल.

'महामंडळाने विश्व साहित्य संमेलनाच्या नियमावलीचे प्रारूप तयार केले. महामंडळाच्या चारही घटक संस्थांकडून त्यावर हरकती सूचना मागविण्यात आल्या. यावर विचार करून नियमावली निश्चित करण्यात आली', अशी माहिती महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी बडोदा येथे दिली. महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघ या महामंडळाच्या घटक संस्थांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी या समितीवर असतील. तसेच, महामंडळाचे अध्यक्ष समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील.

*** नारायणमूर्ती 'फॉर्च्युन'र**

इन्फोसिसचे सहसंस्थापक एन. आर. नारायणमूर्ती यांच्यासह अन्य अकरा जणांचा 'फॉर्च्युन मॅगझिन'ने जगभरातील सर्वोत्तम व्यावसायिकांमध्ये समावेश केला आहे. या यादीत ॲपलचे दिवंगत सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्ज, मायक्रोसॉफ्टचे बिल गेट्स आणि फेसबुकचे सीईओ मार्क झुकेरबर्ग आदींचाही समावेश आहे.

या यादीत अर्थातच स्टीव्ह जॉब्ज अव्वल स्थानी असून, 'एका पिढीतील सर्वोत्कृष्ट आणि द्रष्टा व्यावसायिक' असे त्याच्या कर्तृत्वाचे वर्णन करण्यात आले आहे. बिल गेट्स यांना दुसरे स्थान देण्यात आले असून, व्यवसायाचा चेहरामोहरा बदलून टाकणारा व्यावसायिक असे त्यांचे वर्णन करण्यात आले आहे. 'द आउटसोर्सर' या शब्दांत गौरव करण्यात आलेले नारायण मूर्ती दहाव्या स्थानावर असून, 'सॉफ्टवेअर

उद्योगात क्रांती करीत भारताला जगात आदराचे स्थान मिळवून देणारे' अशा शब्दांत 'फॉर्च्युन'ने त्यांचा गौरव केलला आहे. 'इन्फोसिस'ची स्थापना करणारे मूर्ती हे द्रष्टे संस्थापक असून, उद्योगाच्या माध्यमातून भारताच्या अर्थव्यवस्थेत किमया घडविण्याचे कार्य त्यांनी केले आहे.' असेही मासिकाने म्हटले आहे.

*** भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. कोत्तापल्ले**

राज्य सरकारच्या मराठी भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कारकीर्दीत जुलै २०१० मध्ये मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली होती. मराठीच्या उत्कर्षासाठी सरकारने कोणती पावले उचलायला हवीत, यासाठी न्या. चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा सल्लागार समितीची नियुक्तीही करण्यात आली. मात्र, घोषणा आणि कागदी आदेश यापुढे विभाग आणि समितीचे कामकाज होऊ शकले नाही. सरकारी अनास्थेवर बोट ठेवत न्या. चपळगावकर यांनी राजीनामा दिला.

मराठीचे प्राध्यापक म्हणून डॉ. कोत्तापल्ले यांच्याकडे प्रदीर्घ अनुभव आहे. बीडच्या बंकटस्वामी कॉलेजमध्ये मराठी विभागप्रमुख म्हणून काम केल्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणूनही काम पाहिले. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली.

*** नव्या पिढीसाठी 'मधुशाला'?**

हिंदी साहित्यात स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवणारे प्रख्यात लेखक हरिवंशराय बच्चन यांची 'मधुशाला' ही कलाकृती नव्या पिढीसमोर आणण्यासाठी त्यांचे पुत्र अमिताभ बच्चन सध्या या काव्याचे स्वत:च्या आवाजात रेकॉर्डिंग करीत आहेत. मात्र जीवनाचे वास्तव समोर आणणारी ही मधुशाला आजच्या पिढीला कितपत भावेल, असा प्रश्न पडला आहे.

''मी जेव्हा स्टुडिओत रिकामा बसलेला असतो, तेव्हा मला वाटते की माझ्या पित्याचे शब्द आणि त्यांचे तत्त्वज्ञान कोण ऐकणार? त्याकडे व्यापारी दृष्टीने पाहिले, तर माझ्या मनाला शब्दातीत वेदना होतील. आजच्या तरुणांसाठी 'मधुशाला' संदर्भहीन असल्याचे बोलले जात आहे,'' अशी खंत बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉगवर व्यक्त केली आहे. ते म्हणतात, ''या काव्याचे सौंदर्य आहे तसेच ठेवून त्याबरोबर स्वत: एकटे जगा. त्यासाठी सगळ्यांनाच एकत्र आणण्याची अपेक्षा गैर आहे. या काव्याला वाईट पद्धतीने हाताळले, तर त्या दु:खातून बाहेर येणे फार कठीण आहे. त्यापेक्षा मी त्याबरोबर एकटा जगेन.''

दरम्यान अलीकडील संगीतावर तंत्रज्ञानाचे आक्रमण झाल्याची खंतही ते व्यक्त करतात. ''तंत्रज्ञानापूर्वीचे संगीत ऐकण्यासाठी, तारांचे आणि ढोलकचे मूळ आवाज ऐकण्याचा आनंद मिळवण्यासाठी आज आपली तगमग होते. सरोद, शहनाई, सारंगी, सतार... सारे आवाज आधुनिक आवाजात दबून गेले आहेत.''

*** जनरेशन गॅप भयावह**

''रोज येणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिकीकरण यामुळे समाजरचनेत झपाट्याने बदल होत आहे. त्यामुळे दोन पिढ्यांतील अंतर वाढत असून, आपल्या मुलांशी कशा प्रकारे संवाद साधायचा याबाबत पालकांची स्थिती गोंधळाची झाली आहे. कुटुंबामध्ये कमी होत चाललेले संभाषण, हेच अनेक प्रश्नांचे मूळ कारण आहे.'' असे मत प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांनी व्यक्त केले.

मुलांना नावीन्यपूर्ण प्रयोगातून शिक्षण देणाऱ्या कॅनडातील 'मॅड सायन्स' या संकल्पनेचे देशामध्ये लाँचिंग करण्यात आले. भगत यांनी 'जनरेशन नेक्स्ट' या विषयावर संवाद साधला. ते म्हणाले, ''नव-नवीन तंत्रज्ञान, त्यामुळे बदलणारी नीतिमूल्ये, वाढणाऱ्या गरजा यामुळे आपला समाज अस्थिर बनला आहे. अनेक नवनवीन गोष्टी तरुण पिढीकडून अंगीकारल्या जात आहेत. अनेकांच्या त्या पचनी पडत नाहीत. त्यामुळे दोन पिढ्यांतले अंतर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. समाजातील सर्व प्रश्न करिअर, प्रेमसंबंध, कुटुंब या बाबतच्या वेगवेगळ्या विचारांमुळे उद्भवत आहेत. पैसे कमविण्याच्या, आयुष्यात स्थिर होण्यासाठी घेण्याच्या निर्णयाच्या प्रक्रियेमध्ये मोठे बदल होत आहेत. सध्याची पिढी स्थिरतेपेक्षा जास्त धोका पत्करून अधिक प्रगती करण्याच्या मागे आहे. स्त्री मोठ्या प्रमाणावर बाहेर पडून काम करत आहे. नीतिमूल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत असून, तरुण पिढी स्वत:ला जास्तीत-जास्त स्वातंत्र्य घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे निश्चितच प्रत्येक कुटुंबामध्ये नवनवीन वादांना तोंड फुटत आहे. तरुण पिढीला नक्की काय हवे आहे, याचा अंदाज पालकांना येत नाहीच, परंतु तो स्वत: तरुण पिढीला देखील आलेला आहे असे नाही. त्यामुळे सर्वच जण गोंधळलेले आहेत. या प्रश्नांवर एक असा उपाय नाही. आपला दृष्टिकोन मोठा करून नवीन गोष्टी स्वीकारून शांतपणे विचार केल्यावर अनेक प्रश्न सुटू शकतात. हे बदलणारे वातावरणदेखील लवकरच शांत होईल.''

*** 'मॅनिज'ला अलविदा**

दुर्मिळ पुस्तकांसाठी प्रसिद्ध असलेले पुण्यातील 'मॅनिज' हे इंग्रजी पुस्तकांचे जुने दुकान एक एप्रिल पासून बंद झाले. त्यानिमित्त त्याच्या ग्राहकांनी उत्स्फूर्तपणे 'मॅनिज'ला आजपर्यंतच्या सहकार्यासाठी, धन्यवाद देण्यासाठी या स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. रोमिओ-ज्यूलिएट मधील उताऱ्याचे, कवितांचे वाचन आणि मॅनिजच्या आठवणींचे स्मरण अशा वातावरणात हा स्नेहमेळावा पार पडला.

'मॅनिज'ची स्थापना १९४८ मध्ये व्ही.जी. मणी यांनी केली. कँप भागातील या दुकानाने गेली ६३ वर्षे महाराष्ट्रातीलच नव्हे तर विविध राज्यांतील वाचकांनाही आपलेसे केले. व्ही.जी. मणी यांच्यानंतर त्यांचे पुत्र मोती आणि माणिक मणी यांनी 'मॅनिज'ची ओळख जपली आणि वाढवलीही. देशविदेशातील अनेक जुनी-नवी पुस्तके हमखास मिळणारे दुकान अशीच मॅनिजची ओळख होती. पुस्तक उपलब्ध नसेल तर वाचक हमखास ते मणी यांच्याकडे मागणार आणि ते त्यांना मिळणार ही 'मॅनिज'ची परंपरा! अनेक कुटुंबे 'मॅनिज'ने जवळ आणली. अनेक ऋणानुबंध जोडले. तीस चाळीस वर्षे 'मॅनिज'ला नियमितपणे भेट देणारे वाचक आहेत. साठ वर्षे 'मॅनिज'ला भेट देणाऱ्या ग्लेजस कोठावाला यांनी सांगितले, ''मॅनिज ला माझ्या आयुष्यात एक महत्त्वाचे स्थान आहे. दुकाने खूप असतात, ती सुरू होतात, बंद होतात. पण दुकानाच्या रूपाने एक वेगळेच कुटुंब आणि नाती निर्माण करणारे मॅनिज एखादेच!''

मॅनिजचे मालक माणिक मणी यांनी सांगितले, ''मॅनिज हा माझ्यासाठी फक्त व्यवसाय कधीच नव्हता. लोकांशी संवाद साधण्यासाठी, नाते जोडण्यासाठी हा एक दुवा होता. मॅनिजमुळे मी अनेकांशी जोडला गेलो.''

*** ग्रंथालयांच्या अनुदानाला ब्रेक**

राज्यातील १२ हजार ८६९ ग्रंथालयांना यावर्षी मिळणाऱ्या एकूण अनुदानापैकी ५० टक्के अनुदान देण्यात आले. उर्वरित ५० टक्क्यांपैकी २५ टक्के अनुदान देण्याच्या सूचना राज्य ग्रंथ संचालनालयाने दिल्या. मात्र योजनेतर अनुदान मिळविण्यात राज्य ग्रंथालय संचालनालयच 'स्पीडब्रेकर'बनल्याचे पुढे आले आहे.

यावर्षी नवीन १९९० ग्रंथालयांना मंजुरी मिळाली. राज्य शासनातर्फे अ दर्जाच्या ग्रंथालयाला १ लाख ९८ हजार, ब दर्जाच्या ग्रंथालयाला ६४ हजार रुपये अनुदान दिले जाते. राज्य शासनामार्फत या ग्रंथालयाला नियमित अनुदान मिळत नाही, अशी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय बचाव समितीची तक्रार आहे. १ एप्रिलपासून तर शासनाने अ दर्जाच्या ग्रंथालयात ७५ मासिक व १६ वृत्तपत्र असणे बंधनकारक केले आहे. गेल्या पाच वर्षात मासिके, ग्रंथ, वृत्तपत्र यांच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे. तरी अनुदानात मात्र वाढ झाली नाही.

*** सबकुछ पुलं**

एका रविवारची कहाणी, पुलंच्या व्यक्ती आणि वल्ली या पुस्तकातील व्यक्तिचित्रणे व पुलंनी संगीतबद्ध केलेली अजरामर गाणी... असा त्रिवेणी संगम सबकुछ पुलं या कार्यक्रमात प्रेक्षकांना अनुभवण्यास मिळाला. आर्टस ॲण्ड स्पोर्टस सर्कल संस्थेतर्फे अरण्येश्वर येथील मुक्तांगण शाळेच्या सभागृहात रविवारची कहाणी हे पुलंचे नाटक कलाकारांनी पूर्वार्धात सादर केले. रोज आकड्यांची गोळाबेरीज करणाऱ्या सीए महेश

पाटणकर व रेखा धामणकर यांनी प्रमुख भूमिका केल्या. योगेश कुलकर्णी यांनी दिग्दर्शन केले होते. आनंद खांदेवाले व आनंद पानसरे यांनी 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकातील 'नारायण' व 'अंतू बर्वा' या व्यक्तिचित्रांचे सादरीकरण केले. 'हसले मनी चांदणे' आणि 'कौसल्येचा राम बाई' ही पुलंनी संगीतबद्ध केलेली गाणी हेमा भाटे यांनी सादर केली. 'सारेगम' फेम भूषण तोष्णीवाल यांनी 'इंद्रायणी काठी' व 'माझे जीवन गाणे' ही गाणी सादर केली.'

आनंद माडगूळकर, विवेक मठकरी, शारदा इन्फोसिसचे संचालक मनीष ढालावत, शिवाजी झावरे, दिनेश गांधी व प्रशांत तिडके या वेळी उपस्थित होते. आनंद खांदेवाले व आनंद पानसरे यांनी सूत्रसंचालन केले.

*** शिरीष कणेकर यांची फिल्लमबाजी**

चित्रपट आणि चित्रपटातील विविध कलावंतांच्या गमती-जमती, किस्से आणि हलकेफुलके विनोद सांगत शिरीष कणेकर यांनी रसिकांना मनमुराद हसविले.

ओम वुमेन्स हॉस्पिटलच्या वतीने लेखक व वक्ते शिरीष कणेकर यांचा 'माझी फिल्लमबाजी' कार्यक्रम नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. इंदिरा गांधी यांच्या सभेला एक लाखावर लोकांची गर्दी आणि त्यातून मोरारजी देसाई यांचा झालेला तळतळाट कणेकर यांनी चांगला खुलवून दाखवत मोरारजी देसाई कसे बोलत, याची नक्कल करून दाखविली. माला सिन्हाचा जब याद किसी की आती है, ऋषी कपूरचा जनम जनम, डिंपल कपाडियाच्या बीस साल बाद चित्रपटातील किस्से सांगितले. चित्रपटात अनेक प्रसंग असे असतात की, त्यातून विनोद निर्माण होतो.

या कार्यक्रमापूर्वी 'डॉक्टर, आम्हाला मूल हवंय' हा चर्चात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात डॉ. चैतन्य शेंबेकर यांच्यासह डॉ. रणजित जोशी, मानसिक रोगतज्ज्ञ डॉ. विद्युत खांदेवाले, समाजसेविका डॉ. वासंती देशपांडे यांनी भाग घेतला.

*** खगोलशास्त्रात गणिताचा वापर आवश्यक**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि खगोलशास्त्राविषयी उत्सुकता निर्माण करण्यासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे 'खगोलशास्त्रातील सुरस व चमत्कारिक गोष्टी' या विषयावर डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

खगोलशास्त्रात दिसते तसे नसते. खगोलशास्त्रात त्याचे गणित वापरणे आवश्यक असते. चमत्कार असतात मात्र त्यांची कारणे वैज्ञानिकांनी दिली आहेत. त्यामुळे त्यात जादूटोणा नसतो. सूर्य पूर्वेला उगवतो हे सगळ्यांनाच माहिती आहे. अक्षांश आणि पृथ्वीच्या गतीमुळे सूर्य पश्चिमेकडून उगवताना आपण पाहिला असल्याची

मनोरंजक माहिती डॉ. नारळीकर यांनी या वेळी दिली.

खगोलशास्त्राविषयी आणखी माहिती देताना ते म्हणाले की, सूर्याचा प्रकाश सरळ रेषेत येत नाही. वायू आणि धुळीच्या कणांवर तो आपटल्यामुळे पसरला जातो. त्यात सूर्यप्रकाश सर्वांत जास्त निळ्या रंगात विखुरल्यामुळे आकाश निळे दिसते. चंद्रावर वायूमंडळ नसल्यामुळे तेथे उतरल्यावरही अंतराळवीर एकमेकांशी बोलू शकत नाहीत. चंद्रावर कधी सूर्यग्रहण पाहायला मिळेल का, सूर्यग्रहणाचा पक्ष्यांवर काय परिणाम होतो, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.

*** 'रंग माझा वेगळा' पुस्तकाचे प्रकाशन**

'वाचकास भुरळ घालून जे पुस्तक वाचकास चांगला लेखक बनवते व घडवते तेच सर्वश्रेष्ठ पुस्तक होय, म्हणून वाचकांनी चांगली पुस्तके वाचावीत,' असे प्रतिपादन प्रा. प्रवीण दवणे यांनी डॉ. जगदीश करमळकर लिखित 'रंग माझा वेगळा' या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात केले. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकांत केळकर, करमळकर व प्रकाशक रवी घाटपांडे उपस्थित होते. प्रवीण दवणे म्हणाले, 'माणसाचे जीवन हे गुंतागुंतीचे आहे. माणूस गर्भात गुंतूनच जन्माला येत असतो. हा गुंता आयुष्यभर कायमस्वरूपी माणसाला अडकवूनच ठेवत असतो. तेव्हा या गुंत्यातून सुटण्याचा प्रभावी उपाय आध्यात्मिक किंवा छंदमयी होणे हाच होय.'

*** 'सचिन मी होणार' गाण्याचे यूट्युब द्वारे प्रकाशन**

देशभरात सचिनचे महाशतक साजरे केले जात असताना सचिन होण्याची इच्छा असणाऱ्या लहानग्यांची मानसिकता मांडणारे पुण्यातील बालगायक अद्वैत केसकरचे 'सचिन मी होणार' हे गीत यूट्युबवर प्रकाशित करण्यात आले. सचिनसारखे मोठ्ठे होऊन यशाची उंच उंच शिखरे पादाक्रांत करण्याची स्वप्ने व्यक्त करणाऱ्या या गीताची निर्मिती ओरायन स्टुडिओजने केली असून ज्येष्ठ संगीतकार मीना मंगेशकर-खडीकर यांनी संगीतबद्ध केले आहे.

*** 'याहू'चा फेसबुकवर खटला**

इंटरनेट सर्च इंजिन याहूने सोशल नेटवर्किंग साईट फेसबुकच्या विरोधात बौद्धिक संपदा हक्काचा दावा टाकला आहे. याहूचे म्हणणे आहे, की फेसबुकने आपल्या१० पेटंट्सचे उल्लंघन केले आहे. ही पेटंट्स वेबसाइटवर जाहिरात देण्याची पद्धत, त्याचे प्रकार यांच्याशी संबंधित आहेत. फेसबुकने मात्र या आरोपांचा इन्कार केला आहे.

फेसबुकचा आयपीओ या वर्षी बाजारात येतो आहे. पेटंटशी संबंधित खटलेबाजी म्हणजे स्मार्ट फोन बनवणाऱ्या कंपन्यांमध्ये नेहमीची बाब आहे; पण दोन मोठ्या टेक्नॉलॉजी कंपन्यांमध्ये अशा पद्धतीचा वाद नवीनच आहे.

यूजर्सचे प्रोफाइल बनवणे, इतर लोकांशी जोडले जाणे आणि व्यवसायाशी

संबंधित फेसबुकचे संपूर्ण सोशल नेटवर्क मॉडेल, याहूच्या पेटंट मिळालेल्या सोशल नेटवर्किंग तंत्रावर आधारित आहे. तिकडे फेसबुकने याहूच्या या कृतीने धक्का बसल्याचे म्हटले आहे. याहू अनेक दिवसांपासून आमचा उद्योगातला भागीदार आहे. फेसबुकशी असलेल्या भागीदारीमुळे याहूला बराच फायदा झाला आहे आणि त्यानंतरही याहूने असा दावा टाकावा, याचे फेसबुकला वाईट वाटते.

याहूने या आधीसुद्धा २००४ मध्ये गुगलचा पब्लिक इश्यू येण्याआधी दावा टाकला होता. त्यावेळी २७ लाखांचे शेअर देऊन गुगलने हे प्रकरण मिटवले होते. फेसबुकचाही या वर्षी पब्लिक इश्यू येत आहेत आणि त्यामुळे शेअरचे भाव पाडण्यासाठी वा त्याच्या बदल्यात फेसबुककडून पैसे उकळण्यासाठी याहू हे करत आहे, असा अंदाज आहे. वॉल स्ट्रीट जर्नलच्या अहवालानुसार लागोपाठ तीन महिन्यांपासून याहूचे उत्पन्न घटते आहे. याहूची आर्थिक स्थिती खराब आहे. जर निकाल याहूच्या बाजूने लागला तर याहूला चांगले पैसे मिळू शकतात; मात्र विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार फेसबुककडून याहूला पैसे मिळणे कठीण आहे.

*** 'बापू' चिंतनकाव्याचे प्रकाशन**

'साहित्यिकांना महात्मा गांधीजींच्या विचारांचे मर्म समजले नाही. त्यामुळेच गांधीजी कथा-कवितांचा विषय होऊ शकले नाहीत,' असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांनी केले. गांधीजींनी दाखवलेली सत्य-अहिंसेची वाट आपण विसरत आहोत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

साधना प्रकाशनच्या वतीने प्रा. रा. ग. जाधव यांच्या 'बापू' या चिंतनकाव्याचे प्रकाशन डहाके यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'साधना'चे विश्वस्त सचिव डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. विलास खोले उपस्थित होते.

डहाके म्हणाले, 'गांधीजी समजून घेणे खरोखरीच कठीण आहे. ते एकच नव्हे; तर अनेक प्रकारचे गूढ व्यक्तिमत्त्व होते. खरे तर ऊर्जास्रोत होते. सर्वसामान्यांना त्यांनी बळ दिले. अन्यायाविरोधात उभे राहण्याची ताकद दिली. गांधी म्हटले की आजही सत्य आणि अहिंसा हे शब्द लगेच समोर येतात. त्यातला एक शब्द सकारात्मक, दुसरा नकारात्मक असला तरी दोन्ही शब्द एकात्म आहेत.'

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, 'मराठी साहित्यात गांधीजी फारसे दिसत नाहीत. स्वातंत्र्य आंदोलनावेळी आपले साहित्यिक वेगळेच काही तरी लिहीत होते, हा चिंतेचा विषय आहे. नैतिकता पुढे यावी असे गांधीजींना वाटत होते; पण इतक्या वर्षात नैतिकता पाच पावलेही पुढे आली नाही, हे दुर्दैव आहे.'

खोले म्हणाले, 'या एकभाषित चिंतनकाव्याच्या माध्यमातून मराठी साहित्यात अभिनव प्रयोग होत आहे. यात कवीने बापूंना, स्वत:ला आणि वाचकांनाही प्रश्न विचारले आहेत.

''मी शाळेतून घराकडे परत येत होतो, तेव्हा गांधी हत्येमुळे ठिकठिकाणी चाललेली जाळपोळ, हत्या पाहिली. घरी आलो आणि गांधींवर आपण काही तरी लिहावे म्हणून हातात पेन्सिल घेतली. वहीवर फक्त 'हरे राम' एवढेच लिहू शकलो. त्या वयात गांधींबाबत केलेला 'मानसिक करार' आज 'बापू'च्या निमित्ताने पूर्ण होत आहे. याचा मला आनंद आहे,'' अशी भावना प्रा. जाधव यांनी व्यक्त केली.

*** मधुमेहावरील डायरीचे प्रकाशन**

भारत हे मधुमेहाचे आगर बनले असून, उच्च रक्तदाब, लहान मुलांमधील लठ्ठपणा, हृदयविकार या रोगांचे प्रमाण वाढत आहे. उपचारही खर्चिक आहेत. आरोग्यसेवेसाठी सरकारने अधिक तरतूद केली पाहिजे, असे मत एम क्युअर कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण खन्ना यांनी व्यक्त केले.

इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे (आयएमए) मधुमेहाची माहिती देणाऱ्या डायरीचे खन्ना यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. 'लोकमत'चे मिलन दर्डा, आयएमए पुणेचे अध्यक्ष डॉ. अंबरीष शहाडे, डॉ. सी. एस. याज्ञिक, डॉ. माया तुळपुळे वगैरे मान्यवर या वेळी उपस्थित होते.

खन्ना म्हणाले, एक विश्वासार्ह आरोग्य सेवा देणारा देश म्हणून आपल्याकडे पाहिले जाते. किडनी व अवयव रोपणासाठीच्या शस्त्रक्रियेसाठी जगभरातून रुग्ण येत आहेत. अमेरिकेत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या आरोग्यासाठी१७ टक्के, युरोपात ९टक्के तर आफ्रिकी देशांत ५ टक्के तरतूद केली जाते, मात्र भारत दोन अडीच टक्क्यांच्या आसपास घुटमळत आहे.

*** साहित्य रत्नाकर पुस्तकाचे प्रकाशन**

प्रा. रत्नाकर मंचरकर यांच्यावरील 'साहित्य रत्नाकर' पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्रा. रतनलाल सोनग्रा, डॉ. मनोहर जाधव, ॲड. प्रमोद आडकर, डॉ. अविनाश सांगोलेकर उपस्थित होते

*** ललितकलांविषयक पाठ्यपुस्तके**

पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्राने दिग्गज कलाकारांच्या सहभागातून नऊ पुस्तकांचा विशेष संच तयार केला असून, कलेच्या क्षेत्रात मुशाफिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना हा संच मोफत मिळणार आहे.

ललितकलांसाठी निश्चित अभ्यासक्रम असला, तरी अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके उपलब्ध नाहीत. त्यामुळे या प्रकारचे अभ्यास साहित्य तयार करणारे पुणे हे देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे. पं. सुरेश तळवलकर, डॉ. सरोज देशपांडे, शमा भाटे, डॉ. हिमांशू नाईक, मिलिंद मालशे अशा ज्येष्ठ अभ्यासकांनी या पुस्तकांचे लिखाण केले आहे.

या उपक्रमाविषयी विभाग प्रमुख डॉ. शुभांगी बहुलीकर म्हणाल्या, 'ललित-

प्रायोगिक कलांचा सामाजिक, मानसशास्त्रीय, तात्त्विक, वैद्यकीय अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून अभ्यास करण्यासाठी रतन टाटा ट्रस्टतर्फे ८२ लाख रुपयांची देणगी मिळाली. तीन वर्षांपासून या प्रकल्पावर काम सुरू होते.'

बंदिशीचे सौंदर्यशास्त्र, नाट्यशास्त्र - नवनिर्मितीची मनोभूमिका, प्रयोगकलांसाठी भौतिकशास्त्र, प्रयोगकला आणि वैद्यकशास्त्र, प्रसारमाध्यमे आणि प्रयोगकला असे या पुस्तकांचे विषय आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. संजय चहांदे यांच्या हस्ते २२ मार्चला या पुस्तकांचे प्रकाशन झाले.

*** डॉ. आवटे यांच्या 'धम्मधारा'चे प्रकाशन**

'पाली भाषेत धम्मपदाचे जे स्थान आहे, तेच मराठीत 'धम्मधारा'या काव्यसंग्रहाला मिळावे,' अशी आशा ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी व्यक्त केली.

कवी डॉ. प्रदीप आवटे यांच्या 'धम्मधारा'या बुद्ध तत्त्वज्ञानावर आधारित काव्यसंग्रहाचे आणि या रचनांच्या ध्वनिफितीचे प्रकाशन झाले. साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य सतीश काळसेकर, डॉ. आवटे, धम्मधारा ध्वनिफितीचे संगीतकार रोहित नागभिडे, डॉ. कुमार सप्तर्षी, अजित अभ्यंकर उपस्थित होते.

'आंबेडकरी बौद्ध धर्म हा मानवी इतिहासातील विलक्षण अध्याय आहे. गौतम बुद्धाने दिलेले तत्त्वज्ञान अखिल मानव समाजासाठी महत्त्वाचे आहे. प्रदीप आवटे यांनी ज्या ताकदीने हे कवितेत आणले त्यामुळे बुद्धाचे तत्त्वज्ञान सर्वदूर पोहोचण्यास मदत होणार आहे,' असे डॉ. कसबे म्हणाले.

डॉ. आवटे म्हणाले, 'कविता हा तर आत्मशोधाचा प्रयत्न असतो. त्या प्रयत्नात गौतम बुद्ध भेटला आणि माझ्या शब्दांना नवा आशय गवसला.'

*** 'द ब्रिटिश लायब्ररी' तर्फे जुन्या पुस्तकांचे प्रदर्शन**

'द ब्रिटिश लायब्ररी' तर्फे ग्रंथालयातील जुनी पुस्तके विक्रीसाठी काढण्यात आली होती.

व्यवसाय व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिकशास्त्र, अभियांत्रिकी, विज्ञानशास्त्र, कादंबरी आणि लहान मुलांची पुस्तके अशा विविध विषयांवरील पुस्तकांचा यात समावेश होता.

*** जागतिक रंगभूमी दिन**

जागतिक रंगभूमीदिनाचे निमित्त साधून सह्याद्री वाहिनीने घेतलेल्या नाट्यसंगीत सोहळ्याला ज्येष्ठ रंगकर्मी व गायिका कीर्ती शिलेदार, फैयाज, प्रसिद्ध शास्त्रीय गायक आनंद भाटे, ऋषीकेश बोडस, कैवल्यकुमार गुरव, मंजूषा पाटील-कुलकर्णी, लावणी कलावंत मेघा घो आदि उपस्थित होते. निवेदन अभिनेते आशुतोष कुलकर्णी आणि स्पृहा जोशी यांनी केले.

प्रारंभी कीर्ती शिलेदार यांनी शृंगार रसाने भरलेले 'खरा तो प्रेमा' हे पद सादर

केले. भाटे यांनी सादर केलेल्या 'या नव नवल नयनोत्सवा'... त्यानंतर अनेक लोकप्रिय संगीत नाटकातील 'नच सुंदरी अनुकंपा मजवरी', 'नाथा आता नाही मी बोलत'... 'प्रिये पहा' अशी पदे कलावंतांनी सादर केली. शिलेदार यांनी सादर केलेल्या 'दुल्लडी गळा पचलढी' या पदावर मेघा घो यांनी सादर केलेले नृत्य खिळवून ठेवणारे होते.

नाट्यपदांच्या सादरीकरणाने पुन्हा एकदा नाट्यसंगीताचे युग अवतरल्याचे वातावरण निर्माण झाले.

*** विठाबाईंच्या जीवनावर मराठी चित्रपट**

करमणूक व समाजप्रबोधन करणाऱ्या 'तमाशा' या खेळास आपले संपूर्ण आयुष्य वाहतानाच त्याला राष्ट्रपती पदक मिळवून देणाऱ्या विठाबाई नारायणगावकर यांचा जीवनपट आता 'विठा' या मराठी चित्रपटाद्वारे रुपेरी पडद्यावर साकारला जाणार आहे.

लेखक योगिराज बागूल यांच्या 'तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा' या पुस्तकावर या चित्रपटाचे कथानक बेतले असून आपल्या कलाप्रेम, निष्ठा व अथक परिश्रमाने निव्वळ थिल्लरपणाकडे वाटचाल करणाऱ्या या लोककलेस सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या विठाबाई यांची वादळी भूमिका अभिनेत्री उर्मिला कानेटकर ही साकारणार आहे. त्याचबरोबर उपेंद्र लिमये हेही एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

सन १९९०ला राष्ट्रपती व महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र गौरव, सन २०००ला लोकसत्ता-लोकोत्सव २००० पुरस्कार अशा अनेकविध सन्माननीय पुरस्कारप्राप्त विठाबाई नारायणगावकर यांनी सन १९६२ च्या भारत-चीन युद्धावेळी आपल्या तीन महिन्यांच्या तान्ह्या मुलीस पुणे येथील नातेवाईकांकडे ठेवून नेफासारख्या अत्यंत खडतर ठिकाणी भारतीय सैन्याचे मनोधैर्य वाढविण्यासाठी धाव घेतली होती. निर्माता दिनेश अग्रवाल यांच्या नम्रता चित्रनिर्मिती संस्थेच्या वतीने दिग्दर्शक पुंडलिक धुमाळ व संगीतकार अनिल परब व समीर म्हात्रे या जोडगोळीने संगीताची धुरा सांभाळली आहे.

*** 'माझे जीवन गाणे'**

'तुज पाहिले तुज वाहिले, नवपुष्प हे हृदयातले' या आपल्या पहिल्या कवितेपासून नंतर आयुष्याच्या प्रत्येक वळणावर भेटलेल्या कवितेचा प्रवास उलगडत दस्तुरखुद्द मंगेश पाडगावकर यांनी चैत्र पाडव्याच्या दिवशी 'माझे जीवन गाणे' कार्यक्रम सादर केला.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे आयोजित संगीत महोत्सवाचे उद्घाटन महापौर वैशाली बनकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आमदार

गिरीष बापट, नगरसेवक हेमंत रासने, बाळासाहेब दाभेकर, अशोक येनपुरे, राहुल चव्हाण उपस्थित होते. उद्घाटनानंतर मिलिंद कुलकर्णी यांनी पाडगावकर यांच्याशी गप्पांची मैफल रंगविली.

'तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे', 'जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा', 'दिवस तुझे हे फुलायचे', 'सावर रे, सावर रे उंच माझा झुला', 'पहिली ही भेट झाली, ओढ ही युगांची', 'शुक्रतारा मंद वारा' अशी गीते जितेंद्र अभ्यंकर व मधुरा दातार यांनी सादर केली. सूत्रसंचालन प्रकाश पायगुडे यांनी केले.

*** 'आधुनिक जगातील इस्लाम' पुस्तकाचे प्रकाशन**

''इस्लाम म्हणजे शांती निर्माण करणे. कोणत्याच धर्मातील मूल्यामध्ये फरक नाही. सत्य हाच प्रत्येक धर्माचा आधार आहे. असत्य हा राजकारणाचा आधार असून त्यामुळेच दंगली उसळतात, धर्मामुळे नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे,'' असे मत इतिहास, कुराणाचे अभ्यासक डॉ. असगरअली इंजिनिअर यांनी नंदिनी चव्हाण यांनी अनुवादित केलेल्या 'आधुनिक जगातील इस्लाम' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले. भाई वैद्य, चळवळीतील कार्यकर्ते अ.का. मुकादम, प्रा. एफ.एच. बेन्नूर यावेळी उपस्थित होते. आयुष्यभर सत्याचा शोध घेणाऱ्या व्यक्तीला घमेंड नसते, ती दुसऱ्याचे दुःख समजून घेते, सत्तेसमोर खरे बोलते, प्रस्थापित यंत्रणेविरुद्ध बंड करते, ती व्यक्ती खऱ्या अर्थाने धार्मिक असते. शांती, एकोप्याचा संदेश देणारे सुफी संत आपण आधुनिक काळात का निर्माण करू शकलो नाहीत याचा विचार केला पाहिजे, असे इंजिनिअर यांनी सांगितले.

चव्हाण म्हणाले, इंजिनिअर यांचे विचार मराठी भाषकांपर्यंत पोचण्यासाठी अनुवाद केला.विधायक दृष्टिकोनातून इस्लामचा अभ्यास करणाऱ्यांची दखल घेतली पाहिजे, असे मुकादम यांनी सांगितले.

बेन्नूर म्हणाले, ''कुराणमध्ये समतेचा विचार, महिलांना अधिकार आहेत; पण ते समजून घेतले जात नाहीत.''

प्रगतिशील भारतीय मुस्लिम आंदोलनाचे अन्वर राजन यांनी सूत्रसंचालन केले.

*** डॉ. मुणगेकर 'शांतिनिकेतन'वर**

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेल्या विश्वभारती शांतिनिकेतन विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर राज्यसभा सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांची निवड झाली आहे.

*** पुणे विद्यापीठात नागराज मंजुळे**

भटक्या-विमुक्त जाती-जमातींचे प्रतिनिधित्व करणारा पिस्तुल्या, त्याच्या छोट्या आयुष्यातील मोठा संघर्ष,  लेखक, दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला.

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे प्रवीण जोशी व्याख्यानमालेंतर्गत 'पिस्तुल्या' या लघुपटाचे सादरीकरण व नागराज मंजुळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात

आले होते. यावेळी विभागप्रमुख डॉ. विद्यागौरी टिळक, डॉ. मनोहर जाधव, डॉ. प्रभाकर देसाई व कॅमेरामन कुतुबुद्दीन इनामदार उपस्थित होते.

मंजुळे म्हणाले, ''पिस्तुल्या ही कल्पना नसून वास्तव आहे. त्यामुळे भटक्या-विमुक्त जाती-जमातींच्या असुरक्षित आयुष्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. प्रतिकूल परिस्थिती, अज्ञान व मनातील न्यूनगंड दूर सारून कष्ट केल्यास प्रत्येकाला यश मिळू शकते. त्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन व आत्मविश्वास वाढविण्यावर युवकांनी भर दिला पाहिजे. 'पिस्तुल्या'चे यश याच गोष्टींमध्ये सामावले आहे.''

''सगळ्यांसाठीच पिस्तुल्या हा एक नवा प्रयोग होता. त्यामुळे प्रत्येकाने त्यासाठी अतिशय प्रामाणिकपणे कष्ट केले आहेत. सगळ्याच नवख्यांचा समावेश असल्याने चांगला परिणाम आम्हाला मिळाला.'' असे इनामदार यांनी सांगितले. लेखन व कॅमेरा या दोन्ही माध्यमांतून मनातील अस्वस्थता समाजासमोर मांडण्याचे काम मंजुळे यांनी केल्याची भावना डॉ. जाधव यांनी व्यक्त केली.

*** डॉ. महाजनी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन**

'विज्ञान आणि तंत्रज्ञानाने अध्यात्माकडे आदराने पाहणे महत्त्वाचे आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि अध्यात्माच्या एकत्रीकरणानेच चिरंतन विकास साधला जाऊ शकतो,' असे मत ज्येष्ठ अवकाशशास्त्रज्ञ सुरेश नाईक यांनी व्यक्त केले.

डॉ. विनिता महाजनी लिखित 'पॉवर ऑफ वर्डस लीड्स टू वर्डलेस पॉवर' या समर्थ रामदासांच्या 'आत्माराम' या ग्रंथाच्या अनुवादाचे असलेले व 'श्यामझूल' या कवितासंग्रहाचे प्रकाशन नाईक यांच्या हस्ते झाले आहे. मोहनबुवा रामदासी, विश्वस्त विजय ठोंमरे, विद्यानंद प्रकाशनाचे नंदकिशोर खुर्जेकर उपस्थित होते. सविता केळकर यांनी सूत्रसंचालन केले.

*** 'कल्पना संगीत'चे प्रकाशन**

गोविंदराव टेंबे पेटी वाजवायचे नाहीत; तर त्यांची पेटी गायची, असे ज्येष्ठ हार्मोनिअम वादक पुरुषोत्तम वालावलकर यांनी सांगितले.

६० वर्षांपूर्वी टेंबेंनी लिहिलेल्या 'कल्पना संगीत' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन स्वरानंद प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त प्रकाश भोंडे, गायक सुधीर पोटे आणि टेंबे यांची पणती ज्योत्स्ना खांडेकर यांनी केले. या कार्यक्रमास नाट्यसंमेलनाध्यक्ष श्रीकांत मोघे, हार्मोनिअम व ऑर्गनवादक तुळशीदास बोरकर, पोटे, खांडेकर उपस्थित होते.

पुस्तक प्रकाशनामागची भूमिका स्पष्ट करतांना खांडेकर म्हणाले, ''नूतन पिढीला कल्पना संगीत काय, हे कळावे म्हणून या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढली आहे.'' पुस्तकातील विषय व त्याची रूपरेषेची माहिती समीक्षक दिग्विजय वैद्य व पोटे यांनी दिली.

उत्तरार्धात टेंबेंच्या बहुविध प्रतिमांचा शोध घेणारा 'गुणी गोविंद' हा संगीत

कार्यक्रम सादर झाला. टेंबेंनी साथ केलेल्या गाण्यांच्या विविध प्रकारांतून त्यांची पेटी कशी बोलायची, हे स्पष्ट केले. सुखदा काणे, राजप्रसाद धर्माधिकारी, द्वारकानाथ पै आणि पोटे या कलाकारांनी हा कार्यक्रम सादर केला.

*** ऐक्यभारती**

ऐक्यभारती संस्थेने २ एप्रिल ते ३० मे या काळात भाषा कौशल्यासाठी १८ कोर्सेसचे नियोजन केले. हे कोर्सेस १०वी ते ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले होते.

भाषा कौशल्ये आत्मसात करणारे व तसे प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम राबविण्याची व त्या पद्धतीचे अभ्यासक्रम तयार करण्याची आवश्यकता आहे. भाषा येणे, त्या भाषेतील साहित्याचा अभ्यास ही एक दिशा होऊ शकते.भाषिक कौशल्यांचा ज्ञान-विज्ञानाच्या शिक्षणात व व्यवहारात उपयोग या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. या दृष्टीने भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात येऊ लागले आहे. भाषिक कौशल्याचे अभ्यासक्रम राबवले जाऊ लागले आहेत.

जर्मन, फ्रेंच व स्पॅनिश या तीन भाषांच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणाचा अंतर्भाव आहे तसेच स्पोकन इंग्लिश हा कोर्सही आहे. इंग्रजी शाळेत शिकणाऱ्या महिलांसाठी दुपारच्या वेळेत वेगळा अभ्यासक्रम आहे व इंग्रजीच्या व्याकरणावर भर देणारा स्वतंत्र कोर्स आहे. कम्युनिकेशनचेही सामान्य व उच्च असे दोन प्रकार आहेत. भारतीय भाषांपैकी कन्नड, गुजराथी, उर्दू, संस्कृत व मराठी अशा पाच भाषांचा या योजनेत अंतर्भाव आहे.

*** बेंगळुरूचा सचिन कुके आशिया खंडात अव्वल**

अंतराळात कोणकोणते नवीन प्रयोग करता येतील, यासंदर्भात यू ट्युबने घेतलेल्या ऑनलाइन स्पर्धेत बेंगळुरूचा सचिन कुके आशिया-पॅसिफिक विभागात अव्वल ठरला आहे.

अमेरिका, युरोप आणि जपानच्या अंतराळ संस्था अनुक्रमे नासा, इसा आणि जॅक्सा यांच्या सहयोगाने यू ट्युब आणि लेनोव्होने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये १४ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी 'यू ट्युब स्पेस लॅब' ही स्पर्धा घेतली होती. चुंबकीय क्षेत्राशी संपर्कात आल्यानंतर चुंबकाचे गुणधर्म धारण करणाऱ्या फेरो फ्लुइड या द्रवपदार्थातील उष्णतेच्या प्रवाहासंदर्भात सचिनने केलेल्या प्रयोगामुळे वातानुकूलित यंत्रणांमध्ये बदल होणार आहेत.

सचिन बेंगळुरूच्या बीएमएस कॉलेजात मेकॅनिकल इंजिनीअरिंग करीत आहे.

अमेरिकेतील भारताच्या राजदूत निरुपमा राव यांनी 'सचिनसारखे विद्यार्थीच भारताच्या तरुण पिढीचे आशास्थान आहेत.' अशा शब्दात कौतुक केले.

*** अनुष्का स्त्री साहित्य संमेलन**

''महिला कधीही अबला नव्हती, वेळ प्रसंगी ती अधिक कणखर बनून सर्व

जबाबदाऱ्या पार पाडते.'' असा सूर 'उंबरठा ओलांडताना' या परिसंवादात निघाला.

प्राधिकरणात आयोजित अनुष्का स्त्री साहित्य संमेलनातील परिसंवादात नाट्य निर्मात्या लता नार्वेकर, ज्येष्ठ लेखिका प्रा. पुष्पा भावे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शिरीष साठे सहभागी झाले होते.

नार्वेकर म्हणाल्या, ''मी उंबरठा ओलांडून पुरुषांप्रमाणे संघर्ष करीत नाट्यनिर्मिती क्षेत्रात आले; पण त्याचबरोबर सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्री या नात्याने मी सर्व नाती जोपासली. सामान्य स्त्रीसारखी डगमगली असते तर नाट्यक्षेत्रात मला एकमेव नाट्यनिर्मितीचा बहुमान मिळाला नसता.''

डॉ. साठे म्हणाल्या, ''कोवळ्या वयातील मुलींवर येणारा ताण घराच्या उंबरठ्याच्या आतच सोडवला पाहिजे. मानसिक दृष्ट्या दुर्बल मुलांच्या समस्या चर्चेतून सोडवाव्यात. अशा मुलींकडे पालकांनी अधिक लक्ष द्यावे.''

भावे म्हणाल्या, ''प्रत्येक व्यक्तिमत्त्वामध्ये स्त्रीत्व आणि पुरुषत्व हे दोन्ही गुणधर्म असतात. या गुणांना योग्य ठिकाणी वापरून आपली सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. आपल्या अस्तित्वाचे सादरीकरण समाजापुढे लख्खपणे ठेवले पाहिजे.''

त्यानंतर 'पन्नास टक्के आरक्षण, मृगजळ की वास्तव' या विषयावरही चर्चासत्र झाले. त्यात माजी महापौर मंगला कदम, नगरसेविका भारती फरांदे, नंदा ताकवणे, चंद्रकांत सोनकांबळे, महिला काँग्रेस अध्यक्षा पद्मिनीराजे मोहिते; ज्योती कानेटकर, अनुष्का स्त्री कला मंचाच्या अध्यक्षा शर्मिला महाजन सहभागी झाल्या होत्या. सुचेता गांगल यांनी निवेदन केले.

*** बाबासाहेब देशमुख यांचे शैक्षणिक कार्य**

''कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांनी अत्यंत तळमळीने आणि पराकोटीचे परिश्रम घेऊन सगरोळी सारख्या दुर्गम भागात शिक्षण प्रसाराचे केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्यांनी ग्रामीण भागातील अनेक पिढ्या घडविल्या,'' असे उद्‌गार प्रतापराव पवार यांनी काढले.

डेक्कन अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गो. बं. देगलूरकर, पद्मभूषण शोभनाताई रानडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या लीलाताई जाधव, एकता न्यासाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे, साहित्यिक लक्ष्मीकांत तांबोळी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी एकता मासिक (पुणे) आणि संस्कृती संवर्धन मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या 'कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कार्यदर्शन' विशेषांकाचे प्रकाशन झाले.

श्री. पवार म्हणाले, ''बाबासाहेब देशमुख हे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्यातील उत्साह, प्रयत्नवाद आणि तळमळ प्रेरणा देणारी होती. गोरगरीबांसाठी सतत काहीतरी करत राहण्याची त्यांची तळमळ होती.''

डॉ. देगलूरकर म्हणाले, ''बाबासाहेब देशमुख यांचा मोठा लोकसंग्रह होता. ते प्रागतिक विचारांचे होते. ते कुठल्याही कामासाठी इतरांवर अवलंबून राहात नसत. बाबासाहेब आणि त्यांच्या पत्नी अनसूयाबाई यांनी आयुष्यभर झटून हे कार्य नावारूपाला आणले.''

*** चित्रकार संजय शिंदे लिम्का बुक मध्ये**

अनोख्या चित्रांबद्दल वडगाव येथील चित्रकार संजय शिंदे यांचे नाव लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड २०१२ मध्ये नोंदले गेले आहे, असे लिम्का बुक ऑफ रेकॉर्डच्या संपादक विजया शिंदे यांनी सांगितले. संजय शिंदे यांनी रंग आणि ब्रश यांच्या माध्यमातून ही चित्रे काढलेली नाहीत; ती कांदा आणि लसणाच्या टरफलापासून तयार केली आहेत. सर्वात लहान चित्र ३ बाय ३ सेंटिमीटरचे असून, सर्वात मोठे चित्र ७५ बाय ९० सेंटिमीटरचे आहे. त्यांनी काढलेल्या गणपतीच्या चित्रांचे प्रदर्शन नुकतेच आर्ट टुडे गॅलरीत भरले होते.

*** उमेश कुलकर्णी यांना पुरस्कार**

''अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे अलीकडच्या काळात जग जवळ आले आहे. परंतु आपापसातील संवाद मात्र कमी झाला आहे. सद्य:परिस्थितीत आपले नाते चित्रपटांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचे काम मी करत आहे.'' असे मत बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या (बीएमसीसी) माजी विद्यार्थी मेळाव्यात दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. सी. एन. रावळ, माजी विद्यार्थी संघटनेचे प्रकाश भोंडे, सी.जी. वैद्य व अनिल निम्हण उपस्थित होते.

उमेश कुलकर्णी यांना 'बाळासाहेब स्मृती पुरस्कार', ओतूर येथील 'सकाळ' चे बातमीदार भरत अवचट यांना 'वरुणराज भिडे पुरस्कार', नंदू पोळ यांना 'अभिनेते सुहास कुलकर्णी पुरस्कार' तर संपदा सहस्रबुद्धे व नितिन कीर्तने या खेळाडूंना 'शिवराम फळणीकर पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

कुलकर्णी म्हणाले, ''बाळासाहेब सरपोतदारांनी मराठी चित्रपटासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्याने आनंद झाला. बीएमसीसी मध्ये असताना पुरुषोत्तम, फिरोदिया करंडक स्पर्धा केल्या. संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले सुनील सुखथनकर यांच्याबरोबर काम केले. त्यानंतर वळू, विहिर, देऊळ या चित्रपटांनी सुरवात केली आहे. भविष्यातही चांगले काम करण्याची प्रेरणा इथूनच मिळत जाते.''

डॉ. शेजवलकर म्हणाले, ''श्रद्धा, विनम्रता व कृतज्ञता हे सद्‌गुण अंगी असल्यास कधीच अपयश येणार नाही. आपणही समाजाचे देणे लागतो, या भावनेने विद्यार्थ्यांनी काम करावे.'' साक्षी क्षीरसागर व आरती घोरपडे या विद्यार्थिनींचा विशेष गौरव करण्यात आला.

*** नेटिझनकडून 'नेटवर्किंग'मध्ये वाढ**

एकमेकांशी संपर्क, व्यवसाय वाढ आणि ओळख वाढवणे या कामांसाठी

बहुसंख्य भारतीय ई-मेल व सोशल नेटवर्किंग साइट्‌सचा वापर करतात. असे सर्वेक्षण इप्सॉस या संशोधन संस्थेने केले आहे या सर्वेक्षणानुसार देशात ६० टक्के लोक ऑनलाइन एकमेकांशी जोडलेले आहेत. या लोकांना ई-मेल येतात आणि ते स्वत: सोशल नेटवर्किंग साइट्‌सच्या सहाय्याने एकमेकांशी संवाद साधतात.

'इप्सॉस'ने या संदर्भात एक सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध केला आहे. हे सर्वेक्षण ७ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी या कालावधीत केले गेले. २४ देशांमधील १९ हजार २१६ लोकांना यासाठी प्रश्न विचारण्यात आले. या अहवालानुसार, ऑनलाइन जोडल्या गेलेल्या साठ टक्के लोकांपैकी २५ टक्के लोक व्हॉइस ओव्हर इंटरनेट पोर्टलचा वापर करतात. इंटरनेट उद्योगाच्या पाहणीनुसार २०१२ या चालू वर्षात १० कोटी ३६ लाख लोक ऑनलाइन पद्धतीचा वापर करू लागतील. २०१५ पर्यंत या संख्येत दुपटीने वाढ अपेक्षित आहे. देशातील चार कोटी लोक स्मार्टफोनच्या सहाय्याने इंटरनेट वापरतात. यापैकी ५६ टक्के लोक दिवसातून अनेक वेळा स्मार्टफोनच्या सहाय्याने इंटरनेट वापरतात. ४० टक्के लोक किमान एकदा इंटरनेट सर्फिंग करतात, तर ६ टक्के लोक इंटरनेटसाठी त्यांचा फोन कधीही वापरत नाहीत. इंटरनेट वापरकर्त्यांपैकी ८५ टक्के लोक २४ देशांशी या ना त्या प्रकारे जोडलेले आहेत, तर ६२ टक्के लोक सोशल नेटवर्किंग साइटचा वापर करत आहेत. जागतिक स्तरावर ई-मेलला सर्वाधिक प्राधान्य दिले जात असून, त्याखालोखाल सोशल नेटवर्किंग साइटचा समावेश आहे.

*** 'फेसबुक'ने दिले सव्वा कोटीचे पॅकेज**

फेसबुक या सोशल नेटवर्किंग साइटने एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याला तब्बल एक कोटी ३४ लाख रुपयांचे वार्षिक पगाराचे पॅकेज दिले आहे.

देशातील कोणत्याही तांत्रिक शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्याला मिळालेले हे सर्वात मोठे पॅकेज आहे. मोतीलाल नेहरू राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतील बी.टेक. च्या एका विद्यार्थ्याला 'फेसबुक'ने २ लाख ६२ हजार ५०० डॉलर्सचे (सुमारे १ कोटी ३४ लाख रुपये) पॅकेज दिले, अशी माहिती संचालक पी. चक्रवर्ती यांनी दिली. सुरक्षिततेच्या कारणामुळे त्याचे नाव त्यांनी जाहीर केले नाही. मात्र, तो मूळचा कानपूरमधील आहे.

*** 'किशोर'चा लूक बदलणार!**

एक्स्ट्राकरिक्युलरच्या जमान्यात पाठ्यपुस्तकाबाहेर पडत विद्यार्थी, शिक्षकांना नवनवीन शैक्षणिक-सामाजिक विषयांची, उपक्रमांची ओळख करून देणाऱ्या 'बालभारती'च्या किशोर मासिकाचा लूक लवकरच बदलणार आहे.

किशोरने यंदा ४१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. प्राथमिक विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात किशोरचा मोठा वाटा आहे. त्यामुळेच आजही राज्यातील ५६ हजार शाळांपर्यंत किशोर पोचते. बोर्ड, 'एससीईआरटी'च्या मासिकांचे रूपडेही

पालटणार

'इंग्रजी माध्यमाच्या शाळांपर्यंत पोचण्याच्या उद्देशाने पहिल्या टप्प्यात मासिकात काही पाने इंग्रजीमध्ये देण्यात येणार आहे. याशिवाय विद्यार्थीदशेतच स्पर्धा परीक्षांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने विशेष सदराचा समावेश करण्यात आला आहे.'

किशोर, शिक्षण संक्रमण आणि जीवन शिक्षण ही तिन्ही मासिके आज तोट्यात चालवावी लागत आहेत. मासिकांच्या खपांचे आकडे ५० हजारांच्या पुढे असले, तरी शाळांव्यतिरिक्त सामान्य वर्गणीदारांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे या तिन्ही मासिकांमध्ये बदल करण्यासाठी शालेय शिक्षण राज्यमंत्री फौजिया खान यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

*** फोटोंसाठी 'फेसबुक'ने मोजले पाच हजार कोटी!**

तब्बल पाच हजार कोटी रुपये मोजून 'फेसबुक'ने इन्स्टाग्रॅम ही मोफत फोटो शेअरिंग ॲप्लिकेशन सेवा देणारी कंपनी तिच्या १३ कर्मचाऱ्यांसह विकत घेतली. २००५ मधील स्थापनेपासून 'फेसबुक'ने कंपनी विकत घेण्यासाठी खर्च केलेली ही सर्वात मोठी रक्कम आहे. 'फेसबुक'चा संस्थापक मार्क झुकेरबर्ग याने या व्यवहाराची घोषणा केली.

इन्स्टाग्रॅम कशासाठी घेतले?

- मोफत फोटो शेअरिंग ॲप्लिकेशन
- यूजर्स फोटो घेऊन त्यावर डिजिटल फिल्टर वापरू शकतात
- सुरवातीला आयफोन, आयपॅड आणि 'आयपॉड टच'ला सेवा
- एप्रिल २०१२ पासून अँड्रॉइडवरही
- ३ कोटींपेक्षा जास्त यूजर्स हे 'इन्स्टाग्रॅम' बलस्थान.
- ९ एप्रिल २०१२ ला फेसबुकने १३ कर्मचाऱ्यासकट कंपनी विकत घेण्याची घोषणा केली. त्यानंतर १० लाखांपेक्षा जास्त यूजर्सची १२ तासांत इन्स्टाग्रॅमसाठी नोंदणी झाली.

*** 'एअरटेल' मोबाईल कंपनीतर्फे आर्थिक व्यवहारांची सुविधा**

मोबाईलच्या सहायाने आर्थिक व्यवहार करण्याची सुविधा भारती एअरटेलने देऊ केली आहे. यासाठी एअरटेलने स्वतंत्र 'एअरटेल-मनी' ही सेवा सुरू केली. ही सेवा दिल्ली आणि चेन्नई पाठोपाठ मुंबईतही सुरू करण्यात आल्याचे एअरटेलच्या एम-कॉमर्स सेवेचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक श्रीराम जगन्नाथन यांनी सांगितले.

श्रीराम म्हणाले, ''ही सेवा देशभरातील ३००हून अधिक शहरांतून उपलब्ध करून देण्यात आली आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तत्काळ पैसे पाठवण्यासाठी अशा प्रकारे सेवा सुरू करणारी एअरटेल ही देशातील पहिली कंपनी आहे. बिले भरणे, मोबाईल रिचार्ज करणे, खरेदीचे व्यवहार करणे, ऑनलाइन

व्यवहार करणे या सर्व गोष्टी एअरटेल मनीच्या सहाय्याने शक्य होणार आहेत.''

एअरटेल मनी ही सेवा भारती एअरटेलची १०० टक्के उपकंपनी असलेल्या एअरटेल एम कॉमर्स सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीतर्फे बाजारात उतरली आहे. या सेवेच्या सहाय्याने देशातील ७ हजारांहून अधिक दुकानांतून एअरटेलची सेवा घेतलेल्या मोबाईलधारकाला खरेदी देखील करता येणार आहे.

*** लोहगावमध्ये भीम फेस्टिव्हल**

''समता, बंधुता आणि न्याय या त्रिसूत्रीची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली असती, तर भारत अमेरिकेपेक्षा महान देश बनला असता. सूर-ताल असल्याशिवाय जसे गाणे तयार होत नाही, तसे समता, बंधुता, न्याय असल्याशिवाय देश उभा राहू शकत नाही. महापुरुषांना व संतांना जातीत वाटण्याचे काम राज्यकर्ते करीत आहेत, अशा प्रवृत्तींना ठेचून काढले पाहिजे,'' असे मत प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी केले.

लोहगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीतर्फे भीम फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले. या वेळी आमदार बापू पठारे, पांडुरंग खेसे, प्रतापदादा खांदवे, जि.प.सदस्या रत्नमाला तळेकर, आदी उपस्थित होते.

प्रा. कवाडे म्हणाले, ''डॉ. आंबेडकरांनी जातीयता नष्ट करण्यासाठी धर्मांतर केले. मात्र, त्याचा काहींनी विपर्यास केला. देश माणसांचा आहे, जातीचा नाही. सत्ता जातीची नसते, माणसांची असते. त्यामुळे जाती नष्ट करण्याची आवश्यकता आहे.''

*** कतार  सर्वाधिक दरडोई उत्पन्न असणारा देश**

कतार हा जगातला सगळ्यांत श्रीमंत देश असल्याचे प्रमाणपत्र अमेरिकेतल्या 'फोर्ब्ज' नियतकालिकाने दिले आहे. आखाती राष्ट्र असलेल्या कतारची लोकसंख्या १७ लाख आहे. नैसर्गिक वायूचा अफाट साठा आणि तेलाच्या वाढत्या किमती या देशाच्या श्रीमंतीला कारणीभूत आहेत.

'फोर्ब्ज'ने प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार कतारमध्ये ढोबळ दरडोई उत्पन्न (जीडीपी) ८८ हजार अमेरिकी डॉलरहून अधिक होते. सध्या कतार गुंतवणूकदारांसाठी आकर्षण ठरले आहे. याचाच परिणाम म्हणून २०२२ मध्ये फुटबॉलची विश्वचषक स्पर्धा कतारमध्ये होणार आहे. शिवाय २०२० च्या ऑलिंपिक स्पर्धांच्या आयोजनातही कतारने रस दाखविला आहे. गुंतवणुकीला आणखी प्रोत्साहन मिळावे यासाठी तेथील सरकार पायाभूत सुविधांना मोठ्या प्रमाणात निधी पुरवत आहे. समुद्रांतर्गत बंदर, एक नवीन विमानतळ व लोहमार्गाच्या जाळ्याचे सक्षमीकरण यांवर खर्च केला जात आहे.

'फोर्ब्ज'ने श्रीमंत देशांच्या या यादीसाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीचा उपयोग करून दरडोई उत्पन्नाचा निकष लावला. या यादीत लक्झेंबर्ग (जीडीपी ८१ हजार डॉलर) दुसऱ्या स्थानावर आहे, तर तिसरे स्थान सिंगापूरला (जीडीपी-

५६,७०० डॉलर) मिळाले. चौथे व पाचवे स्थान अनुक्रमे नॉर्वे व ब्रुनेईला मिळाले.

*** कवी समजून घेताना**

'मित्रांनो, शत्रूंनो' अशा संबोधनानं कवी ग्रेस नेहमी त्यांच्या बोलण्याची सुरुवात करायचे. त्यांची आठवण म्हणून मीही त्याच संबोधनानं सुरुवात करतो. असं म्हणत पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी 'शकुनफुलांचे दिवे' या कार्यक्रमास प्रारंभ केला. ग्रेस यांना स्वरसुमनांजली अर्पण करण्यासाठी 'दीनायन कलापर्व' अंतर्गत या कार्यक्रमात पं. हृदयनाथ मंगेशकर आणि ज्येष्ठ समीक्षक डॉ. द.भि. कुलकर्णी यांनी आपल्या गाण्यांतून आणि साहित्य समीक्षेतून ग्रेस यांच्या आठवणींना उजाळा दिला. एम ए साठी ग्रेस हे द.भि. यांचे विद्यार्थी होते. द.भि. म्हणाले, ''विद्यार्थी असूनही तो मला मित्रासारखाच होता. ग्रेस म्हणजे त्र्यंबक बापूजी ठोमरे उर्फ बालकवी यांनी घेतलेला पुनर्जन्मच असे मला वाटते. त्यांच्या कवितेत आई, नियती, दुःख ही प्रतीकं म्हणून येतात. 'रक्तचंदन' म्हणताना त्याला 'रक्त'चा 'लाल'हा अर्थ अभिप्रेत असतो. आपण रसिक म्हणून अबोध असल्यामुळे कवीलाच दुर्बोध ठरवून टाकतो.''

वाऱ्याने हलते रान, तुझे सुनसान हृदय गहिवरले, तू तेव्हा तशी यांसारख्या गाण्यांच्या सादरीकरणातून कवी ग्रेस यांच्या लेखनप्रतिभेला पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी अभिवादन केलं. पंडितजींनी गायलेल्या गाण्यांना तबल्यावर विशाल गंड्रकवार यांनी आणि साइड ऱ्हिदमवर मंगेश पाठकर यांनी साथ केली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितींपैकी एकाने एक चिठ्ठी द.भि. यांना आणून दिली.

'हे रक्त वाढतानाही, मज आता गहिवर नाही
वस्त्रात द्रौपदीच्याही, तो कृष्ण नागडा होता'...

कवी ग्रेस यांच्या या ओळींचा अर्थ समजावून द्याल का असा प्रश्न चिठ्ठी देणाऱ्याने केला होता. द.भि. म्हणाले. ''तू माझा सखा, पाठीराखा होतास, तरी माझ्यावर वस्त्रहरणाचा प्रसंग आणलास. त्यामुळं आता कितीही वस्त्रं पुरवलीस, तरी माझ्यासाठी तू नागडाच आहेस असा या ओळींचा अर्थ कवीला अभिप्रेत असावा.' ग्रेसची एक कविता म्हणजे एक वाक्य आहे. शब्दशः अर्थ घेऊन ग्रेसच्या कविता समजूच शकत नसल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

*** जपानी - मराठी क्रियापद कोश**

मराठी जपानी क्रियापदांच्या पहिल्या कोशासाठी २५ मार्चला झालेल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत जागतिक कीर्तीचे सात भाषाशास्त्रज्ञ एकत्र आले होते.

जपानी भाषेतील मूलभूत क्रियापद कोशनिर्मितीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जपान सरकारने सुरू केला आहे. टोकियोतील 'राष्ट्रीय जपानी भाषा आणि भाषाशास्त्र संस्थे'तील प्रा. प्रशांत परदेशी मराठी-जपानी कोश प्रकल्पाचे प्रमुख असून जपानच्या कोबो विद्यापीठात डॉक्टरेट करीत आहेत. भाषाशास्त्रावर अनेक आंतरराष्ट्रीय नियतकालिकात त्यांचे संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. जागतिक कीर्तीचे संशोधक त्यांच्या

अद्ययावत संशोधनाचा जपानी भाषेच्या अभ्यासकांना कसा उपयोग होईल, या संबंधी पुण्यातील कार्यशाळेत चर्चा झाली. प्रकल्पाचा उद्देश क्रियापदाचा द्विभाषिक (जपानी-मराठी, जपानी-इंग्लिश, जपानी-चिनी, आणि जपानी-कोरियन) कोश संपादित करणे हा आहे. इंटरनेटच्या मदतीने चीन, कोरिया, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशात एकाच वेळी या प्रकल्पाचे काम सुरू आहे. कोणत्याही भाषेतील वाक्य हे संवादाचे सर्वांत लहान एकक आहे आणि क्रियापद हा वाक्याचा कणा असल्याने, या कोशाचा भर क्रियापदांवर आहे. जपानीसारखी अत्यंत अवघड भाषा शिकणाऱ्यांना हा कोश वरदानच ठरेल.

संपर्क - डॉ. हरी दामले, स्थानिक समन्वयक,

ई-मेल: hari.damle@gmail.com/ मोबाइल: ९८२२२१०९५२.

*** प्रभाकर सोवनी ८५वा वाढदिवस**

सृष्टिज्ञानचे संपादक प्रभाकर सोवनी यांच्या ८५ व्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला (१७ एप्रिल रोजी) फुले वस्तुसंग्रहालयात डार्विनचा प्रयोग हा कथासंग्रह डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते प्रकाशित झाला. साकेत प्रकाशनचे साकेत बाबा भांड, विष्णुपंत गुंडे, डॉ. पुरुषोत्तम जोशी या प्रसंगी उपस्थित होते.

*** चव्हाण यांच्यावरील तीन ग्रंथांचे प्रकाशन**

आपल्या जीवन कालखंडातील तीन महत्त्वाचे टप्पे ग्रंथरूपाने यावेत, अशी यशवंतराव चव्हाणांची तीव्र इच्छा होती. 'कृष्णाकाठ'नंतर त्यांना काळाने हिरावून नेल्याने त्यांचे दोन टप्प्यातील कालखंडाचे ग्रंथ आले नाहीत. पण मुंबईतील सागरी किनाऱ्याचा कालखंड व विचार आणि दिल्लीतील यमुनेकाठच्या वास्तव्यावर आधारित अनुभव लेखनाचे उर्वरित चित्र गोविंद तळवलकर यांच्या पुस्तकरूपाने स्पष्ट केल्याने यशवंतरावाच्या न झालेल्या लिखाणाची भरपाई झाली आहे. असे केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी म्हटले.

गोविंद तळवलकर लिखित मौज प्रकाशनचे 'यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व', पॉप्युलर प्रकाशन तर्फे 'कृष्णाकाठ'ची नवीन मराठी आवृत्ती आणि गायत्री पगडी यांनी इंग्रजी अनुवाद केलेला ग्रंथ अशा तीन ग्रंथांचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले.

राष्ट्रहित आणि समाजकारणाला नेहमी पुढे नेणारे यशवंतरावांचे विचारधन वेगवेगळ्या माध्यमातून युवा पिढीमध्ये नेऊन, त्यांच्यात चांगले आदर्श निर्माण करून तरुणाईला प्रोत्साहन देण्यासाठी हे तीनही ग्रंथ निश्चित उपयोगी पडतील. असे मत पवार यांनी व्यक्त केले. खास करून यशवंतरावांचे विचार राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी 'कृष्णाकाठ'चा हिंदीत अनुवाद करण्याचा गांभीर्याने विचार केला जाईल असे पवार यांनी सांगितले.

❐




*** निर्मला पुरंदरे यांना पुण्यभूषण पुरस्कार**

पुण्यभूषण फाउंडेशन व पुणेकरांच्या वतीने दिला जाणारा 'पुण्यभूषण पुरस्कार' यावर्षी वनस्थळी ग्रामीण विकास केंद्राच्या अध्यक्षा निर्मला पुरंदरे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात महिलांसाठी केलेल्या कार्याबद्दल देण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह व रोख एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

जिल्ह्यातील आय.आय.एम ट्रस्टच्या वतीने फुलगाव येथे निराश्रित बालकांसाठी 'बालसदनाची' स्थापना त्यांनी केली. तसेच त्या विद्यार्थी सहाय्यक समितीमध्ये कार्यकारी विश्वस्त म्हणून कार्यरत होत्या. १९९३ पासून भारत - फ्रान्स सांस्कृतिक देवाणघेवाणीचे उपक्रम करणाऱ्या या संस्थेचे त्या अध्यक्षपद भूषवित आहेत. सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी त्यांना दीनानाथ मंगेशकर ट्रस्टतर्फे 'आदिशक्ती पुरस्कार' देण्यात आला. 'सावित्रीबाई पुरस्कार', 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार' असेही अनेक पुरस्कार लाभले. याच कार्यक्रमात नारायण शुक्ल, विश्वनाथ खांगटे, वसंत जोशी, मधुकर निरफराके व चंद्रकांत बोराटे या स्वातंत्र्य सैनिकांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

*** ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार**

स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे दिले जाणारे २०१०-११ चे ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार खालील लेखक आणि ग्रंथ यांना जाहीर झाले आहेत.

* डॉ. प्र.न. जोशी 'संतमित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार - श्री. प्रशांत हिरे – 'आनंदाचे अंतरंग'.

* डॉ. प्र.न. जोशी 'विज्ञानमित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार - डॉ. विजय बापये - 'कहाणी शस्त्रक्रियेची'.

* डॉ. वि.भि. कोलते 'समीक्षामित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार - डॉ. व.वि. कुलकर्णी

- मराठी प्रबंध सूची

* संजीवनी मराठे 'साहित्यसखी' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार - श्रीमती माधुरी पुरंदरे - 'लिहावे नेटके भाग १ व २'

* श्री. ग.ल. ठोकळ 'ग्रामीण साहित्यमित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार - डॉ. द.ता. भोसले.

* निर्मला व गोपाळ महादेव किराणे 'प्रकाशनमित्र' उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार - श्री. सुनील मेहता - शब्दचर्चा

* डॉ. पंजाबराव जाधव 'समाजमित्र' पुरस्कार - डॉ. प्र. चिं. शेजवलकर

सर्व पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह आणि ३०००/-रुपये असे आहे. पुरस्कार वितरण समारंभ मा. डॉ. राजेंद्र शेंडे यांच्या हस्ते पद्मजी हॉल, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, टिळक रोड पुणे ३० येथे २७ एप्रिल २०१२ रोजी पार पडला.

यावेळी स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे डॉ. प्र. न. जोशी लिखित 'पांचाली' या कादंबरीचे आणि प्राचार्य राम शिंदे यांच्या 'साहित्यश्रेष्ठ ग.ल. ठोकळ' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. आनंद यादव यांच्या हस्ते झाले.

*** शंकर महादेवन यांना 'स्वरगायत्री पुरस्कार'**

'पुणेकरांकडून आजवर मिळालेले प्रेम ही माझ्यासाठी मोठी भाग्याची गोष्ट आहे. देशातील इतर ठिकाणांपेक्षा पुण्याविषयी माझ्या मनात अधिक आपुलकीची भावना आहे,' असे मत प्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी शंकरराव भोई स्मृती प्रतिष्ठानचा 'स्वरगायत्री' पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले. प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल, गायक सईदुद्दीन डागर, चंद्रशेखर गाडगीळ, डॉ. वसंतराव भगली, पोलिस उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरे, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई या वेळी उपस्थित होते.

कमलाकर तपस्वी, माऊली टाकळकर, भाई डोळे, विवेक परांजपे व जहीर दरबार यांना या वेळी 'स्वरयात्री' पुरस्काराने गौरविण्यात आले. भोई प्रतिष्ठानच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटनही या वेळी महादेवन यांच्या हस्ते झाले.

महादेवन म्हणाले, 'अनेक ठिकाणी गाण्याची संधी मिळाली; परंतु पुण्यात गायल्यावर एक प्रकारचे समाधान मिळते. विविध ठिकाणी कला सादर करताना कलाकारांना धावपळ करावी लागते. त्यामुळे त्यांनी स्वत:च्या तब्येतीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या पुरस्काराने प्रेरणा मिळाली असून, आनंद झाला आहे.''

यवतमाळ येथील दीक्षा गायकवाड, अंजली एंडपल्लीवार, सारिका घोसले व वैष्णवी हेमने या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलींच्या हस्ते महादेवन यांचा सत्कार करण्यात आला. या मुलींसाठी महादेवन यांनी 'तारे जमीं पर' या चित्रपटातील 'देखो इन्हे ओस की बुंदें... पत्ते की गोदमें आसमानसे कुदे...' हे गीत सादर केले.

सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

*** बासरीवादक काकडेंना 'स्वरश्री गौरव' पुरस्कार**

श्री अष्टविनायक कल्चरल सेंटर, पुणे आणि स्वरश्री त्रैमासिक यांच्या वतीने संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल बासरीवादक अमित काकडे यांना बासरीवादक पं. केशव गिंडे यांच्या हस्ते स्वरश्री कला गौरव पुरस्कार पुण्याई सभागृहात देण्यात आला. प्रा. जयराम जोशी यांनी संयोजन केले. कल्चरल सेंटरच्या ६९ विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन सादर केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात काकडे यांनी बासरीवादन केले.

*** ॲलेक पद्‌मसी यांना जीवन गौरव पुरस्कार**

'विश्वासार्हता हेच ब्रँडचे दुसरे नाव आहे,' असे मत ॲड. गुरु ॲलेक पद्‌मसी यांनी अल्लाना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सतर्फे आयोजित 'ब्रँड-जाहिरात' या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात व्यक्त केले.

महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पी.ए. इनामदार यांच्या हस्ते ॲलेक पद्‌मसी यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. किरण भट यांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

संस्थेचे संचालक आर. गणेशन आणि गौरी पाठक यांनी लिहिलेल्या 'वन्स अपॉन टाइम इन ब्रँड लँड' या पुस्तकाचेही प्रकाशन यावेळी पद्‌मसी यांच्यासह डॉ. धनंजय केसकर, किरण भट, इनामदार, सबिना संघवी यांच्या हस्ते करण्यात आले.

पद्‌मसी म्हणाले, 'भारतात हजारो ब्रँड तयार होत आहेत. ही मोठी प्रक्रिया असून, तिच्यात विश्वासार्हता निर्माण करावी लागते. विश्वासार्हता हेच ब्रँडचे दुसरे नाव आहे. जाहिरातीच्या कल्पक उपयोगाने ब्रँड तयार होतो, मात्र जनतेच्या स्मरणात तो राहण्यासाठी त्यातील मनोरंजन, संगीत, प्रेरणा आणि उपयुक्तता या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. जाहिरात तयार करताना चांगल्या कल्पनेबाबत आग्रही रहायला हवे.'

*** डॉ. यू. म. पठाण यांना ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार**

संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक पद्मश्री डॉ. यू.म. पठाण यांना यंदाचा महाराष्ट्र राज्य ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अखिल भारतीय स्तरावर संत साहित्याविषयी उत्कृष्ट लेखन करणाऱ्या व्यक्तीला दर वर्षी हा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. एक लाख रुपयांचा हा पुरस्कार आहे. डॉ. पठाण यांनी संत साहित्याविषयी लिहिलेली ४५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. याशिवाय ६ हजार पोथ्या त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागास मिळवून दिल्या आहेत.

*** नातू पुरस्कार**

''आजारपणामुळे माझ्यातील जगण्याची उर्मीच निघून गेली होती. त्यावेळी वडिलांनी संत साहित्यापासून सर्व प्रकारची पुस्तके स्वत: वाचून दाखवली. जीवनाचा नवा अर्थ कळाला. यापुढचे आपले आयुष्य दुसऱ्यासाठीच घालवायचे, असा निश्चय

मी केला आणि काम करीत राहिले....'' अशा शब्दात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना मदतीचा हात देणाऱ्या अपर्णा रामतीर्थकर यांनी भावना व्यक्त केल्या.

नातू फौंडेशनचा स्त्रीशक्ती पुरस्कार त्यांना देण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या  खासदार ॲड. वंदना चव्हाण, क्रीडापटू कविता राऊत यांनाही पुरस्कार जाहीर झाले.

लहानपणी कमी दिसत असल्यामुळे मी पाच वर्षे अंथरुणावर होते. शिक्षणाची आवड असूनही काही कारणांमुळे जास्त शिकता आले नाही, असे स्पष्ट करून रामतीर्थकर म्हणाल्या, ''शिक्षण अर्धवट राहिल्याची बोच राहिली. त्यामुळे मुलगा मोठा झाल्यानंतर वयाच्या ४६ व्या वर्षी मी वकील झाले. अनेक गरीबांना जेवायलाही मिळत नाही हे लक्षात आल्यावर त्यांना डबे देण्यास सुरुवात केली. स्त्रियांच्या आयुष्यातील घरगुती समस्या सोडवल्या. अनाथांना आईची माया दिली तर वृद्धांचा लहान मुलांप्रमाणे सांभाळ केला. आता पारधी समाजातील मुला-मुलींसाठी वसतिगृह बांधायचे आहे.''

आपल्या देशात अनेकजण नि:स्वार्थीपणे हिमालयाएवढे मोठे काम करतात; पण प्रसिद्धीपासून दूर राहतात, असे देखणे यांनी सांगितले. अद्वैता उमराणीकर यांनी सूत्रसंचालन केले.

*** सौमित्र चटर्जी यांना दादासाहेब फाळके पुरस्कार**

गेल्या पाच दशकांपासून आपल्या अष्टपैलू अभिनयाने बंगाली चित्रपटसृष्टी समृद्ध करणारे ज्येष्ठ अभिनेते सौमित्र चटर्जी यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

यंदा दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी प्राण, मनोज कुमार आणि वैजयंतीमाला अशी नावे विचारात होती. निवड समितीने चटर्जी यांच्या नावावर पसंतीची मोहर उमटविली. 'गेल्या पाच दशकांपासून आपण चित्रपटसृष्टीत आहोत. आपल्या या वाटचालीचा यानिमित्ताने योग्य सन्मान होत आहे', अशी भावना सौमित्र चटर्जी यांनी व्यक्त केली. चित्रपटसृष्टीतील आपल्या वाटचालीचे श्रेय सत्यजित राय यांनाच आहे, राय यांच्या मार्गदर्शनाशिवाय हा प्रवास शक्य नव्हता, असे त्यांनी सांगितले. आपल्या कारकिर्दीत अनेक अविस्मरणीय चित्रपट देणाऱ्या या अष्टपैलू देखण्या अभिनेत्याचे चित्रपटसृष्टीत पदार्पण झाले, ते दिग्दर्शक सत्यजीत राय यांच्या 'अपूर संसार' (१९५९) या चित्रपटातून. त्यानंतर राय यांच्या चित्रपटातील 'हुकमी एक्का' म्हणूनच त्यांची ओळख बनली. राय यांच्या तब्बल १४ चित्रपटांत त्यांनी अभिनय केला आहे. यापैकी 'देवी', 'चारुलता' या चित्रपटातील त्यांच्या भूमिका विशेष लक्षवेधी ठरल्या. सदाबहार अभिनयाप्रमाणेच सडेतोड विचारांबद्दलही ओळखले

जाणारे चटर्जी यांनी, राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीमधील परीक्षकांकडून मुख्य प्रवाहातील चित्रपटांवर होत असलेल्या अन्यायाचा निषेध म्हणून २००१ मध्ये राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्यास नकार दिला होता.

*** नृत्यगुरू पं. बिरजूमहाराज यांना स्वरभास्कर पुरस्कार**

पुणे महापालिकेतर्फे प्रदान केला जाणारा स्वरभास्कर पुरस्कार यंदा नृत्यगुरू पं. बिरजूमहाराज यांना प्रख्यात सारंगीवादक पद्मविभूषण पं. रामनारायण यांच्या हस्ते देण्यात आला.

गेल्या वर्षीपासून हा पुरस्कार पं. भीमसेन जोशी यांच्या स्मरणार्थ प्रदान केला जातो. महापालिकेतर्फे पहिला स्वरभास्कर पुरस्कार गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना सितारादेवी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. एक लाख अकरा हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

पद्मविभूषण या सन्मानासह बिरजूमहाराज यांना आजवर संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान पुरस्कार, बनारस हिंदू विद्यापीठाची डॉक्टरेट, लता मंगेशकर पुरस्कार आदी अनेक मानाचे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

*** 'श्रीपाद'चे पुरस्कार**

मामासाहेब देशपांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रीपाद सेवा मंडळाच्या वतीने वेदमूर्ती, संतसाहित्य-आचार्य, विज्ञानाचार्य, उत्कृष्ट साहित्यिक, वेदशास्त्र-अध्ययन, संतसाहित्य अभ्यासक आदी विभागातील पुरस्कारांचे  शिरीष कवडे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

पुरस्कार विजेते वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज स्मृती वेदमूर्ती पारितोषिक – दत्तात्रेय शास्त्री मुरवणे (मालवण).

सद्गुरु योगिराज श्री. वा. द. गुळवणी महाराज स्मृती संतसाहित्य आचार्य पारितोषिक - दा.का. थावरे (सोलापूर),

सद्गुरु योगिराज श्री. द. मामासाहेब देशपांडे स्मृती उत्कृष्ट साहित्य पुरस्कार- आशा बगे (नागपूर),

वेदशास्त्र अध्ययन पुरस्कार - अवधूत साठ्ये (देवरूख)

वेदशास्त्र अध्ययन पुरस्कार - वाचस्पती जोशी (धारवाड)

सद्गुरू मातुःश्री पार्वतीदेवी देशपांडे स्मृती संतसाहित्य अभ्यासक पारितोषिक -  धनंजय चितळे (चिपळूण) आणि सुप्रिया देशपांडे (पुणे)

*** लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकरांना माणिक वर्मा पुरस्कार**

भारत गायन समाज व माणिक वर्मा प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा 'माणिक वर्मा पुरस्कार' यंदा लावणीसम्राज्ञी यमुनाबाई वाईकर यांना देण्यात आला.

दहा हजार रुपये, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यावेळी ज्येष्ठ गायिका जयमाला शिलेदार, ज्येष्ठ व्हायोलिनवादक प्रभाकर जोग, हार्मोनियमवादक सुयोग कुंडलकर, प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचाही गौरव करण्यात आला. यमुनाबाई वाईकरांच्या जीवनावरील ३० मिनिटांची दुर्मिळ चित्रफीत दाखविण्यात आली.

*** डॉ. प्रतिमा इंगोले यांना स्वयंसिद्धा पुरस्कार**

डॉ. प्रतिमा इंगोले यांना त्यांच्या विदर्भातील शेतकरी आत्महत्या संदर्भातील समाजकार्यासाठी लायन्स क्लब ऑफ पुणे एलिटतर्फे स्वयंसिद्धा पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त क्लबतर्फे पत्रकार संघामध्ये आयोजित कार्यक्रमात इंगोले यांना हा पुरस्कार देण्यात आला. महिला पोलिस अधिकारी मृदुला करवंदे यावेळी उपस्थित होत्या.

❐






# सस्तन प्राण्यांचे विलक्षण जग

## मेहता पब्लिशिंग हाऊसचा महत्त्वपूर्ण विज्ञान प्रकल्प




**प्रा. डॉ. किशोर पवार / प्रा. सौ नलिनी पवार**

१० पुस्तकांचा संच / किंमत ११० रु. प्रत्येकी

सभासदांना सवलतीत

# अनोखे सस्तन प्राणी

सस्तन प्राणी हे प्राणिसृष्टीत अधिक विकसित झालेले प्राणी आहेत. आपले जीवन सुखासमाधानाने जगता यावे म्हणून त्यांच्यात कमालीचे समायोजन आढळते.

दक्षिण, उत्तर ध्रुवावर सदासर्व काळ बर्फाचे साम्राज्य असते. अशा प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत ध्रुवीय अस्वल आपल्या वंशाची वेल वाढवित असतात.

शत्रूची थोडीशी जरी चाहूल लागली, तरी मिरकॅट हा प्रेमळ पहारेकरी इतरांना सतर्क करून बिळात जाऊन बसतो.

लांडगा, कोल्हा, कुत्रा यांसारखे शिकारी प्राणी भक्ष्य लीलया पकडतात; कधी एकटे, तर कधी समूहाने. शत्रूपासून बचाव करण्यासाठी स्कंक उग्र दर्प सोडून शत्रूला हुसकावून लावतो.

पांडा तसा दुर्मीळ सस्तन, परंतु उंचावर असलेल्या बांबूच्या वनात त्याचे वास्तव्य असते.

समुद्र सिंह, वालरस, पाणघोडा यांसारखे प्राणी जलचर जीवन जगतात; तर उंट, ऑरिक्स हरीण, सैगा मात्र वाळवंटी प्रदेशात खडतर परिस्थितीशी झुंज देत जगतात.

हरणांचे विश्व अजब आहे. वायुवेगाने धावणारे हरीण, काळवीट, चार शिंगाचा



चौशिंगा, कस्तुरीमुळे आपला मृत्यू ओढवून घेणारा नर कस्तुरी मृग, टुंड्रा प्रदेशातील हरीण कॅरिबू, लांब टांगांचे हरीण मूस, इंपाला, सॅबल, रोऊन यांचे जीवन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अत्यंत उंच डोंगराच्या कड्यांवर राहणारे रान बोकड, डोंगरी मेंढी, बार्बरी मेंढी यांसारखे प्राणीही जगण्यासाठी धडपडत असतात.

भूतलावरचा सर्वात उंच प्राणी म्हणजे जिराफ. त्याचे वास्तव्य आहे फक्त आफ्रिकेच्या जंगलात. कस्तुरी बैलाच्या अंगाला कस्तुरीसारखा वास येतो; परंतु पूर्वी त्याची शिकार झाली ती त्याच्या कातडीसाठी.

भारतात आढळणारा गवा हा दणकट आणि शक्तिशाली असून अमेरिकेतही वैशिष्ट्यपूर्ण गवे आढळतात.

जगाच्या पाठीवर नीलगाय भारताव्यतिरिक्त कुठेही आढळत नाही.

पूर्वी वन्यजीव रक्षणाचे कायदे कडक नव्हते. त्यामुळे अनेक निष्पाप प्राण्यांची मानवाने क्रूरपणे हत्या करून अनेक प्राण्यांना नामशेष केले. पण आता या वन्यजिवांचे महत्त्व मानवाला कळू लागल्यामुळे अभयारण्ये स्थापन करून त्यांना रक्षण दिले जात आहे. निसर्गाचा हा ठेवा जतन करण्याचे कार्य हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी त्याचे संवर्धन करायलाच हवे.



# मनोरंजक सस्तन प्राणी

प्राणीविश्वात सस्तन प्राणी हे इतरांपेक्षा अत्यंत प्रगत मानले जातात. निसर्गाने नानाविध प्रकारच्या अनोख्या, अजब आणि वैचित्र्यपूर्ण प्राणीसृष्टीची निर्मिती केलेली असून या विचित्र प्राणीसृष्टीचा आढावा घेतला म्हणजे आपल्याला आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहात नाही. या आगळ्या-वेगळ्या प्राण्यांना आपले जीवन सुखासमाधानाने जगण्यासाठी अनेकविध गोष्टींचे वरदानही निसर्गाने भरभरून दिले आहे.

सस्तन प्राणी पिलांना जन्म देतात, पण बदकचोच्या प्लॅटिपस अंडी देणारा सस्तन आहे.

वात्सल्यपूर्ण पिशवीधारी कांगारू आपल्या पिलांना पोटाजवळच्या पिशवीत वाढवून ममतेचे मनोज्ञ दर्शन घडवितात.

कोआलासारखा पिशवीधारी प्राणी सदैव झाडावरच राहणे पसंत करतो, तर स्लॉथसारखा प्राणी फांदीला उलटे टांगून चालतो.

काटेरी मुंग्याखाऊ, खवल्या मांजर, आर्मीडिलो यांसारख्या सस्तन प्राण्यांच्या अंगावर संरक्षणासाठी केसांऐवजी लांब, तीक्ष्ण काटे, खवले किंवा चिलखत असते.

बुशबेबी, लेमूर, लोरिस, यांसारखे अनेक निशाचर प्राणी दिवसा झोप काढतात आणि रात्री भक्ष्य शोधार्थ बाहेर पडतात.

महाकाय मुंग्याखाऊ आपल्या चिकट व लांब जिभेने हजारो मुंग्या फस्त करतो.

वटवाघूळ हा एकमेव सस्तन पक्ष्याप्रमाणे आकाशात रात्री भक्ष्य शोधार्थ बाहेर पडतो, तर उडणाऱ्या खारी एका झाडावरून दुसऱ्या झाडावर हवेत तरंगत झेपावतात.

मानवाचा निकटचा नातेवाईक म्हणजे माकड. त्याचेही नाना प्रकार! अगदी सर्वांत लहान माकड म्हणजे मार्मोसेट. त्याचे वजन असते जेमतेम १०० ग्रॅम, पण मादी नेहमी जुळ्यांना जन्म देते.

बबून माकडे जरी आक्रमक आणि धोकादायक असली, तरी ओरँग उटान माकडे शांत आणि बुद्धिमान असतात. चिंपाझी, गोरिला ही मानवाशी अधिक जवळचे नाते सांगणारी धिप्पाड माकडे आफ्रिकेच्या जंगलात आढळतात.

बीव्हर हा प्राण्यांमधला उत्तम अभियंता म्हटला पाहिजे, कारण तो उत्तम बंधारा बांधतो.

अनेक सस्तन प्राणी जलचर जीवन जगतात. जगातील सर्वांत मोठा प्राणी म्हणजे निळा देवमासा. तो सागरात राहतो.

डॉल्फीन हा अधिक बुद्धिमान जलचर सस्तन सुपरिचित आहे.

हंसक देवमासा तर अत्यंत क्रूर म्हणून ओळखला जातो.

भूतलावर वाघ, सिंह, चित्ता, बिबळ्या यांसारखे अनेक हिंस्र प्राणी आहेत. त्यांची भक्ष्य पकडण्याची पद्धत, त्यांचे समाजजीवन, बछड्यांचे संगोपन, जीवन

जगण्यासाठी चाललेला संघर्ष पाहिला म्हणजे आपण चक्रावून जातो.

बिबळ्या तर आपल्या वजनापेक्षाही मोठे भक्ष्य झाडावर नेऊन शत्रूपासून सुरक्षित ठेवतो व आरामशीरपणे त्यावर ताव मारतो. सिंहाची मादी झेब्रा, ग्न्यूसारख्या (Wild Beast) बलदंड प्राण्यांची शिकार मोठ्या खुबीने करते, पण शिकारीतला नर सिंहाचा वाटा त्याला अगोदर देते.

जगातील वेगवान प्राणी म्हणून चित्ता ओळखला जातो. तो आता जगात फक्त आफ्रिकेच्या जंगलात आढळतो.

नानाविध प्रकारच्या या सस्तन प्राण्यांमुळे आपली सृष्टी वैशिष्ट्यपूर्ण बनलेली आहे. मानवाने निसर्गावर केलेल्या आक्रमणामुळे या जीवसृष्टीला ग्रहण लागले आहे. चोरट्या मार्गाने हत्तीदंतासाठी हत्तींची, सुंदर कातडी व नखांसाठी वाघ, चित्ता यांची शिकार केली जात आहे. त्यामुळे निसर्गाच्या या ठेव्याचे आस्तित्व धोक्यात आले आहे. त्यांना अभय, संरक्षण देण्याचे काम हे मानवाचेच आहे.

या अनोख्या सृष्टीची शालेय, महाविद्यालयीन पिढीला ओळख व्हावी, तिचे संरक्षण व्हावे हादेखील हेतू या मालिकेच्या लेखनामागे आहे.



# कोंबडीएवढ्या छोट्या आणि जिराफांपेक्षा मोठ्या डायनोसॉर्सचा सुवर्णकाळ

'ज्युरासिक पार्क' या सुप्रसिद्ध चित्रपटामुळे भूतलावरील एके काळी अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि अचानक नामशेष झालेल्या डायनोसॉर या विचित्र प्राण्याची ओळख सर्व जगाला झाली. मध्यजीव महाकल्पातील (मेसोझोइक इरा) ज्युरासिक कालखंड हा डायनोसॉरचा सुवर्णकाळ होता. या कालखंडात कोंबडीएवढ्या लहान डायनोसॉरपासून ते प्रचंड, धिप्पाड, महाकाय आकाराच्या डायनोसॉर्सचा संचार भूतलावर होता. हे प्राणी जसे शाकाहारी, तसेच हिंस्र व मांसाहारीही होते. काही जमिनीवर राहत, काही जलचर होते आणि काही तर चक्क आकाशात उड्डाण करीत. अचानक हे प्राणी नामशेष झाले आणि मागे ठेवून गेले आपले जीवाश्मरूपी अवशेष! त्या जीवाश्मांवरूनच संशोधकांनी या प्राण्यांची रचना, आकार, प्रतिकृती तयार केली. त्यांच्या पावलांच्या ठशांवरून ते एकटे राहत की कळपाने याचा वेध घेतला. त्यांच्या सवयी, वर्तन, आहार, पर्यावरण, प्रजोत्पादन आदी गोष्टींचा अभ्यास करून ठोस निष्कर्ष काढले. आज जगभर डायनोसॉर्सच्या जीवाश्मांचा शोध घेतला जात आहे. अनेक संग्रहालयांमध्ये त्यांच्या सांगाड्यांची मांडणी केलेली दिसते.

अमेरिकेच्या न्यूयॉर्क येथील नॅचरल हिस्ट्री म्युझियमच्या तळमजल्यावरील डायनोसॉरचा भव्य-दिव्य सांगाडा पाहून आपण दिपून जातो. जिवंतपणी हा प्राणी किती महाकाय असेल याची कल्पना येते.

हे प्राणी का नामशेष झाले असावेत? त्या काळात तर मानवाचा उदयही झालेला नव्हता. त्यामुळे कोणत्या नैसर्गिक कारणांमुळे ह्या प्राण्यांनी जगाचा कायमचा निरोप घेतला असावा, हे संशोधकांना अजूनही न उलगडलेले कोडे आहे.मी प्राणिशास्त्राचा विद्यार्थी! शिकत असतानाच या अद्‌भुत प्राण्यांबद्दल मला कमालीची जिज्ञासा होती. नंतर प्राध्यापक म्हणून हा विषय शिकवितानाही या अजब प्राण्यांबद्दल कुतूहल होते. मी अनेक संदर्भग्रंथ अभ्यासले. अमेरिकेत या प्राण्याचे महाकाय सांगाडे पाहिले आणि 'डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व' हे स्वतंत्र पुस्तक तयार केले. इंग्रजीत विपुल माहिती असली, तरी मराठीत मात्र या प्राण्यांबद्दल माहिती उपलब्ध नाही. मराठी वाचकांना ही माहिती मिळावी हादेखील पुस्तक लिहिण्यामागे एक हेतू होता.

# उभयचर प्राण्यांचा पूर्वज
# २.७ मीटर लांबीचा बेडूक
# उभयचरांचे अनोखे विश्व

पावसाळ्यात येणारा बेडकांचा 'डराव डराव' आवाज सर्वांनाच परिचित आहे. अनेक छोट्या-मोठ्या बेडकांचा वैशिष्ट्यपूर्ण आवाज म्हणजे निसर्गाचे संगीतच म्हटले पाहिजे. बऱ्याचदा रस्त्याने चालताना एखादा बेडूक किंवा भेक टुणकन उडी मारून आपले लक्ष वेधून घेतो. जमिनीवर पदार्पण करणारे हे खरं तर पहिले प्राणी आहेत. ३५ कोटी वर्षांपूर्वी हे प्राणी माशांपासून विकसित झाले. आज अस्तित्वात असलेल्या उभयचर प्राण्यांचा पूर्वज महाकाय बेडूक हा २.७ मीटर लांबीचा होता. या प्राण्यांना उभयचर प्राणी म्हणून ओळखले जाते. त्याचे कारण म्हणजे ते आपल्या जीवनचक्रातील काही अवस्था पाण्यात विकसित करतात. हे प्राणी आपली अंडी पाण्यात घालतात. बेडकाचा विकास पाण्यात होतो आणि पक्व झालेले प्राणी



पाण्याबाहेर जमिनीवर राहतात.या बेडकांचेदेखील अनेक प्रकार आहेत. काही महाकाय वजनदार, तर काही किरकोळ देहयष्टीचे आणि झाडांवर राहणारे. बेडकांचेच भाऊबंद भेक हे पाण्यात सहजतेने पोहू शकत नाहीत; परंतु ते विषारी असतात. हे दोन्हीही उभयचर शेतकऱ्यांचे मित्र आहेत, कारण ते उपद्रवी कीटकांचा फडशा पाडतात.

सापकिरम किंवा सिसिलियन्स हे तर हातपाय नसलेले साप किंवा गांडुळासारखे उभयचर प्राणी! बिळात राहत असल्यामुळे ते आंधळे असतात, पण त्यांची मादी आपल्या अंड्यांची जिवापाड काळजी घेते. अंड्याभोवती ती वेटोळे करून बसते.

**शेपूटधारी उभयचर न्यूट व सॅलॅमँडर हे जलचर, भूनिवासी आणि झाडांवर वास्तव्य करणारे आहेत.** या प्राण्यांचे जीवन म्हणजे चमत्कारच! पक्षी तसेच सस्तन प्राण्यांपेक्षा अप्रगत असलेले हे उभयचर प्राणी विशेषत: बेडूक व भेक ममतेचे जे अनोखे, आगळे-वेगळे, दर्शन घडवितात, ते पाहून निसर्गाच्या किमयेचे कौतुक वाटते. आपली जीवसृष्टी किती विविधतेने नटलेली आहे याची जाणीव जिज्ञासू वाचकाला झाल्याशिवाय राहणार नाही. हा निसर्गाचा अमोल ठेवा आपण जतन केला पाहिजे, ही भावनादेखील या मालिका-लेखनामागे आहे. पूर्वी फार मोठ्या प्रमाणात परदेशात बेडकांच्या तंगड्यांची निर्यात केली जात असे, कारण पाश्चात्य राष्ट्रांमध्ये पंचतारांकित हॉटेल्समध्ये हे खाद्यपदार्थ मोठ्या चवीने लोक खातात. दर वर्षी विज्ञान महाविद्यालयांमध्ये लाखो बेडूक शवविच्छेदनाच्या अभ्यासासाठी मारले जात; परंतु आता कायद्याने या साऱ्याच गोष्टींवर बंदी आणल्यामुळे काही प्रमाणात या प्राण्यांना अभय मिळाले आहे. हे प्राणी अन्नसाखळीमधले अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत, त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.



# निसर्गाचे संतूलन राखणाऱ्या सर्पसृष्टीची चमत्कृतिपूर्ण किमया अजब सर्पसृष्टी

साप मानवाचा खरा मित्र असून अत्यंत भित्रा प्राणी आहे, परंतु सापांबद्दल जनमानसांत अनेक गैरसमजुती आणि अंधश्रद्धा आहेत, त्यामुळे या प्राण्याबद्दल माणसांच्या मनात अकारण भीती आहे. सर्पदंश म्हणजे अटळ मृत्यू हे समीकरण लोकांच्या मनात रुजले आहे, त्यामुळे साप दिसला की, त्याला लोक लाठ्या-काठ्यांनी ठार मारल्याशिवाय राहत नाहीत. जगातील एकूण सापांपैकी पाच टक्के साप विषारी आहेत. सापांबद्दल जनमानसात रुजलेले गैरसमज दूर करणे, ही काळाची गरज आहे. सापांबद्दलची भीती दूर करून साप हे आपले मित्र आहेत, ही भावना रुजवणंही गरजेचं आहे.

सर्पसृष्टी कमालीची चमत्कृतिजन्य आहे. भूतलावर नानाविध साप अस्तित्वात आहेत. काही वृक्षनिवासी, तर काही 'आयत्या बिळ्यात नागोबा' यां सारखे. काही गोड्या पाण्यात राहणारे, काही सागरात राहणारे अत्यंत विषारी साप. काही साप चक्क उडणारे तर काही अंडी फस्त करणारे.

अजगरासारखे अजस्त्र साप मोठमोठ्या सस्तन प्राण्यांनाही आवळून ठार मारतात आणि गिळून टाकतात.

साप खरंतर अत्यंत बहुगुणी आहेत. सापाचं विष अनेक रोगांवर अत्यंत गुणकारी ठरत आहे. चीन, ब्रह्मदेश देशांमध्ये या ठिकाणी अत्यंत रुचकर अन्न म्हणून साप खातात. सापाची हत्या त्याच्या सुंदर व टिकाऊ कातडीसाठीही केली जाते. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये तर पर्सेस, सिगारेट केसेस, जॅकेट्स, टोप्या, नेकटाय, दागिन्यांच्या पेट्या, बूट, पट्टे यांसारख्या वस्तू सापाच्या कातडीपासून तयार करतात; इतकंच नव्हे, तर शत्रूच्या सैन्याला ठार मारण्यासाठीही पूर्वी जिवंत सापांचा वापर करत असत.

अशा या अजब सर्पसृष्टीबद्दल जनसामान्यांना ओळख व्हावी, हा या लिखाणामागचा हेतू आहे. विषारी व बिनविषारी साप कसे ओळखावेत? साप दंश कसा करतो? त्यावर प्रथमोपचार आणि दीर्घोपचार काय करावेत? सर्पदंश कसा टाळावा? सर्पप्रतिबंधक लस कशी तयार करतात? यांसारख्या प्रश्नांची उत्तरं द्यायचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

अनेक लोकांना सर्पपालनाचा छंद असतो. देशात-परदेशात सर्पोद्याने असतात, त्यामुळे सर्पसृष्टीचे उत्तम ज्ञान तर होतंच, पण या निसर्गदत्त वारशाबद्दल माहितीही

मिळते.

जगभरात बहुसंख्य साप बिनविषारी आढळतात. काही साप अत्यंत विषारीदेखील असतात. त्यांची तोंडओळख, त्यांची वैशिष्ट्ये यांची माहिती होणे गरजेचे आहे.

सापांच्या भयामुळे, त्यांच्या संहारक शक्तीमुळे लोक सापांना पूज्य मानू लागले. अनेक देशांमध्ये सर्पदेवतेची पूजा होते. सापांचे दर्शन म्हणजे शुभशकुन, असं जपानी लोक मानतात.

सर्पसृष्टी म्हणजे निसर्गाचं मोठं वरदान आहे. या निसर्गदत्त वारशाची ओळख व्हावी, या उद्देशाने प्रस्तुत पुस्तकाचे लेखन केले आहे.



# सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग

# इग्वाना, पाली, मगर, कासव

सरीसृप तथा सरपटणारे प्राणी हे जमिनीवर वावरणारे पहिले खवलेधारी प्राणी आहेत. साप, सरडे, पाली, मगर, कासव कुणाच्या परिचयाचे नाहीत? रंग बदलणारा सरडा असे बेमालूम रंग बदलतो की, जवळ असूनही शत्रूला त्याचा थांगपत्ता लागत नाही. बंदुकीतून गोळी सुटावी तशी तो तोंडातून आपली लांब जीभ भक्ष्यावर अचूकपणे सोडून त्याला तितक्याच वेगाने तोंडात खेचून फस्त करतो. हे पाहिल्यावर आपण क्षणभर स्तिमित होतो. शत्रूशी निकराची झुंज देणारा रंगीबेरंगी झालरधारी सरड्याचा उग्र अवतार पाहून निसर्गाच्या किमयेचे कौतुक वाटते. काही सरडे पाण्यावरून अथवा पाण्याखालून दोन पायांवर धावतात.

वाळवंटी प्रदेशात आढळणारा काटेरी सरडा, शिंगधारी सरडा, उडणारा सरडा, अजस्त्र सरडा म्हणजे इग्वाना! हा सर्व निसर्गाचा अनोखा नजराणाच म्हटला पाहिजे. जगण्यासाठी व वंशविस्तारासाठी त्यांची चाललेली धडपड अजब वाटते. टुआटारासारखा विचित्र जिवंत जीवाश्म म्हणजे निसर्गाचा चमत्कारच आहे. कोट्यावधी वर्षांपासून त्यामध्ये किंचितही बदल झाल्याचे आढळत नाही.

ॲलिगेटर, मगर, केमन, घडियाल, कासव हे सरीसृप अन्न, निवारा आणि संरक्षण यासाठी दुय्यमरीत्या जलनिवासी बनले आणि पुढे जलसम्राट बनले. भक्ष्यावर छुपा हल्ला करण्याची मगरीची क्रूर आणि घातक पद्धत पाहून आपलीही भीतीने गाळण उडते. मगरमिठीत सापडलेल्या भक्ष्याची सुटका अशक्यच असते! पाण्यात बुडवून ठार मारण्याची कला



विशेष म्हटली पाहिजे. जमिनीवरची व पाण्यातील कासवे मात्र काहीशी गरीब असतात, त्यामुळे त्यांचे पालन करता येते. १५० ते २०० वर्षांचे त्यांचे आयुष्य म्हणजे निसर्गाने दिलेले वरदानच म्हटले पाहिजे. परंतु या निसर्गाच्या ठेव्याची मानवाने सुरू केलेली कत्तल अमानुष आहे. अज्ञान, गैरसमजुती व अंधश्रद्धांमुळे या प्राण्यांची कत्तल केली जाते. कातडी, मांस, चरबी व औषधी घटक यासाठी हत्या केल्यामुळे त्यांची संख्या तर घटत आहेच, पण अनेक जाती कायमच्या नष्ट झाल्या आहेत. काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यासाठी कडक कायदे आणि जनजागृती व या जीवांबद्दल जिव्हाळा निर्माण करण्याची गरज आहे.

'सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग' या पुस्तकात फक्त सरडे, मगर व कासवे या वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांचा आढावा घेतला आहे. 'अजब सर्पसृष्टी' व 'डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व' ही दोन पुस्तके स्वतंत्ररीत्या लिहिली आहेत.



# जलसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट
# वेगवेगळ्या आकाराचे जलचर

माशांचे विश्व खरेच अजब आणि विस्मयकारक आहे. सागर म्हणजे रंगीबेरंगी, चित्रविचित्र माशांची खाणच आहे. अशा नानाविध माशांची निसर्गाने कशी निर्मिती केली असेल, हे एक कोडेच आहे. काही अत्यंत अप्रगत मासे, काही गोल तोंडाचे आणि काही चक्क रक्तपिपासू.

घोडतोंड्या मासा तथा समुद्री ड्रॅगन हा एक अजब नमुनाच म्हटला पाहिजे. अंडी उबविण्याचे काम चक्क नरालाच करावे लागते, तेसुद्धा आपल्या पोटाजवळच्या पिशवीत. सागरतळाशी अत्यंत चपटे मासे स्वत:ला वाळूत पुरून घेऊन भक्ष्याला पकडतात, तर डोक्यावरील लांब दांडा असलेले व टोकाला चामरसारखा अवयव असलेले गळमासे भक्ष्याला आमिष दाखवून हे भक्ष्य खुबीने पकडतात. मांजर माशांना तर खालच्या-वरच्या ओठांना मांजरासारख्या मिश्या असतात. शत्रूला भीती दाखविण्यासाठी व आत्मरक्षणासाठी फुगरा माशांत व साळिंदर माशांत सर्वांगावर साळिंदरसारखे तीक्ष्ण काटे असतात. सूर्यासारख्या गोल असलेल्या सूर्यमाशाला शेपटीचा पत्ताच नसतो. विंचू मासा तथा सिंह माशाचा डौल म्हणजे काही औरच असतो, तर रेमुरा दुसऱ्या प्राण्यांना चूषकाच्या साहाय्याने चिकटून परावलंबी जीवन मोठ्या कौशल्याने जगत असतो.

सापासारखे वांबमासे, दुसऱ्या मोठ्या माशांची साफसफाई करणारे व संरक्षण मिळविणारे मासे, पांढरे फटफटीत हिम मासे, सोंडेसारखे तोंड असलेले हत्ती मासे, खोल सागरात कड्याकपारी किंवा गुहेत राहणारे अंध मासे, आवाज काढणारे मासे, पाण्याबाहेर उडणारे फुलपाखरू मासे, काही अत्यंत गरीब, तर काही अत्यंत क्रूर व हिंस्र बॅराकुडासारखे मासे, चोचधारी, शक्तिशाली बलदंड मार्लिन्स मासे म्हणजे निसर्गाचे अजब नमुने आहेत. काही मासे आपल्या वंशाच्या विस्तारासाठी तोंडात अंडी उबवितात. एक ना दोन! अशा असंख्य वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींनी नटलेल्या सागराच्या उदरातील या निसर्गदत्त ठेव्याची ओळख व्हावी हा हेतू या पुस्तकाच्या लेखनामागे आहे.

# विस्मयकारक जलसम्राट मासे

निसर्गाची नवलाई पाहून माणूस थक्क होतो. जलसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट म्हणजे मासे. नदी, नाले, तळी, सरोवरे, सागर, महासागर यांमध्ये निवास करणारे लक्षावधी प्रकारचे रंगीबेरंगी, चित्रविचित्र आकाराचे मासे पाहून निसर्गाच्या किमयेचे खरोखरच कौतुक वाटते. अनादी काळापासून मानवाने या मत्स्यसृष्टीचा अत्यंत उत्तम प्रकारे स्वत:च्या फायद्यासाठी वापर करून घेतला आहे. अन्न, तेल, खते यांसारख्या गोष्टी माशांपासून मिळविल्या आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या बळावर मत्स्यशेतीसारखा उद्योग विकसित केला आहे.

मत्स्यसृष्टी खरेच अनोखी आणि विस्मयकारक आहे. काही मासे कूर्चामय तर काही अस्थिमीन! काही मासे अत्यंत प्राथमिक अवस्थेतील, तर काही अत्यंत प्रगत! अनेक मासे कायमचे नामशेष झालेले! असंख्य प्रकारचे शार्क किंवा मुशी मासे यांना तर सागराचे सम्राटच म्हटले पाहिज.

हातोड्यासारखे डोके असलेला शार्क म्हणजे अजब नमुना आहे. स्टिंग रे दंश करतो, तर टॉरपेडो तथा इलेक्ट्रिक रे चक्क विजेचा शॉक देतो. अनेक मासे प्रकाशनिर्मिती करतात. कित्येक मासे विषारी असतात. ते खाल्ल्याने जीव जातो.

हिल्सा इल, सामन यांसारखे मासे पट्टीचे पोहणारे. ते सागराकडून नदीच्या मुखाकडे, तर नदीकडून सागराकडे हजारो कि.मी. स्थलांतर करतात. ही सारी धडपड असते यशस्वी प्रजोत्पादन आणि वंशवृद्धी यासाठी!

माशांमधील समायोजन तथा परिस्थितीशी मिळतेजुळते घेण्याचे कौशल्य कमालीचे विस्मयकारक आहे. दलदलीत, गुहेत जेथे प्रकाशाचा किरण पोहोचत नाही, अशा खोलवर सागरतळाशीही ते वास्तव्य करतात. त्यामुळे त्यांचे आकार बदलतात. जगण्याच्या तऱ्हाही बदलतात. काहींचे शरीर चेंडूसारखे गोल, तर काहींचे फुगरे, काटेरी बनते.

उडणारा मासा तर चक्क पाण्याबाहेर ५० ते ६० फूट हवेत झेप घेऊन पुन्हा पाण्यात शिरतो. गळमासे आपल्याच शरीराच्या अवयवाचा गळ भक्ष्याला आमिष म्हणून दाखवून फस्त करतात.

प्रगत प्राण्यांप्रमाणेच मासेही वात्सल्याचे मनोज्ञ दर्शन घडवितात.

आपल्या अंड्यांची, पिलांची उत्तम काळजी घेतात. अंडी उबविण्याचे काम घोडामाशात मातेऐवजी पित्यालाच करावे लागते.

मांजर माशात नराला आपल्या तोंडातच अंडी उबविण्याचे काम करावे लागते. अनेक सुंदर, आकर्षक रंगरूपाचे, आकाराचे मासे घरातील मत्स्यालयात ठेवून लोक त्याचा आनंद घेतात. गृहशोभेबरोबच अशा माशांकडे बघून हृदयविकारासारख्या आजाराचा धोका टाळता येतो. त्यासाठी गप्पी, गुरामी, सोनेरी मासे, सोअर्ड टेल, देवदूत मासे, सयामीज फायटिंग फिश यांसारखे सुंदर, चित्ताकर्षक मासे पाळले जातात. जलसम्राट माशांचे विश्व खरोखरच अजब आणि कुतूहलमय असे आहे.



# अफाट अवकाशाचे प्रवासी आकाशसम्राट पक्षी

आकाशात लीलया संचार करणाऱ्या रंगीबेरंगी, आकर्षक आणि चपळ पक्ष्यांचं जग पाहिल्यावर आपण थक्क झाल्याशिवाय राहत नाही. पक्ष्यांना निसर्गाने पंखांची देणगी दिल्यामुळे ते गगनाला गवसणी घालतात. आकाशात ते वेगाने उडतात. मानवाला पक्ष्यांबद्दल अनादी काळापासून कुतूहल आहे. या आकाशसम्राट पक्ष्यांपासूनच मानवाला विमानाची कल्पना सुचली. भूतलावर प्राचीन काळीदेखील प्रचंड देहयष्टीचे हत्ती पक्षी अस्तित्वात होते. डोमॉर्निससारखे अवजड व वजनदार पक्षी होते. डायनॉर्निससारखे भूतलावरचे सर्वांत उंच पक्षी म्हणजे मोआ पक्षी होते. त्यांचे पाय उंच व मजबूत होते, परंतु या पक्ष्याला उड्डाण करता येत नसे. त्यांना अत्यंत वेगाने धावता येत असे. त्यांना नामशेष केले ते मूरी लोकांनी! त्या काळी अर्जेंटाव्हिस नावाचा उड्डाण करणारा सर्वांत मोठा पक्षी होता. ह्या पक्ष्याची उंची ११ फूट होती, तर पंखांचा विस्तार २५ फुटांपर्यंत होता. आज हा पक्षीही नामशेष झाला आहे. विपुल संख्येने आढळणारे प्रवासी कबुतरासारखे पक्षी केवळ मांसासाठी ठार मारल्यामुळे सन १९०० मध्येच नामशेष झाले.

आज भूतलावर अनेक सुंदर पक्षी आहेत. काही वाळवंटी प्रदेशात, तर काही पाणथळ दलदलीच्या ठिकाणी राहतात. कॅसोवेरी, शहामृग, एमू, टर्की, किवी यांसारख्या आकर्षक पक्ष्यांना जरी उडता येत नाही, तरी ते वसुंधरेचे अलंकार आहेत. अनेक पक्ष्यांना निसर्गाने आकर्षक रंगांचे भरभरून वरदान दिले आहे. नर पक्ष्यांचे रंग अधिक भडक व आकर्षक असतात, त्यामुळेच ते मादीला भुरळ घालतात. पक्ष्यांची प्रणयक्रीडाही अनोखी असते. मादीला आकर्षित करण्यासाठी नर नाना युक्त्या योजतात.

पक्षीविश्वात अनेक पक्षी शिकारी पक्षी म्हणून सुपरिचित आहेत. त्यात घार, गरुड, घुबड, कैकर, सचिव पक्षी यांचा समावेश होतो. हे पक्षी भक्ष्याचा अचूक वेध घेऊन त्याला जायबंदी करतात. गिधाडासारखा पक्षी तर मृत प्राणी, नासके-कुजके मांस खाऊन जंगलाचे आरोग्य राखतो. अनेक पक्षी उपद्रवी कीटक, वाळवी, अळ्या फस्त करून

शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी टाळतात.

भूतलावर अनेक विचित्र पक्षीही आहेत. टाऊकन पक्ष्याची चोच भली मोठी असते. धनेश पक्ष्याची चोच शिंगासारखी. अनेक पक्षी आपल्या पिलांचे संगोपन वैशिष्ट्यपूर्ण रितीने करतात, तर काही पक्षी चक्क दुसऱ्या पक्ष्यांची अंडी चोरून फस्त करतात.

रातवासारखा पक्षी रात्री शत्रूला दिसणार नाही अशा पद्धतीने सभोवतालच्या वातावरणाशी इतका एकरूप होतो की, शत्रू त्याला पकडू शकत नाही. सर्वच पक्षी आपली अंडी शरीराच्या तापमानाने उबवितात. परंतु तापमापी पक्षी मात्र कुजणारा पालापाचोळा जमवून, घरट्यात अंडी घालून जमिनीत पुरून टाकतो व त्यातून मिळणाऱ्या उष्णतेने अंडी उबवितो. कोकिळा तर कावळ्याच्या घरट्यात अंडी घालून त्यांना ते काम करायला भाग पाडते.



# हजारो वर्षांपासून नियमितपणे स्थलांतर करणारे पाणथळीतले पक्षी

पक्ष्यांचे एक आगळे-वेगळे वैशिष्ट्य म्हणजे स्थलांतर! अनेक पक्षी निसर्गाने निर्माण केलेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी स्थलांतर करतात. जिथे विपुल अन्न असेल, प्रजोत्पादनासाठी पोषक वातावरण असेल, अशा भूप्रदेशाकडे ते स्थलांतर करतात. त्यासाठी हजारो मैल उड्डाण करतात. आपल्याकडे दर वर्षी हिवाळ्यात भरतपूर, नांदूर, माध्यमेश्वर अशा पाणथळीच्या ठिकाणी हजारो, लाखो पाहुणे पक्षी येतात.

स्थलांतराची प्रेरणा पक्ष्यांना का व कशामुळे मिळते? हे पक्षी इतका दूरवरचा प्रवास कसा करू शकतात? पुन्हा ते आपल्या मूळ भूप्रदेशाकडे न चुकता कसे पोहोचतात? यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे अजूनही पक्षीतज्ज्ञांना समाधानकारकपणे देता आलेली नाहीत.

दलदल, पाणथळ, अशा ठिकाणी स्थलांतरित पक्षी हजारो, लाखोंच्या संख्येने येतात. त्यात प्रामुख्याने करकोचे, बदक, रोहित, सारस, शेकाट्या, आवाक, उचाट, कोरल, माळकोरल, कुरव, सुरय इ. पक्षी असतात. अशा ठिकाणी नर-मादीच्या जोड्या जमतात. ते घरटे बांधतात. प्रजोत्पादन करतात. आपल्या पिलांना घेऊन पुन्हा ते आपल्या मायदेशी परततात. दलदलीच्या जागेवर असंख्य जलचर कृमी, शंखशिंपले, मासे यांसारखे उत्तम खाद्यान्न त्यांना मिळते. हे अन्न शोधण्यासाठी, पकडण्यासाठी निसर्गाने त्यांना वैशिष्ट्यपूर्ण चोचीची देणगी दिलेली आहे. **त्यात काहींच्या चोची तीक्ष्ण, लांब कुदळीसारख्या, तर काहींच्या पसरट बदकाच्या चोचीसारख्या किंवा चमच्यासारख्या असतात.** त्यांचे पाय लांब, उंच असतात. चिखलात रुतू नयेत म्हणून पायांच्या बोटांमध्ये पडदे असतात.

अनेक पक्षी समुद्रकिनाऱ्याजवळ विपुल संख्येने राहतात. ते जवळच घरटी करतात. त्यांच्या प्रचंड वसाहती पाहून आपण थक्क होतो. या पक्ष्यांमधील अन्न मिळविण्याच्या पद्धती, प्रणयक्रीडा, प्रजोत्पादन व पिलांचे संगोपन हे सारेच अजब वाटते. पाणबुड्यासारखे पक्षी पाण्यात बुडी घेऊन मासे पकडतात. जलकपोतसारखे पक्षी पाण्यातील वनस्पती, लिलीची पाने यांवरून सहजपणे चालू शकतात.

अॅल्बॅट्राससारखे विशाल पंखांचे पक्षी सागरावर वाऱ्यावर तरंगतात. त्यांना लांब पंख व आखूड पाय यामुळे जमिनीवर राहणे अवघड बनते. त्यांना उड्डाणासाठी पोषक परिस्थिती नसेल व उडण्याची बळजबरी केली, तर ते आपल्या जठरातील तेल

ओकून टाकतात. हे पक्षी अत्यंत शांत असतात. ते पिलांना आपल्या पोटातील अन्न ओकून भरवितात.

फ्रिगेट पक्षी तर इतर पक्ष्यांची अंडी पळवून नेतो. छातीवरील लालबुंद पिशवी फुगवून मादीला आकर्षित करण्यासाठी तो धडपडत असतो. बर्फाळ प्रदेशात सदासर्वकाळ राहणारा पेंग्विन पक्षी किती कठीण आणि खडतर जीवन जगतो याची कल्पना त्याच्या जीवनप्रणालीवरून येते. अशा अनेकविध पक्ष्यांची माहिती प्रस्तुत पुस्तकात दिली आहे.

मानवाच्या निसर्गातील अक्षम्य हस्तक्षेपामुळे अनेक पक्ष्यांची अमानुष कत्तल होत आहे; अनेक जाती नष्ट झाल्या आहेत. डोडो हा बदकासारखा पक्षी त्यामुळेच नष्ट झाला आहे.

❒



आगामी




# इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स

**डॉ. अरुणा कौलगुड**

इंटरव्ह्यू म्हटले की इंग्रजीतून बोलणे, टाय लावणे, कडक शेकहँड करणे, अशा गोष्टींनाच अनावश्यक महत्त्व दिले जाते. इंग्रजी माध्यमाच्या शाळा-कॉलेजांत शिकलेली मुले जे काही इंग्रजी बोलतात, त्यामुळे लहान शहरांतील, गावांतील मुले-मुली भारावून जातात. आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही याचा न्यूनगंड त्यांच्या मनात तयार होतो....

नोकरीसाठी अर्ज कसा लिहायचा, स्पर्धा परीक्षेसाठी ग्रुप डिस्कशनची तयारी कशी करायची या सर्व गोष्टींबद्दल त्यांच्यामध्ये अनभिज्ञता असते; त्यामुळे अनेकदा ते आपली माहिती प्रभावीपणे मांडू शकत नाहीत.

म्हणूनच महाराष्ट्रातल्या सर्व लहान-मोठ्या गावांमध्ये, शहरांमध्ये राहणाऱ्या; स्पर्धा परीक्षांची, इंटरव्ह्यूची तयारी करत असलेल्या मुला-मुलींसाठी हे पुस्तक तयार केले आहे.

इंटरव्ह्यू देताना विविध प्रश्नांची उत्तरं कशी द्यायची, इंटरव्ह्यूच्या वेळी पाळायचे शिष्टाचार आणि आवश्यक देहबोली (Body Language) या बद्दलची सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आलेली आहे.




भारतीय अद्‌भुतकथांचा अनेक
शतकांपासूनचा वारसा

# विक्रम-वेताळ मालिका

मूलभूत नैतिक प्रश्नांचा गुंता उलगडून दाखवणाऱ्या अद्‌भुतरम्य कथा




**वैशाली कार्लेकर**

१० पुस्तकांचा संच / किंमत ५० रु. प्रत्येकी

सभासदांना सवलतीत

मेहता पब्लिशिंग हाऊसने गेल्या काही वर्षात आकर्षक चार रंगी चित्रांनी सजवलेल्या बालवाङ्मयाची दिमाखदार निर्मिती करून मराठी बालसाहित्याच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याच्या उद्देशाने दीर्घ पल्ल्याची वाटचाल सुरू केली आहे.

पंचतंत्र, हितोपदेश, जातक कथा, बादशहा आणि बिरबल, तेनालीराम, वगैरे परंपरासंपन्न खजिन्याबरोबर स्वतंत्र आणि अनुवादित पुस्तकांचे संचही आल्हाददायक स्वरूपात काढण्याचा आणि जास्तीत जास्त बालवाचकांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्या पर्यंत ते पोचवण्याचा प्रयत्न चालू आहे.

'फ्रँकलिन'(१९ भाग) ससोबा-हसोबा (७ भाग), सुधा मूर्तींच्या लोककथा (२ पुस्तके), जंगल-जंमत मालिका, बब्बडच्या गोष्टी, बोधकथा, सीक्रेट सेव्हन मालिका (१५ पुस्तके), विज्ञान नवलाई (६ पुस्तके), आपली सृष्टी (१० पुस्तके), वगैरे वैविध्यपूर्ण संच चोखंदळ पालक-शिक्षक मुलामुलींना वाढदिवशी भेट देण्यास उपयुक्त असल्याचा निर्वाळा देत आहेत. अशी दोनशेवर पुस्तके असल्याने निवडीला भरपूर वाव आहे.

निर्मला मोने, शरद दळवी, राजीव तांबे, मंजूश्री आमडेकर, मोहन वेल्हाळ, निर्मला सारडा, अरुंधती महाम्बरे, संस्मिता गुप्ते, ईशान पुणेकर, अर्चना ओक, चारुता पुराणिक, उज्ज्वला केळकर, डॉ. बाळ फोंडके, प्रियंका कुलकर्णी, डॉ. किशोर पवार, वगैरे नव्याजुन्या लेखकांचा हातभार या बालसाहित्याचा कसदारपणा वाढवणारा आहे.

मुलामुलींना पारंपरिक कथासाहित्याचा, लोकसाहित्याचा परिचय व्हावा, विश्वसाहित्याचा वारसा घेता यावा, त्यांचे सामाजिक-नैतिक भान वाढावे, बालनायकांच्या पराक्रमांची ओळख व्हावी, कल्पनाशक्तीला पंख फुटावे, रंजनाबरोबर विज्ञान-



बहुश्रुतपणा-नीतिमूल्यांचा संस्कार व्हावा-अशा दृष्टीने बालसाहित्याची उपयुक्तता वादातीत आहे. बालसाहित्य हे काळाच्या कसोटीवर उतरून विश्वसाहित्याचा भाग बनते. ज्या मुलामुलींना लहानपणापासून पुस्तके हाताळायला मिळतात, त्यांची बौद्धिक, मानसिक, भावनात्मक, कलात्मक, कल्पकता समृद्ध होते.

'विक्रम-वेताळ पंचविशी'वर आधारित दहा पुस्तकांचा संच मेहतांनी नुकताच बाजारात आणला आहे. घन:श्याम देशमुख यांच्या बहुरंगी चित्रांनी नटलेला हा संच मेहतांच्या निर्मिती मूल्यांचा दर्जेदारपणा दाखवून देणारा आहे.

विक्रम-वेताळाच्या कथांचे पुनर्कथन वैशाली कार्लेकर यांनी केले आहे.

राजपुत्राचा निर्णय, ज्योतिषाचं नशिब, जादूची साखळी, गुप्त खजिना, जादूचा रत्नहार, दैवी सिंहासन, पुतळे जिवंत झाले, टेकडीवरचं देऊळ, वगैरे शीर्षके या कथांच्या अद्‌भुततेचा निर्देश करणारी असली तरी या कथांमध्ये न्याय आणि नैतिकता यांच्यावर भर आहे. बालवाचकांना यातील अद्‌भुत कल्पना आवडतील तर प्रौढवाचकांना या कथांतील नैतिक-सामाजिक पेच गुंतवून ठेवतील.

सिंहासन बत्तीशी आणि वेताळ पंचविशी या दोन्हींचा उगम असणाऱ्या कथासरित्सागर किंवा बृहत्कथा या ग्रंथांचा कर्ता गुणाढ्य हा मानला जातो. बृहत्कथेचा काल हा पहिल्या शतकाचा मानला जातो. सिंहासन बत्तीशीचा रचनाकाल तेरावे शतक असावा. म्हणजे या ग्रंथात सतत भर पडत गेली असावी. सिंहासनास जडविलेल्या ३२ पुतळ्यांनी सांगितलेल्या ३२ कथा असल्याने सिंहासन बत्तिशी हे नाव पडले असावे.



'वेतालपंचव्युशतिका' मध्ये वेताळाने सांगितलेल्या २५ कथा. कथासरित्सागरातील शशांकवती नावाच्या बाराव्या लंबकातील क्रमांक ८ ते३२ या तरंगात या कथा आल्या आहेत.

या कथांतील वेताळाला प्रसन्न करून घेण्यासाठी एक अघोर योगी राजा विक्रमाची मदत मागतो. राजा विक्रमाने रात्रीच्या वेळी स्मशानात जाऊन तेथील विशिष्ट शिंशपा वृक्षावर टांगून ठेवलेल्या प्रेताला आपल्या खांद्यावर ठेऊन त्या अघोर योग्याकडे आणायचे असे त्या कामाचे स्वरूप असते. मात्र या प्रकारात एक दक्षता पाळायची अट असते. ते प्रेत खांद्यावर घेऊन योग्याकडे येताना राजाने एक शब्दही बोलायचा नाही. उलट प्रेताने सांगितलेली गोष्ट मात्र निमूटपणे ऐकून घ्यायची. त्या गोष्टीच्या शेवटी वेताळ त्या गोष्टीतल्या व्यक्तीच्या वर्तनाबद्दल काही प्रश्न विचारत असे आणि राजा विक्रमाला आपण लादलेली अट रद्द करून त्या प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त करण्यास सांगत असे. विक्रम राजाचे चातुर्य आणि न्यायदानातले तर्कशास्त्र याने वेताळ प्रभावित होतो. आणि विक्रमाचा बळी घेऊ पाहण्याचा अघोर योग्याचा डाव उधळून लावतो. वेताळ राजाच्या ऐवजी त्या अघोर योग्याचाच शिरच्छेद करतो. सिंहासनबत्तीशी मध्ये सिंहासनाला जडवलेल्या ३२ पुतळ्यांनी राजा विक्रमादित्याच्या न्यायप्रियतेच्या गोष्टी सांगून हे गुण तुझ्यात असले तरच तू सिंहासनावर बसण्याचे धारिष्ट्य दाखव असे भोजराजाला बजावण्यात येते. आपण त्यासाठी लायक नाही हे जाणून घेऊन भोजराजा ते सिंहासन गाडून टाकतो आणि त्याचे पुतळे शापातून मुक्त होतात.

'वेताळपंचविशी'मधील प्रत्येक कथेचा आरंभ एकाच प्रकारे होतो.

रात्रीची वेळ. स्मशानात मिट्ट काळोख. भुताखेतांचे भयावह आवाज. राजा विक्रम मात्र न घाबरता पुढे जात राहतो. विशिष्ट झाडावर लटकणारे प्रेत खांद्यावर घेऊन परत निघतो. वेताळ म्हणतो, तू मला नेत आहेस खरा,पण वाटेत अजिबात बोलायचे नाही. बोललास तर मी निघून जाईन.

राजा होकारादाखल मान हलवतो. पाठीवरचे प्रेत त्याला आपली कहाणी सांगते.

दैवी सिंहासन या गोष्टीतले प्रेत सांगते, ''पवनागिरीचा राजपुत्र अंशुमन गुरू विद्यासागर याच्याकडचे शिक्षण पूर्ण करतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरू त्याला एक सिंहासन भेत देतो. त्या सिंहासनात एक दैवी शक्ती असते. सिंहासनावर बसणारी व्यक्ती अपराधी आहे की निर्दोष हे लगेच कळून येते. एकदा एक कुविख्यात दरोडेखोर दरबारात येतो. तो गुन्हा कबूल करतो. तेव्हा एक म्हातारी म्हणते, ''राजा, हा दरोडेखोर तुझ्या दृष्टीने गुन्हेगार असेल, पण आमच्यासाठी तो देव आहे. तो श्रीमंतांना लुटतो पण आम्हा गरीबांना मदत करतो.'' दरोडेखोराला सिंहासनावर बसवले जाते तेव्हा ''याला जन्मभर तुरुंगात टाका'' असा सिंहासनाचा आवाज येतो.

राजा त्या दरोडेखोराला म्हणतो, ''वीरबाहू, मी तुला मुख्य प्रशासक नेमतो. भ्रष्टाचार निर्मूलन हे तुझे काम.'' वीरबाहू ते पद स्वीकारतो.

एका स्पर्धेच्या वेळी नेमबाजीत एक भिल्ल तरुण भैरव आणि सरदार पुत्र विजय यांच्यात कोणाची निवड करावी असा पेच निर्माण होतो. सिंहासनावर बसल्यावर दोघांच्याही संदर्भात नेमबाजीच्या स्पर्धेतील विजयाबद्दल अभिनंदन असाच आवाज येतो. पण राजा मात्र स्पर्धेत भैरव विजयी झाला असे घोषित करतो आणि ते सिंहासन आपल्या गुरूंकडे परत पाठवण्याचे आदेश देतो.

ही कथा सांगून वेताळ राजाला विचारतो, ''सिंहासनाने दिलेला निर्णय राजाने का फिरवला?''

''वीरबाहू दरोडेखोर होता... भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी त्याला काही अधिकार देणे आवश्यक होते. नेमबाजीत भिल्ल तरुणाकडे गरिबीमुळे सरावासाठी साधने नव्हती तरी त्याने उत्तम कौशल्य दाखवले. दैवी सिंहासनापेक्षा मानवी व भावनात्मक मूल्यांना जास्त महत्त्व हवे म्हणून मी सिंहासनाचा निर्णय फिरवला.''

हे उत्तर वेताळला योग्य वाटते.

तो अदृश्य होतो.

राजा विक्रम दुसऱ्या रात्री झाडावरच्या दुसऱ्या प्रेताकडे जातो. त्या प्रेतात शिरलेला वेताळ पुन्हा आपली अट घालून नवीन गोष्ट सांगतो. शेवटी प्रश्न विचारतो.

विक्रम त्याचे चातुर्यपूर्ण उत्तर देतो.

मुलांना या गोष्टी अद्भुतरम्य म्हणून आवडतील.

प्रौढांना विशिष्ट पेचप्रसंगात तर्कसंगत निर्णय घेताना, तो कसा घ्यावा याची दिशा दाखवतील.

या कथांमधले नैतिक प्रश्न आज हजार वर्षांनंतरही कायम आहेत हे जाणवते. आजही हे प्रश्न योग्य प्रकारे हाताळणारे राजा विक्रमासारखे चतुर, बुद्धिमान, न्यायबुद्धीचे शासनकर्ते कुठे आहेत?

विक्रम सिंहासनावर बसण्याची आपली पात्रता नाही हे स्वत:च मान्य करतो व सिंहासन परत पाठवतो. आज असे करणारा कोणी नेता दिसतो का?

हजार वर्षांपूर्वीही भ्रष्टाचार होता असे या कथांमुळे लक्षात येते. तेव्हा काळ बदलला असे कसे मानायचे? या कथा आजही वास्तव वाटतात.

❐

**आगामी**

अनलाइकली हिरो

# ओम पुरी

**नंदिता सी. पुरी**

अनुवाद

**अभिजित पेंढारकर**




'अनलाइकली हिरो' या पुस्तकात ओम पुरी यांचे खासगी आयुष्य, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांची अस्वस्थता, त्यांच्या हृदयातील वेदना यांचे दर्शन घडते. पंजाबातून डोळ्यांत स्वप्ने घेऊन आलेला मुखदुर्बळ कलाकार, 'एनएसडी'मधील जातिवंत 'फ्लर्ट', खाण्याचा शौकीन व उत्तम कूक आणि पूर्णत: कुटुंबवत्सल माणूस! ओम पुरी यांची ही विविध रूपे या पुस्तकात पाहायला मिळतील.

कुटुंबातील सदस्यांबरोबरच्या गमतीदार प्रसंगांची मालिका, भारतीय आणि ब्रिटिश चित्रपटसृष्टीतील व्यक्तींच्या सहवासातील अनेक धक्कादायक घडामोडी, प्रेमप्रकरणांतील रहस्य यांचा उलगडा या पुस्तकातून होईल.

अतिशय दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रांचाही आस्वाद घेता येईल.

मार्मिक, प्रामाणिक आणि उत्साहपूर्ण शैलीत लिहिलेली कहाणी.

'सिटी ऑफ जॉय' या चित्रपटात ओम पुरींसोबत काम केलेल्या पॅट्रिक स्वेझ या दिवंगत अभिनेत्याने त्यांचा त्याच्या आयुष्यावर पडलेला प्रभाव पुस्तकात स्पष्ट केला आहे.

प्रसिद्ध समीक्षक डेरेक माल्कम यांनी ओम यांची अफाट गुणवत्ता आणि कलेचा प्रचंड परीघ यांचा आढावा घेतला आहे.

नसरुद्दिन शाह यांनी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'पासून सुरू झालेल्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या क्षितिजावर ओम पुरी या ताऱ्याचा उदय होण्याची कहाणीही पुस्तकात वाचायला मिळेल.



Jane Hawking was Stephen Hawking's wife for over twenty-five years. She has lived in Cambridge for most of her adult life. Her book *At Home in France* was published in 1994, followed by Music to Move the Stars in 1999. She teaches Modern Languages and is also a keen solo and choral singer.

# Book review

## Travelling to Infinity : My Life with Stephen
- Jane Hawking

### *A tale of infinite grit & love*

As the cliché goes, 'Behind every successful man, there is a woman'. A very congratulatory statement indeed! But, ever wondered about the unwitting disservice it does to the sweat, blood & tears of that woman, by cloaking it in a blanket of effusiveness for her better half's success?! One hardly gets to know the travails that the woman underwent to help propel her man to those giddy heights of glory. No one gets to see her sacrifice, her labour, or her tightrope-walk to keep the man untouched by any problems to remain singularly focussed on his goal. But - 'Travelling to Infinity – My Life with Stephen' – the autobiography written by renowned cosmologist Stephen Hawking's better half Jane, comes as a welcome exception to this rule. However, while Jane Hawking has penned a candid account of her entire life, the beauty of it lies in the fact that the book consciously steers clear of becoming a self-sung paean.




For several years, Jane had resisted writing about the grime behind the glory of Stephen Hawking, in order to preserve a shred of privacy in her world otherwise permanently on posterity. However the inevitable loss of that privacy, with malignant rumours adding to the chaos, made Jane change her resolve. She did so; but without resorting to any exaggeration, as also, excessive discretion. It is this very aspect that makes the book so engaging from the first page to the last.

Written in a conversational tone in crisp, old-world British English, the book takes us hand-in-hand down memory-lane with Jane as she recounts the early happy days of her childhood; the quicksilver heady romance with Stephen; the marriage that was forever frowned upon by the Hawkings; her exhaustive combat with Stephen's degenerative motor-neuron disease and most of all, her constant efforts to enable Stephen to reach the stars even as his body wasted away to nothingness.

Jane was a much-loved, intelligent girl who fell in love with Stephen for his genius and wit. Despite Stephen being diagnosed with motor-neuron disease much before their marriage, Jane took the brave step of marrying him; thus sacrificing her own dreams and what could have been a brilliant career (she was studying Spanish literature). The marriage led Jane to contend with a near-permanent absence of Stephen's from the domestic front - either because he would be constantly mentally engaged with Physics or because, very soon became physically incapable and confined to the wheelchair. The initial years saw Jane struggling to take care of Stephen's increasing demands, raising their three kids and coping despite the complacent attitude of his family and the society (towards the travails associated with motor-neuron disease). Travelling world-wide with Stephen on a wheelchair, running pillar to post to contain his abrupt medical emergencies, struggling to run the house in the most meagre income and then being relegated to the sidelines as the Physics-ignoramus vis-a-vis the genius would certainly hurt and trouble the young Jane. Add to that, Stephen would wittingly-unwittingly keep putting Jane down whenever she tried to suggest anything to him. But Jane would bravely take this all in her stride, assisting Stephen in penning his speeches, arranging parties, setting up house and dealing with all the handy-jobs that would conventionally be a male bastion.

Jane would have continued doing this till the end of her life, had it not been for a cruel stroke of fate which led Stephen to falling in love with his nurse! Twenty-five years of Jane's unwavering devotion were brushed away like crumbs! Undoubtedly, Jane would have been shattered, had it not been for the tender support of Jonathan Hellyer, a choirmaster who she had met in the interim. Jonathan was the only ray of sunshine in Jane's otherwise tedious life. He provided her all the support, friendship and care that a woman in her state would need. Whilst most people frowned upon what they thought was an unnatural relationship (since Jonathan would mostly be around in the Hawking's residence), truth was that Jonathan was equally devoted to caring for Stephen and he and Jane forever

maintained a dignified distance amidst them. It was only years after Stephen left Jane that she and Jonathan got married and did Jane finally get all the love and respect that she deserved.

The memoir leaves the reader laughing with and crying for Jane – albeit the incidence of the former is much less than the latter. The credit for this engagement goes to Jane's unbridled narration, interspersed with specks of dry British humour and detailed analyses of all situations. It would have become a purely emotional account; but for Jane's thoughtfulness of explaining Stephen's theories and research in great detail. However, the biggest draw for the book remains in the fact that Jane does not paint herself as a martyr or Stephen as a villain. She gives credit where credit is due and is honest enough to admit her shortcomings as well as Stephen's genius.

All in all, a fantastic memoir to read, to get the other, more personal side of the genius's life – one that may not as shiny and bright as his professional one, but yet an engaging one indeed!

**- RESHMA S. KULKARNI**

# New Books




The Gift




Tamil Tigress




Mexican Cooking




# One Foot Wrong

by Sofie Laguna

Category - Fiction
Type -Paperback
Pages - 188
Price - Rs. 200.00

## Praise

“A powerful and extremely disturbing novel… The lyricism of Hester’s astonishingly beautiful and myopic voice is constant, even when the plot becomes terrifying and tragic…. This is an extraordinary, poetic novel that gives as much as it takes...it will also open a door on perception and understanding.”

— *Blogcritics.org*

“A truly haunting tale that readers won’t soon forget, from a compelling, original voice.”

— *Publishers Weekly*

“Laguna writes with lyrical economy, and her craft elevates a tale which in its bare outlines seems like sensational tabloid fare...A disturbing story graced by powerful, poetic prose.”

— *Kirkus Reviews*

## Forthcoming




Novgorod Diary




Paper Cranes




Saris on Scooters




Gayatri's Maths Mantra



# व्यंकटेश माडगूळकर यांचे कादंबरी लेखन

माडगूळकरांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून वेगवेगळ्या स्वरूपाचे जीवनचित्रण केले असे तरी त्यांच्या साहित्याचे मुख्य अनुभवविश्व माणदेशी जीवनवास्तव हेच आहे. माणदेशी प्रादेशिक जीवनवास्तव चितारणारे लेखक म्हणूनच त्यांना आपण ओळखतो. परंतु असे असले तरी आपल्या साहित्यातून चित्रित होणाऱ्या जीवनवास्तवाच्या वेगळेपणाचे अभिनिवेशी भान त्यांनी कधी वागवले नाही. त्यांच्या आधीच्या पिढीतील लेखक र.वा. दिघे यांच्या ठिकाणी असे अभिनिवेशी भान आहे. परंतु त्याचबरोबर आपल्या कादंबऱ्यांचा ग्रामीण वा प्रादेशिक म्हणून वेगळा विचार होऊ नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. पेंडसे यांच्या कादंबरीत प्रादेशिकता हा घटक पार्श्वभूमीसारखा उपयोजिला गेला आहे. (उदा. गारंबीचा बापू). गो. नी. दांडेकरांच्या कादंबरीतही हेच घडते. या पार्श्वभूमीवर व्यंकटेश माडगूळकरांच्या कथात्मक साहित्यातील प्रादेशिकतेचा विचार केला तर वेगळा प्रत्यय येतो. **माडगूळकरांच्या साहित्यातील व्यक्तींचा विचार त्यांच्या भोवतालच्या प्रादेशिक पर्यावरणाला टाळून करताच येणार नाही. म्हणजे येथे प्रादेशिकता पार्श्वभूमीसाठी उपयोजिली जात नाही.**

नवकथा घडविणाऱ्या बिनीच्या कथाकारांत स्थान मिळविल्यानंतर माडगूळकरांनी कादंबरी लेखनास हात घातला. अनुभवाच्या वेगळेपणामुळे त्यांची कथा समकालीन कथेत उठून दिसली होतीच. दलित जीवन हा त्यांच्या अनेक कथांचा विषय आहे. त्यांची 'पुढचं पाऊल' ही पहिली कादंबरीही दलित कलावंतांची कथा वर्णन करते. मोगरीबाई नावाच्या एका बदफैली स्त्रीच्या नादी लागल्यामुळे किसन या तमाशा कलावंताची आणि त्याच्या कुटुंबियांची दुर्दशा होते. तशाही स्थितीत किसना स्वत:ला सावरतो. न डगमगता तमाशा क्षेत्रात पाय रोवून उभा राहतो. जीवनाची नवी सुरुवात करतो. हेच त्याचे 'पुढचे पाऊल.'

'बनगरवाडी'ने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला. 'पाणकळा', 'सराई', 'गावगुंड', 'गारंबीचा बापू' यांच्यानंतर अवतरलेली 'बनगरवाडी' एवढी वेगळी होती की, तिची परंपरा दाखवून देणे अवघड व्हावे. रम्य म्हणावा असा निसर्ग नसलेले, चित्ताकर्षक घटना नसलेले, वरवर रुक्ष वाटावे असे हे जीवन राजाराम

सौंदणीकर या शिक्षकाच्या मुखातून निवेदित केले जाते. परंतु तो केवळ तटस्थ निवेदक नाही. बनगरवाडीचा प्राकृतिक रंगढंग आकळू पाहणारा, ते व्यक्त करण्यासाठी धडपडणारा असा हा निवेदक आहे. त्याची भूमिका केवळ मध्यस्थासारखी नाही. बनगरवाडीने त्याचेही भावविश्व व्यापून टाकले आहे. त्यामुळे तोही या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र ठरतो.

बनगरवाडी हे एक समूहजीवन जगणारे खेडे आहे. एक तर तो एक गावगाडा आहे. आणि त्यातही तेथील माणसाचा व्यवसायच त्यांना समूहजीवन जगायला भाग पाडतो आहे. म्हणूनच गावपांढरीशी वैमनस्य घेऊन एकटा पडलेला बाळा धनगर गावाने आपणास सामावून घ्यावे म्हणून मावल्या आईच्या जत्रेत गावापुढे पदर पसरताना दिसतो. तेथील लोकजीवनात सण, उत्सव, जत्रा इत्यादी परंपरांना स्वाभाविक स्थान आहे. मात्र लेखकाने त्यांचा अनाठायी वापर करून कादंबरी सजवलेली नाही.

कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा हाडामांसाच्या आणि माणदेशाच्या मातीतल्या वाटतात.

म्हातारा कारभारी सरळ स्वभावाचा माणूस आहे. वाडीच्या हितासाठी शाळा चालली पाहिजे हे त्याला पटते. म्हणून तो मास्तरची बाजू घेतो. तिरकस तुंबा घालणाऱ्यांना फटकारून वळणावर आणतो. अंजीच्या बाबतीत संशय येताच मास्तरशी असलेले संबंध तोडतो आणि संशयनिवृत्ती होताच आपली चूक कबूलही करतो.

दादू बालट्या हाही तसा मूळचा काही दुष्ट नव्हे. फक्त बाहेरून आलेल्या मास्तरने वाडीच्या जीवनात ढवळाढवळ करावी हे त्याला मान्य नाही.

शेकू ही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे.पेरणी तटली म्हणून मास्तरकडे बैल मागणाऱ्या शेकूला मास्तर आपली मागणी कशी पूर्ण करणार हा प्रश्न पडत नाही. इतरांच्या अडचणी दूर करणारा मास्तर आपलीही अडचण दूर करील एवढाच भाबडा विश्वास त्यामागे आहे. ताकदीत पुरुषाला लाजवील अशी शेकूची बायकोही शेकू अंजीच्या नादाला लागतो, तेव्हा आपले गाऱ्हाणे घेऊन मास्तरकडेच येते. नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली कारभाऱ्याची नात अंजी बेसावधपणे शेकूच्या प्रेमात पडते खरी, परंतु एकदा रानात आपल्याला साजेसा एक मेंढका मिळताच त्याच्याबरोबर निघूनही जाते.

निसर्ग आणि मानवी जीवन यांचे एकात्म रसायन या कादंबरीत घडून आले आहे. याआधी प्रसंगाच्या सजावटीसाठी किंवा भावभावनांच्या पार्श्वभूमीसाठी येणारा निसर्ग येथे जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून येतो. निसर्गातील घडामोडी येथील जीवनात निर्णायक बदल घडवून आणतात.

माणदेशी जीवनवास्तव हा माडगूळकरांच्या साहित्याचा मुख्य विषय असला तरी त्यांचे साहित्य माणदेशकेंद्री नाही. वेगवेगळ्या स्वरूपाचे अनुभव त्यांनी तेवढ्याच

समर्थपणे अभिव्यक्त केले आहेत (उदा. सत्तांतर). एकूणच हे साहित्य आत्मकेंद्रिततेपासून मुक्त आहे. वस्तुनिष्ठता हे जे श्रेष्ठ साहित्याचे गमक सांगितले जाते त्याचा अनुभव येथे येतो. त्यामुळेच त्यात एकसुरीपणा आढळत नाही.

त्याचप्रमाणे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे **वेगवेगळ्या समाजस्तरात जगणारा सामान्य माणूस हाच त्यांच्या साहित्याचा नायक आहे. त्यांना ध्यास आहे तो सामान्य माणसातलं माणूसपण शोधण्याचा, त्याच्या जीवनातील कारुण्याचा वेध घेण्याचा.** त्यामुळेच 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहातील प्रत्येक माणूस वाचकाच्या मानत घर करून राहतो. त्या व्यक्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व वैशिष्ट्यासह प्रत्यक्षपणे साकार होतात. त्यांना लेखकाच्या हेतुनुसार घडवलं जात आहे असं वाटतं नाही. एका अर्थाने पाहिले तर त्या व्यक्ती अनघड असतात. म्हणूनच त्यांना एवढे सहज स्वाभाविक चैतन्य प्राप्त झालेले असते. हे जीवनानुभव चितारणाऱ्या लेखकाचं व्यक्तिमत्त्वही तसचं त्या-त्या अनुभवात आरपार रंगून जाणारं अनघड असंच आहे. त्यामुळे अनुभव घेण्याच्या पद्धतीत जी स्वाभाविकता असते तीच स्वाभाविकता त्याच्या मांडणीतही येते. कारण लेखक येथे केवळ तटस्थ निवेदक नसतो, तर तोही त्या साहित्यकृतीतल्या व्यक्तींपैकी एक असतो. कधी तो विद्यार्थी असतो, कधी मास्तर असतो, तर कधी रस्ता कामावरचा अंमलदार असतो. अशा प्रकारे अनेक परींनी आणि अनेक नात्यांनी निवेदक या जीवनवास्तवात वावरत असतो.



'वावटळ', 'कोवळे दिवस', आणि 'करुणाष्टक' या कादंबऱ्या आत्मचरित्रात्मक आहेत. वावटळ मध्ये गांधी हत्येमुळे ग्रामीण भागात ब्राह्मण समाजावर जे गंडांतर कोसळले त्याचे चित्रण माडगूळकरांनी केले आहे. आयुष्याच्या संध्याकाळी गावात आलेले आबा झालेल्या घटनांनी विटून गाव सोडायचे ठरवितात. गावशिवार सोडताना मात्र ते गहिवरतात. त्यांच्या मागोमाग आलेल्या सखाराम आणि ईश्वर यांच्याजवळ आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणतात, ''मी पुष्कळ म्हणतोय कायमचं सोडावं. पण ते झेपणार आहे का मला? अजून शीव संपली नाही तोवर माझ्या पोटात कालवायला लागलयं. नोकरी धंद्यासाठी जन्मभर बाहेर हिंडलो. म्हातारपणी गावात आलो. माझा प्राण दुसऱ्या गावात जायचा नाही ईश्वरा.''

'वावटळ' या कादंबरीत गांधीहत्येमुळे झालेल्या दंगलीचे चित्रण माडगूळकरांनी केलेले आहे. परंतु दंगलीमागील राजकीय कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. ही मर्यादा वैचारिक संदिग्धतेतून पडलेली आढळते असे नमूद करून डॉ. भा. ल. भोळे पुढे लिहितात, ''गांधी हत्येनंतर उण्यापुऱ्या सोळा वर्षांनी त्यानी ही कादंबरी लिहिली असूनही घटनाक्रमाच्या शब्दचित्रणापलीकडे तिच्यातील निवेदन जाऊ शकत नाही हे खटकल्यावाचून राहात नाही. लेखक कुठेही त्या दुर्दैवी घटनेचे राजकीय कार्यकारण कलात्मक चौकटीतून का होईना पाहण्याच्या फंदात पडत नाही. गांधीहत्या, दंगल-जाळपोळ आणि काँग्रेसी राजकारण यांच्यातील विचारप्रणालीत्मक संदर्भ तो शोधत नाही. जणू कोणत्याही विचारप्रणालीचा त्यात काही संबंधच नाही आणि जे घडले ते केवळ सुट्या व्यक्ती वा वादांचे आपापसातील द्वंद्व आहे किंवा व्यक्तिगत वा कौटुंबिक सूडाचा अविष्कार आहे असेच तो गृहीत धरतो... स्वाभाविकच त्याच्या वैचारिक भूमिका संदिग्ध आहेत आणि त्यामुळे घटनांच्या अन्वयार्थाचा त्याने घेतलेला शोध फारच वरवरचा व संकीर्ण राहतो. व्यक्तीव्यक्तींमधील संबंधांपेक्षा अधिक खोलवरचा संदर्भ त्यासाठी तो देऊच शकत नाही. असेही म्हणण्याला अवसर सापडतो की इतर मध्यमवर्गीयांप्रमाणे लेखकाचाही आधुनिक बहुजनसत्ताक राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तुच्छतावादी असावा आणि त्याची वृत्ती राजकारण नामक 'गलिच्छ खेळा' पासून दूर राहण्याची असावी. आपले लेखन न-राजकीय असावे असा जाणीवपूर्वक वा अभावितपणे प्रयत्नही त्याच्या हातून झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण परिणाम मात्र दिसतो तो असा की, ते लेखन राजकीय न होता स्थितिवादाची अप्रत्यक्ष भलावण करणारे राजकीय लेखनच झाले आहे.''

डॉ. रवीन्द्र ठाकूर

(मराठी कादंबरी - समाजशास्त्रीय समीक्षा -पृष्ठ २५६-२५९वरून)

❐



# करुणाष्टक

व्यंकटेश माडगूळकर

असं म्हणतात की सर्वांत थोरला मुलगा असतो तो वडलांचा प्रिय असतो. सर्वांत धाकट्यावर आईचं प्रेम असतं. मधला मात्र अधांतरी असतो.



पण हे काही सत्य नव्हे. आईचा माझ्यावर जीव होता. अगदी लहानपणचे काही किरकोळ प्रसंग सोडले तर ती मला कडू किंवा टाकून बोलल्याचं मला आठवत नाही. पुन्हापुन्हा मी आठवून पाहिलं, पण असा प्रसंगच नाही. उलट माझ्या थोडंसं असंही लक्षात आलं होतं की, हिची माझ्यावर माया आहे आणि त्या मायेला थोडी कणवेची डूब आहे. माझ्या अंगाला थंडी लागू नये, म्हणून ती कांबळं घाली तेव्हा त्याला आतून तिच्या जुन्या लुगड्याची घडीही जोडलेली असे.

माझ्याविषयी ही कणव तिच्या मनात का बरं असावी याचा विचार करतो तेव्हा मला वाटतं, हा आपलं दूध पिऊ शकला नाही, तान्हेपणी आपण याला पदराखाली घेऊ शकलो नाही, आजारपणामुळे

आपण याच्यापासून लांब-लांब राहिलो, असं तिच्या मनात काही असावं.

दुसरं असं की मी फार लहानपणी एकटा राहिलो. ड्रॉईंग मास्तरांकडे ती मला जेव्हा सोडून आली तेव्हा माझं वय दहा वर्षांचं होतं. लहानपणी ती जशी आम्हाला कारंड्याच्या घरी धाडत असे, तसंच हे मास्तरही मला सणासुदीला थोरामोठ्यांच्या घरी जेवायला पाठवत. ही सुखवस्तू माणसं जेव्हा माझी कणव करीत, 'घे हो बाळ! लाजू नकोस. पोटभर जेव' असं म्हणत, तेव्हा मी अपमानित होई आणि मास्तरांना म्हणे, की 'आता मला तुम्ही असं कुणाकडे पाठवू नका. सणादिवशी मी घरीच जेवेन.' भिक्षुकानं पक्वान्नांची आणि चाकरानं मानाची अपेक्षा ठेवू नये, हे कळण्याचं माझं वय नव्हतं.

पुढे मी सोळा वर्षांचा असतानाच घराबाहेर पडलो आणि वणवण करीत भटकलो. सगळं वाऱ्यावरच होतं. या काळात माझ्या शरीराची आणि मनाची नाना परीने होलपट झाली. यातलं काही-बाही भडक करून लोकांनी आईपर्यंत पोहोचवलं होतंच.

दोन हातांचे चार हात झाल्यावर, वडलांच्या आजारपणात तीनेक वर्षांनी माझा पाय घराच्या उंबऱ्यात पहिल्यांदा पडला तेव्हा आईनं मला पोटाशी धरलं आणि ती एकच वाक्य बोलली. म्हणाली, "चुकलास रे बाबा, वाटच चुकलास!"

अनवाणी चालणारा वाट चुकला की, भांबावून काट्याकुट्यांतूनही जातो. तळपायांना पुढे कुरुपं होतात. ती त्याला जन्मभर वागवावी लागतात.

या पोराचं नशीब काही चांगलं दिसत नाही, त्याची फरफटच होत राहणार असं आईला वाटत असलं पाहिजे. आम्ही लहानधाकटी मुलं असताना तिला बंद दाराशी झोंबणारा नाग जसा दिसला होता, तसाच तो काही मुलांच्या मोठेपणी सुद्धा अधूनमधून दिसत असला पाहिजे आणि ती आम्हाला पोटाशी ओढून धरत असली पाहिजे.

वडलांचे दिवस झाले. भादरलेलं डोकं टोपीखाली झाकून मी मुंबईला गेलो. रोजची भाकरी मिळविण्यासाठी धडपडू लागलो.

माझ्याबद्दल आईला विशेष असा विश्वास वाटल्याचंही याच काळात

मला दिसलं. या विश्वासाला मी मात्र अपात्र ठरलो. त्याची खंत मला कधीही विसरता आली नाही.

धावतपळत असाच एकदा मी गावी गेलो असताना आई मला म्हणाली, ''अखेर माझ्या आईवडलांनी मला दिलेली जमीन या मुलानं विकून टाकली. त्यातले थोडेफार पैसे माझ्या हातावर ठेवलेत, ते माझ्यापाशी इथे राहायचे नाहीत. कोणी ठेवायचं नाही. यांच्या संसारात रोज एक नवी अडचण उभी राहते. नड पडली की माझ्याजवळ रडतील. पैसे घेतील आणि पुन्हा परत करायला त्यांना काही सवड होणार नाही. तू हे पैसे तुझ्यापाशी ठेव.''

असं म्हणून तिनं माझ्यापाशी आठ हजार रुपये दिले. मी ते घेतले आणि मुंबईला बँकेत ठेवून दिले. जेव्हा केव्हा ती मागेल, तेव्हा ते परत करावेत असं म्हणालो.

एका पावसाळ्यात मला गावाचं तातडीचं पत्र आलं :

*''मळ्यात वरून पाणलोट येऊन सगळी माती वाहून जाते आहे. ताबडतोब काही बांधबंदिस्ती केली नाही, तर फार नुकसान होईल. आईचे तुझ्यापाशी जे पैसे आहेत, त्यांपैकी दोन हजार रुपये ताबडतोब पाठवावेत.''*

मी पैसे पाठवून दिले.

पुन्हा काही महिन्यांनी थोरल्या भावाकडून चिठ्ठी घेऊन माणूस आला. त्यातही असंच कारण होतं :

*''मळ्यात ओढ्याकडील बाजूस फरशी बांधायची आहे. ताल फोडून पाणी ओढ्यात जाईल. त्याऐवजी मोरी बांधून काढणं फार जरूरीचं आहे असा निरोप गावाकडून आला आहे. पंधराशे रुपये चिठ्ठी घेऊन येणाऱ्यापाशी द्यावेत.''*

मी दिले.

हळूहळू आठ हजार रुपये संपून गेले. आईला काही पत्ता नव्हता. वर्षानुवर्षे तिने मला विचारलेही नाही. आपली ठेव दामदुप्पट होत आहे, या समजुतीखाली ती राहिली.

मलाच अपराध्यासारखं वाटत होतं. मीच तिला सांगून टाकलं.

तेव्हा ती फार हळहळली. म्हणाली, ''मला वाटलं होतं, तू पैसे सांभाळशील. आता मला पंढरीत यात्रेला जायचं असलं तरी पोरांच्यावर

अवलंबून राहावं लागेल.''

तसंच पुढे घडलंही.

काही वर्षं आई 'माझी आईवडलांनी दिलेली भाकरी तुम्ही विकलीत.' ही गोष्ट घोकत राहिली आणि त्यावर कठोर उत्तरं ऐकत राहिली.

पुढे-पुढे ती चकार शब्दही काढेनाशी झाली.

वडलांच्या माघारी आई बरीच वर्षं माझ्या जन्मगावी होती. घरचा, शेतीवाडीचा बराच कारभार तिच्या सल्ल्यानुसार चालायचा. आता सुबत्ता आली होती. तीन मुलं मिळवू लागली होती. बाकी दोघं उद्या हाताशी येणार होती. 'सगळे आपल्या मनाप्रमाणे खर्च करतात. मग मीच काटकसर कशाला करू?' असं म्हणून आई तडाखेबंद असा दानधर्म करायची.

हा कोण धोंडूबोवा रामदासी आला तर त्याला आदरानं ठेवून घ्यायचा. गोडधोड जेवू-खाऊ घालायचं. त्याच्याकडून देवाला अभिषेक, सत्यनारायण, हरिविजय, रामविजय असल्या पोथीचं वाचन करून घ्यायचं आणि चांगला आठ-पंधरा दिवस त्याचा सत्कार करून दक्षिणा, वस्त्र देऊन त्याला निरोप द्यायचा.

गोकुळाष्टमी आली की सारा गाव घरी बोलवायचा, भजन चालू ठेवायचं. पाळणा बांधायचा, सजवायचा. बायका बोलवायच्या आणि मोठ्या थाटामाटानं कृष्णजन्म साजरा करायचा.

सण-समारंभ, अतिथी-अभ्यागत, साधू-संन्यासी – सगळ्यांचा यथायोग्य परामर्श घेण्यात आईला विशेष आनंद वाटायला लागला.

– आणि मुलांना वाटायला लागलं, 'हा सगळा अनाठायी खर्च आहे. या धोंडूबोवाला धर्मग्रंथातली दोन अक्षरं तरी समजली आहेत का? त्याचा सत्कार कशाला? कोणी भोंदू साधू आला तरी त्याला धोतरजोडी कशाला? विठ्ठलाच्या वारीला जायचं तर शंभर-सव्वाशे रुपये कशाला लागतात? छे:! हिला काही कळत नाही.''

हळूहळू मुलं हे तोंडावरही बोलू लागली. वेळप्रसंगी चिडूही लागली. सुनाही पाठीमागं कुचुकुचु लागल्या. मुलं तोंडावर सूचक बोलली की आई म्हणे, ''अरे, तुम्ही समर्थ आहात म्हणून करते. नसता तर केलं

नसतं. वडील होते तुमचे तेव्हा काय केलं? कोरांटीची फुलं वाहून, मूठभर तांदूळ पुढे ठेवूनच देवाला नमस्कार केलात ना?''

सुनांवर रागावली म्हणजे आई म्हणे, ''नऊ महिने ओझं मी वागवलं, मी खस्ता खाल्ल्या, दृष्टीची दोरी आणि हातांचा पाळणा करून पोरं मी वाढवली आणि आयत्या पिठावर रेघोट्या मारायला या आल्या. काल आल्या आणि आज मालकिणी झाल्या. माझी मुलं यांना फुकटात मिळाली.''

सुनांचं ती बिलकूल ऐकून घेत नसे; पण मुलं बोलली की ती फार घायाळ व्हायची.

थेट उठून पंढरपुरी जाऊन ऱ्हायची. मन शांत झालं म्हणजे घरी यायची.

गावी एकाच्या दोन सुना झाल्या. मुलंही एकाऐवजी दोन एकत्र राहू लागली. साहजिकच भांड्याला भांडं लागू लागलं. आवाज होऊ लागले.

बराच काळ आईनं आवाज सोसले आणि ते कान किटतील एवढे वाढले तेव्हा ती थेट उठून गाडीत बसली आणि थोरल्या लेकाकडे पुण्याला आली आणि राहिली.

गावी ऋतू ठळक जाणवायचे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा जाणवायचा. इथं ते सगळं सपाट होतं. तिथं काळाचा प्रवाह खडकावर आपटत, खाली कोसळत, कधी उड्या घेत, कधी फेसाळत वाहणारा होता. इथं तो संथ, शांत दोन्ही काठ बांधून काढलेला होता. तिथं रानं होती, इथं बाग होती. तिथं सकाळ कोंबडा आरवून व्हायची, इथं रेडिओच्या मंगलप्रभातानं होऊ लागली.

सुरुवातीचे काही दिवस तिला चुकल्या चुकल्यासारखं झालं; पण परिस्थितीशी जुळवून घेण्याचा गुण माणसापाशी असतोच. शहरी संस्कृती आणि शहरी जीवन आईनं लवकरच पचनी पाडलं.

आता थोरला आणि मधला अशा तिच्या दोन्ही मुलांची घरं पुण्यात झाली होती.

ती कधीमधी चार दिवस राहायला म्हणून माझ्याकडे यायची.

वरवर काही दाखवायची नाही, पण या घरात तिला करमायचं नाही. घराचा मालक जो सकाळी लवकर उद्योगावर जायचा, तो संध्याकाळी

उशिरा घरी यायचा. दोन पोरं शाळेला जायची. शाळेतून आली की खेळायला पळायची. आईला घर रिकामं रिकामं वाटायचं. आठ-पंधरा दिवस राहण्याचा विचार करून आलेली आई चौथ्या दिवशीच म्हणायची, ''जाते बाबा आता.''

''का गं? राहणार होतीस ना?''

''जाते आता. पुढच्या खेपेला आले म्हणजे राहीन.''

मी नीट उद्योगाला लागलो. माझं स्वत:चं घर झालं. मी कुठंकुठं देशी-परदेशी जाऊन आलो हे सगळं बघून आईला आनंद होई.

मला म्हणायची, ''तुझी फार काळजी होती मला. शिवल्या पाखरासारखा वेगळा पडलास. तुझं नीट कधी होईल, कधी मार्गाला लागशील असं वाटायचं....''

मी काहीतरी कामासाठी म्हणून गेलो आणि ऋषिकेश, हरिद्वार करून गंगेत स्नान करून एक गंगेचा गडू घेऊन आलो.

मी कुठं कामासाठी बंगलोरला गेलो आणि सहज शक्य होतं मला म्हणून तिरुपतीला जाऊन आलो. आईला अचंबा वाटायचा. म्हणायची, ''अरे, आजोबांनी तुझ्या काही नवस केला होता. उभा जन्म त्यांना कधी तिरुपतीला जाणं झालं नाही. त्यांचा नवस पुरा करायला जाऊ-जाऊ म्हणत 'ह्यां'नी बघ पुरणाची पोळी कधी खाल्ली नाही. जाणं काही घडलं नाही आणि तू आता सहज जातोस आणि गंगास्नान करून येतोस. सहज उठतोस आणि तुळजापुराला जाऊन येतोस.''

''आई, आता प्रवास पूर्वीसारखा अवघड राहिला नाही.''

''होय रे, पण हे नशिबात लागतं. लोक ज्योतिष्याला विचारतात बघ, माझ्या कुंडलीत तीर्थयात्रेचा योग आहे का म्हणून!''

आता तिला देवधर्म करावा, चारीधाम यात्रा करावी असं फार वाटायचं. सारखी घोकायची.

मी एकदा म्हणालो, ''चल, मी तुला सगळीकडे नेऊन आणतो.''

तर म्हणाली, ''थोरला लागतो बाबा सोबत. थोरल्या मुलाला बरोबर घेऊन सगळं करायचं आहे मला.''

ही तिची इच्छा शेवटपर्यंत काही पुरी झाली नाही.

❒



# खोली : लिहिण्या वाचण्याची

व्यंकटेश माडगूळकर

वयाच्या सतराव्या वर्षी मी लिहायला लागलो. सुरुवातीच्या कथा 'देवा सटवा महार' वगैरे माडगूळच्या घरी कागद भुईवर ठेवून लिहिल्या. माणदेशी माणसांपैकी काही दादरला माधववाडीतल्या खोलीच्या लादीवर. बायकोला रेशनिंग ऑफिसमध्ये नोकरी लागली, तेव्हा तिनं पंधरा रुपयांची एक लाकडी खुर्ची आणि दीड बाय अडीचचं एक टेबल पहिल्या पगारातनं माझ्यासाठी आणून दहा बाय दहाच्या खोलीत मांडलं. लिहायला टेबल लागतं, हे मला तोपर्यंत माहीत नव्हतं.

बावन्न साली पुण्याला आलो. प्रभात रस्त्यावरच्या 'मोहनतारा'त मला अडीच खोल्या मिळाल्या. पुढच्या खोलीत खिडकीशी बसून 'वावटळ', 'बनगरवाडी'चं लेखन झालं. टेबलासमोरच्या खिडकीतून समोरच्या शेतातली विहीर, आंब्याची झाडं, हिरवळ आणि पार पलीकडं निळी-जांभळी हनुमान टेकडी दिसे.

ही जागा सोडून छप्पन्न साली पुणे-मुंबई रोडला गेलो, तेव्हाही अडीच खोल्याच मिळाल्या. रेल्वेलाईनच्या बाजूची, मागची झोपायची खोली अधिक मोठी होती. माझं लिहायचं टेबल मी इथल्याच खिडकीशी टाकलं. समोर काही फूट पलीकडे, रेल्वे-रूळ होता. त्यापलीकडं शेतकी कॉलेजचं मोकळं रान होतं. रेल्वेगाड्यांचा आणि समोरच्या मुंबई रोडवरच्या ट्रकगाड्यांचा आवाज टाळण्यासाठी मी बहुतेक लेखन रात्री दहानंतर करी. 'तू वेडा कुंभार' हे नाटक, 'सकाळची पाहुणी', 'जांभळाचे दिवस', 'कोऱ्या कागदांची कहाणी'सारख्या कथा तिथं लिहून झाल्या.

'अ क्ष र' हे माझं आत्ताचं घर बांधून सत्तावीस वर्षं झाली. माधवराव आचवलांनी याचं डिझाइन केलं आहे. घरासंबंधीच्या तुमच्या कल्पना कळवा, असं त्यांचं बडोद्याहून पत्र आल्यावर, घरात एका बाजूला माझी अशी एक प्रशस्त खोली, लिहा-वाचायला आणि चित्र काढायला पाहिजेच, असं मी कळवलं. पूर्व दिशेकडे तोंड

करून बांधलेल्या ह्या घरात उत्तरेकडील कोपऱ्यात ही प्रशस्त खोली आहे. दार बंद केलं की, मी घरापासून एकटा होतो.

पूर्वेला, उत्तरेला, दक्षिणेला प्रशस्त खिडक्या असल्यामुळं खोलीचा कोणताही कोपरा अंधारा नाही. ह्या खिडक्यांतून उजेड, वारा आत येतो; तसा प्राजक्ताचा, मोहरल्या आंब्यांचा, चाफ्याचा सुरेख सुगंधही येतो.

माझ्या टेबलासमोरील खिडकीतून गुलमोहराच्या डहाळ्या, बोगनवेल, वाहता रस्ता, मोकळ्या प्लॉटपलीकडच्या इमारतीच्या खिडक्या आणि थोडासा आभाळाचा तुकडा दिसतो. पूर्वी समोर बैठा बंगला होता. अलीकडं अपार्टमेंट झालं आहे. पण अजूनही माझ्या खोलीत उन्हं रांगतात.

पूर्वी माझ्या घराच्या उजव्या बाजूला पेरूच्या गर्द बागा होत्या. काळी शेतं होती. आंबा, सावर, जांभूळ ही झाडं होती. आजही उत्तरेकडच्या मोठ्या खिडकीतून चाफा, प्राजक्त, आंबा, पेरू, रामफळ अशा झाडांचा गच्च हिरवा विस्तार दिसतो. त्यांच्या खोडांवरची ऊन-सावल्यांची कलमकारी दिसते. डहाळ्यांची कुजबुज कानांवर पडते.

बुलबुल, मैना, दयाळ, पोपट, कोकिळ, शिंपी, भारद्वाज अशी अठरापगड जातींची पाखरं घराभोवतीच्या झाडाझुडपांतून सतत हिंडतात. त्यांचे मंजूळ आवाज टेबलाशी बसल्यावर मला ऐकू येतात. आंब्यावरची खार झाडाखाली आलेल्या मांजरावर तोंड टाकत असते, तेही मला ऐकू येतं.

ह्या खोलीच्या दारातून आत आलं की, डाव्या बाजूला पुस्तकांसाठी भिंतभर लाकडी मांड आहे. उभट चौकोनी असे कोनाडे काढून, कुठं कोनाड्याची पाठ पुढं घेऊन, तर कुठं तळ वीतभर पुढं काढून सागवानी फळ्यांच्या या मांडाला एरवी आली असती, ती एकसुरी चाल वारंवार बदलली आहे. रंगीबेरंगी पाठीच्या ह्या कोनाड्यांतून मला फुलदाण्या, क्युरिओ, अँटिक्स मांडता येतात.

फुलात नेक्टर भरला असताना सावरीचं किंवा वडफळं पिकून लालबुंद झाल्यावर वडाचं झाड पक्ष्यांना आवडावं, तसा हा मांड मला आवडतो. यात माझ्या आवडत्या लेखकांची पुस्तकं आहेत. चित्रकारांची चित्रं-चरित्रं आहेत. वेगवेगळे ज्ञानकोश, शब्दकोश आहेत. गॅझेटिअर्स आहेत. पुस्तकं ठेवताना मी काहीही शिस्त पाळलेली नाही. बर्टनच्या शेजारी लोकमान्य टिळक, आगरकर, राजवाडे, कौटिल्याच्या शेजारी तुकाराम, म्हाइंभट, दामोदर कोसांबी, कुंचला आणि लेखणी सारख्याच कौशल्यानं चालवणारा पीटर स्कॉट, प्रेटर, सलीम अली. उपनिषद्संग्रहाशेजारी रायटर्स ॲट वर्कचे सात व्हॉल्यूम्स, काणे यांच्या धर्मशास्त्राच्या इतिहासाला लागून हेन्री डेव्हिड थोरो आणि पांगारकर. त्यांच्याशेजारी भालचंद्र नेमाडे, शेल्लर, मॅक्सवेल, थर्बर, बर्टन, दोस्तोव्हस्की, आयर्विंग स्टोन, हरमन हेस, ब्रेख्त, गोविंद तळवलकर, ऑर्वेल, मर्ढेकर, जी.ए., गंगाधर गाडगीळ, किपलिंग, विल ड्युरांट, हिरोडोटस,

सिसेरो, होमर.

महाराष्ट्रातले, भारतातले आणि देशोदेशीचे लेखक, कवी, नाटककार, विचारवंत, प्रवासी, चित्रकार, शिल्पकार, निसर्गअभ्यासक, तत्त्वज्ञ, समीक्षक, प्राणिशास्त्रज्ञ, पक्षिशास्त्रज्ञ, संशोधक यांचा केवढा तरी स्तब्ध मेळावा ह्या माझ्या खोलीत आहे. शिवाय, ओरिसामधल्या चिल्का सरोवरात स्थलांतरित पक्षी यावेत, तसे पुण्यातील ब्रिटिश लायब्ररी, मॅक्समुल्लर भवनामधून ग्रंथ येत-जात असतातच. कधी व्हर्जिनिया वुल्फ, तर कधी बी. ट्रव्हेन. कधी थेसिगर, तर कधी गुस्ताव्ह क्लीम.

आता समोरच्या रस्त्यावरची रहदारी वाढल्यामुळं धुरोळा खिडकीतून येतो आणि पुस्तकांवर बसतो. मला धूळ रोज झटकावी लागते. हा मांड कुंभारमाश्यांना घरं घालायला आणि पालींना वस्ती करायलाही सोइस्कर आहे. जिंकलेल्या देशातल्या वास्तूंचा जेत्यांनी करावा, तसा कुंभारमाश्यांच्या मातीच्या घरांचा नाश मी निर्घृणपणे करीत आलो आहे. प्राणिशास्त्रावरील पुस्तकांच्या रांगांमागे मला एकवार पालीची चवळीएवढी दोन अंडीही दिसली होती आणि इतिहासपूर्व काळाचे अवशेष मिळावेत, तसा पालीचा एक सांगाडाही सापडला होता. ह्या सरपटणाऱ्या जीवाचा अंत बहुधा ज्ञानाच्या भाराखाली झाला असावा.

मी वेळोवेळी केलेल्या प्रवासाच्या काही दृश्य आठवणीही मांडातल्या कोनाड्यांतून आहेत. बुद्धाचा चकचकीत पितळी मुखवटा – हा मी अबूला भुतानी विक्रेत्याने रस्त्याकडेला मांडलेल्या दुकानातून घेतला. याचा चेहरा मंगोलियन वाटतोच. उभ्या कोनाड्यात ब्रॉन्झचा लक्ष्मी-विष्णूचा अतिशय ललित अशा पोझमधला पुतळा आहे. हा मी मद्रासला मिळवला. दोन किलो वजनाचा ब्रॉन्झचा एक दशभुजा गणपती आहे. ह्याच्या वामांगी शक्तिरूप स्त्री बसलेली आहे, आणि यांची सोंड उजवीकडे वळलेली आहे. हा एकोणीसशे त्रेसष्ट साली मी एका फिरत्या सिंधी अँटिक विक्रेत्याकडून घेतला होता. गणपतीसारखं संपन्न आणि आगळं रूप असलेला आपला दुसरा देव नाहीच.

पेन्सिली, पेनं ठेवायला म्हणून मी एका जाडजूड तांब्याच्या पंचपात्राचा उपयोग करतो. हेही बहुधा दक्षिणेकडच्या कोणा धर्मपरायण माणसाच्या संध्येच्या पळीपंचपात्रांपैकी असावं. याच्यावर सुरेख नक्षीकाम आहे. चार इंच रुंद तोंडाचं आणि चार इंच उंचीचं हे पूजेच्या भांड्यापैकी भांडं माझ्या लेखनाची, रेखाटनाची साधनं – कात्री, डिंकाची ट्यूब, लहान वस्तू मोठी करून दाखवणारं भिंग – असल्या वस्तू सामावून घेण्याइतकं उदार आहे.

माझे मित्र, शिल्पकार भाऊ साठे यांनी खास मला म्हणून भेट दिलेलं एक बोकडाचं शिल्प आहे. ह्याची उभं राहण्याची ऐट जगज्जेत्याची आहे. ही त्याच्या फनगढ्या शिंगांतून, हातभर दाढीतून, ताठ पायांतून, उडवलेल्या शेपटातून दिसते.

हा अजापुत्र कधीही कोणा देवापुढं बळी जाणार नाही, असं वाटतं. बोकडाचं दोंद उठून दिसावं, म्हणून पाठीच्या कण्याला भाऊनं जे वळण दिलं आहे, ते अभिजात आहे. शिल्पकाराची शैली स्वच्छ सांगणारं, असं!

खोलीतल्या उंचावरच्या आडव्या खिडकीच्या फरशीवर मी काही अश्मयुगातील अवजारं, हत्यारं ठेवली आहेत. पुण्याजवळची वेताळ टेकडी आणि पैठणच्या गोदावरी नदीचा काठ हिंडताना मला ही सापडली आहेत. माझ्या लिहायच्या खोलीला या अश्मयुगीन हत्यारांमुळं काही वेगळं परिमाण लाभावं, असा माझा अंत:स्थ हेतू आहे. शिवाय 'खोली' या शब्दाला आणखी एक अर्थ आहे; तोही विसरला जाऊ नये, हे सदैव ध्यानी राहावं.

खोलीत एकच एक जलरंगांतील मोठं निसर्गचित्र आहे. मला हे चित्र फारच मराठी वाटलं, म्हणून श्री. दिवाकर डेंगळे यांच्या चित्रप्रदर्शनात ते विकत घेतलं आहे.

निळ्या-काळ्या पाण्यानं भरलेलं तळं. त्यात गुरं धुण्यासाठी आलेला तांबड्या मुंडाशाचा शेतकरी. पाण्यात शिरलेली गुरं. काठावर शंकराचं देऊळ. उन्हं खात उभा राहिलेला त्याचा कळस. नंदीपाशी झळकफळक लुगड्यांतील बायांची गर्दी. देवळापासून अंतर राखून उभी मुसलमानी तुर्बत. पडकं बांधकाम. दगडी संध्यामठ. इथं-तिथं बाभळी, निंबाची हिरवीगार झाडं. त्यांच्या सावलीत बसलेली दोघं. मागे निळे डोंगर आणि वर ढग भरलं विस्तीर्ण आभाळ. हा महाराष्ट्र!

माझं लिहायचं टेबल चकचकीत, शिसवी रंगाचं आहे. त्यावर बाभळीच्या लाकडातून कोरून केलेला ट्रे. हा कशाला? तर, दुसऱ्या खोलीतून पुस्तकं हाताशी



आणायला आणि वाचनात असलेली पुस्तकं हाताशी ठेवायला. हा लायब्ररी-ट्रे, पाचगणीला राहून सुतारकामाची शाळा चालवणाऱ्या एका अमेरिकन माणसानं मला करून दिला आहे. एक बाजू काढून टाकलेल्या लघुरूप पाळण्यासारखा त्याचा कातीव आकार आहे. घरभर पळणारी पुस्तकं पुन्हा जाग्यावर आणायला हा कामाला येतो.

सुरुवातीपासूनच मी शेफरचं वजनदार, सोनेरी टोपणाचं पेन लिहायला वापरतो. आपली शब्दांची ओळ नांगराचा तास जमिनीतून जावा, तशी असावी म्हणून. अद्यापही एक ठोस शेफर माझ्यापाशी आहे.

कागद ठरावीक आकाराचे. सनलिट बाँड. ह्यात दोनशे शब्द मावतात, म्हणून ते वापरतो. कधी कोरे, कधी आखीव.

लिहिताना अडलो की, काळ्या शाईच्या पेननं पांढऱ्या बाँड पेपरवर रेखाटनं करतो. बैठक टिकते.

रात्री निजानीज झाली, म्हणजे माझं लिहिणं सुरू होतं, ते जमेल तिथपर्यंत. पुष्कळदा तीन वाजतात. गृहस्थाला लेखनासाठी हीच एक वेळ उपलब्ध असते, अशी माझी खात्री झाली आहे. ह्या काळात दरवाज्यावरची बेल वाजत नाही. फोन येत नाही.

मी रोज लिहीत नाही. सुचेल, तेव्हा मात्र लागोपाठ बसतो. सगळेच लेखक आळशी असतात. लेखन टाळण्याकडेच त्यांचा कल असतो. माझंही तसंच आहे. कुणाचा जबरदस्त दबाव आला, म्हणजेही मी लिहितो.

अलीकडे मला वाटतं की, लेखन ही फार मेहनतीची गोष्ट आहे. अंदमानात 'कोलू' पिसण्याइतकी.

लिहिताना धूम्रपान, तंबाखू मला पूर्वी लागत असे. आता लिहिणं हा एकच कैफ पुरा असतो.

लहानपणापासूनच आहे, ती लोळता-लोळता वाचण्याची सवय अजून टिकून आहे. ह्या खोलीत एक दिवाण आहे. लोड, उश्या आहेत. बसून, लोळून, या अंगावरून त्या अंगावर होत वाचावं. कंटाळा आला की, छातीवर उघडं पुस्तक ठेवून घोरावं.

लिहायच्या खोलीचा कधीमधी मी स्टुडिओही करतो. फ्रेंच बनावटीचं घडीचं इझेल मी अभ्यासिकेत उभं करतो. हे मी लॉस एंजेलिसला घेतलं. त्यावर कॅनव्हास बोर्ड लावतो. लिहा-वाचायची खोली टर्पेंटाईन, लेन्सेड ऑइल्सच्या वासानं भरून जाते. महिना, दोन महिने, तीन महिने... इझेल इथंच खडं असतं. पक्षी, पोर्ट्रेट्स रंगविली जातात.

नवी वाचायची पुस्तकं आली, काही लिहावं – असं डोक्यात आलं की, त्याची घडी होते आणि दुसऱ्या खोलीत रवानगी होते.

कधीमधी गावातले, परगावचे जिवलग मित्र फार दिवसांनी जमतात, तेव्हा हीच खोली मैफलीची होते. हसण्या-खिदळण्यानं, चर्चेनं गाजत राहते.

महदाईसा लखुबाईसांसी महावाक्याचिया गोष्टी करीत असताना श्री चक्रधरस्वामींनी सांगितलं आहे की,–

'महावाक्य गोष्टी रानीवनी कीजेति की गा....'

यावर महदाईसा बोलली, ''हो का, जी : चुकलिएं.''

पण रानोवनीच कराव्यात, अशा महावाक्य गोष्टीसुद्धा आम्ही मित्र ह्या खोलीतच करतो.

(प्रवास एका लेखकाचा)



अक्षर बंगला



# माडगूळकरांचे कथाविश्व

माडगूळकरांच्या साहित्यात - कला आणि कथा साहित्यातही - आत्मचरित्रात्मकतेचा घटक प्रभावी आहे. त्यांच्या कथेतील आत्मवृत्तात्मकता अगदी उघडपणे आलेली दिसते. उदाहरणार्थ त्यांच्या कथांतील निवेदक 'मी' अनेकदा व्यंकटेश माडगूळकर या नावाने अवतरतो. त्याच्या जोडीला काही वेळा प्रत्यक्षातील सुपरिचित माणसेही आपल्या नावागावाव्यक्तित्वानिशी पात्रे म्हणून आलेली असतात. असे असले तरी कथेत जे आकारलेले असते ते प्रत्यक्ष वास्तवाची केवळ प्रतिकृती नव्हे, तर स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असलेले कथागत वास्तव असते. म्हणजे कल्पिताच्या पातळीवरील ती एक नवनिर्मिती असते. ''जे प्रत्यक्षात घडले तेच अगदी थोडे फेरफार करून लिहायचे ही त्यांची प्रकृती आहे'', असे गाडगीळांनी माडगूळकरांविषयी म्हटले आहे., त्याचे इथे स्मरण होते.

**माडगूळकरांच्या कल्पकतेची प्रवृत्ती किंवा तिचा गुणधर्म प्रत्यक्ष वास्तवातून, त्यातील घटितांतून कलात्मक, अर्थपूर्ण आकार शोधून काढणे हा आहे. केवळ कल्पनाजनित अशी पात्रे किंवा घटिते निर्माण करणे ही त्यांची सृजनाची तऱ्हा नसावी. गाडगीळांनी ज्याला थोडासा फेरफार म्हटले आहे तो माडगूळकरांच्या प्रतिभेचा परीसस्पर्श होय, ज्यातून प्रत्यक्ष वास्तवाचे (अर्थातच कलावंताला भावलेल्या ) कलात्मक वास्तवात, कल्पित सृष्टीत रूपांतर होते.**

या कल्पित सृष्टीतील निवेदक व पात्र होऊन आलेले व्यंकटेश माडगूळकर म्हणजे लेखक माडगूळकरांची एक निर्मिती असते. नावगाव तेच असले तरी कथागत पात्र माडगूळकर हे लौकिकातले माडगूळकर नसून तो त्यांचा एक 'दुसरा स्व' असतो. त्याचे अस्तित्व त्या विशिष्ट कथाविश्वापुरते सीमित असते. स्वत:ची एक पात्र - एक निवेदक पात्र म्हणून निर्मिती करताना लेखक माडगूळकर स्वत:पासून अंतरावर गेलेले असतात. या अलिप्ततेमुळे तसेच अंतर्मुखता व बहिर्मुखता यांचे जे संतुलन त्यांच्या कलावंत व्यक्तिमत्त्वात आहे, त्यामुळे पारदर्शी आत्मवृत्तात्मता असूनही माडगूळकरांच्या लेखनात आत्मकेंद्रितता किंवा स्वकेंद्रितता अनुभवाला येत नाही.

माडगूळकरांच्या कथासाहित्याची प्रेरक कळ (trigger) माणसे म्हणजे व्यक्ती आहेत. ''कोऱ्या कागदाची कहाणी'' मधील भासचित्रात लेखकाला त्याने न लिहिलेल्या कथांची आठवण करून देतात, आपल्यावर लिहा असा आग्रह धरतात किंवा तगादा लावतात ती माणसे. तोवर लिहिता न आलेल्या आणि लेखकाची वाट अडवून त्याला अस्वस्थ करणाऱ्या या कथा अर्थात विशिष्ट अनुभवांच्या आहेत. ती माणसे, त्यांचे जगणे त्या त्या अनुभवाचे, जीवनार्थाचे माध्यम आहे. आधी म्हटल्याप्रमाणे माडगूळकरांच्या कितीतरी कथा व्यक्तिचित्रात्मक आहेत. किंबहुना लेखक म्हणून त्यांनी आपली मुद्रा पहिल्याने आणि कसदारपणेही उमटवली ती 'माणदेशी माणसां'तून या अर्थाने त्यांची कथा व्यक्तिकेंद्री किंवा व्यक्तिप्रधान आहे, असे म्हटले तरी ती केव्हाही त्या त्या व्यक्तीपुरती मर्यादित राहिलेली नाही. तिच्यातील जीवनार्थाच्या प्रसरणशीलतेमुळे त्या त्या समाजातील जीवनसंस्कृतीचे आणि एकूण मानवी जीवनव्यवहाराचेही मर्मस्पर्शी चित्रण तिच्यातून साधले जाते. उदाहरणार्थ, 'दरवेशी' ही कथा नबीखान दरवेशाची असली, तरी ती पावसावर जगणे अवलंबून असलेल्या, सुगी नीट झाली तर ठीक नाहीतर जगण्याची घडीच जिथे विस्कटून जाते, अशा खेड्यातल्या कृषीप्रधान जीवनसंस्कृतीचीही कथा आहे. माणसा माणसांमधल्या परस्परसंबंधाचीही आहे. सामाजिक परिस्थितीतून निर्माण होणारी दु:खे शेवटी माणसाच्या विशिष्ट मूलभूत प्रकृतिधर्मातूनही उद्भवलेली असता, याचे भान देखील या चित्रणातून व्यक्त होताना दिसते. व्यक्तिचित्रात्मक कथेचा कसदारपणा माडगूळकरांनी आपल्या कथेतून मूर्त केला, त्या प्रकारावर स्वत:ची अशी एक स्वतंत्र मुद्रा उठवली. त्यांनी त्याच एका प्रकारचे लेखन केले, असे अर्थातच नाही.

माडगूळकरांच्या कथेतील अपारंपरिकता, स्वतंत्रता त्याच्या कथेतील कथानकादी घटकांच्या अनुषंगाने सूत्ररूपाने विचारात घेता येईल. गाडगीळांच्या 'बिनचेहऱ्याची संध्याकाळ', 'काजवा', 'खरं सांगायचं म्हणजे' किंवा 'लेखकाची गोष्ट' यांसारख्या कथांतल्याप्रमाणे सहज जाणवेल, नजरेत भरेल असे कथारचनेतील वेगळेपण माडगूळकरांच्या कथांतून सहसा आढळणार नाही. तथापि, ज्या अपारंपरिक, स्वतंत्र प्रकृतीच्या कथार्थाची ते निर्मिती करत होते त्यामुळे वरवर परिचित वाटणाऱ्या अशा कथानकरचनेला त्यांनी नवी कळा दिली, हे दिसून येते.

माडगूळकरांनी कथानकाच्या रचनेत नवनवे प्रयोग केले आहेत., त्यात लक्षणीय वैचित्र्यपूर्णता आणली आहे असे दिसून येत नसले, तरी कला दृष्ट्या एक महत्त्वाची गोष्ट त्यांनी साधली आहे ती म्हणजे कथार्थाच्या प्रकृतीनुसार त्यांच्या कथारचनेचे स्वरूप सहजपणे व सूक्ष्मपणे बदलते राहिले आहे. रचनेतील चमत्कृतीपूर्णतेची ओढ त्यांना नाही. मात्र सहजसाध्या वाटणाऱ्या त्यांच्या कथानक रचनेमागे मुरब्बी कलावंताचे कसब आहे, हे ओळखले पाहिजे.

मुळात माडगूळकर हे एक कसलेले कथाकथक आहेत, कथेच्या-कथनाच्या-

कलातंत्राचे पक्के जाणकार आहेत. परंतु त्यांच्या कथांत या तंत्राला, कसबाला स्वतंत्र महत्त्व वा स्थान मिळालेले नाही. कथार्थाच्या निर्मितीच्या लक्ष्याच्या अंगी लागणारे, नामानिराळे राहू पाहणारे असे हे कलातंत्र आहे आणि म्हणून त्यात कुठे यांत्रिकता वा कृत्रिमपणा आलेला नाही. तसेच क्षीण आणि निकस पुनरावृत्तीही आपल्याला तिथे आढळणार नाही. वरवर पाहता सारख्या वाटणाऱ्या त्यांच्या कथानकांच्या रचनेतही सूक्ष्म भेद दिसून येतील.

अधांतरी किंवा प्रवाही अखेरी असलेल्या अशाही माडगूळकरांच्या कथा आहेत. उदाहरणार्थ, 'कमळी' ही कथा. कोवळा, वाढाळू वयातील असा तरुण मुलगा आणि विधवा तरुणी यांच्या परस्परांविषयीच्या ओढीचे, मनातील उलघालींचे आशयसूत्र असलेल्या या कथेला ठोस अखेरी नाही. अधांतरी शेवट असलेली, खुल्या तोंडाची अशी ही रचना आहे. निश्चित स्वरूपाच्या शेवटाकडे रोख नसलेल्या अशा माडगूळकरांच्या इतरही कथा आहेत आणि अशी रचना हे त्या त्या कथाशयाचेच मागणे आहे.

चौकटीत आतली एक चौकट असावी, तसे कथनाच्या पोटात आणखी एक कथन अशी रचना माडगूळकरांच्या 'बळीची गोष्ट', 'फक्कड गोष्ट', 'भुताचा पदर', या कथांतून दिसून येते. रामोशी, गुराखी, कुलकर्णी अशा कथन केलेल्या, मौखिक परंपरेतल्या रंगतदार, रंजनपर विनोदी 'गोष्टी' ही या कथांच्या आतल्या चौकटीतील कथने आहेत. लिखित परंपरेतल्या, आधुनिक वळणाच्या कथनाच्या कोंदणात इथे मौखिक परंपरेतले कथन सादर केले आहे. अशा रचनेमुळे मूळ 'गोष्टी'रूप कथनाला एक नवा संदर्भ, नवे परिप्रेक्ष्य प्राप्त झाले आहे. कथनाचे दोन भिन्न पोत असूनही कथेची एकसंधता ढळलेली नाही.

माडगूळकरांच्या कथाविश्वात 'पात्र' हा घटक विशेष प्रभावी आहे, असे दिसून येते. आपल्या समाजातील विविध स्तरांतील, विविध जातिजमातींतील, व्यवसायांतील आणि विविध वयोगटांतील व्यक्तींनी त्यांची पात्रसृष्टी घडलेली आहे. स्वभावविशेष, व्यक्तिमत्त्व, जीवनसरणी, सुखदुःखे इत्यादी बाबतींतील त्यांच्यातील वैचित्र्यदेखील लक्षणीय आहे. **पात्रांचा आणि समाजजीवनाचा एवढा पैस सामावून घेणारी कथासृष्टी मराठी साहित्यात सहजी आढळणार नाही.** माडगूळकरांच्या कथांतील पात्रसमूहात मानवी पात्रांच्या जोडीने मनुष्येतर प्राणिपात्रांचाही समावेश आहे. या प्राणिपात्रांची संख्या, त्यांच्या चित्रणातली सूक्ष्मता व मार्मिकता आणि त्यांना कथेत असलेले स्थान या गोष्टी लक्षात घेता ही प्राणिपात्रे हे माडगूळकरांच्या कथाविश्वाचे एक खास वैशिष्ट्य म्हणता येईल.

माणसे आणि इतर प्राणी यांच्यातील अनेकविध परस्परसंबंधांचे कथात्म दृष्ट्या प्रयोजनपूर्व असे चित्रण ही मराठी कथेतील अनुभवविश्वाला माडगूळकरांनी दिलेली एक महत्त्वाची जोड आहे. माणसांचे जग आणि प्राण्यांचे जग यांचा एकात्मतेने वेध

घेणे, माणसे आणि प्राणी यांच्यातील समांतर वर्तनसूत्रे हेरणे हे कलावंत माडगूळकरांच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. माणसांच्या कृतीचे, हालचालींचे, अगदी आवाजाचेही वर्णन करताना ते कित्येकदा पशुपक्ष्यांची उपमाने योजतात, त्यातले मर्म या दृष्टीने लक्षात घेण्यासारखे आहे.

माडगूळकरांच्या कथांच्या केंद्रस्थानी असलेली माणसे ही सर्वसामान्य माणसे आहेत. या सामान्य माणसांची सुखदु:खे, त्यांचे एकाकीपण यांच्या चित्रणातूनच माडगूळकरांची आपली कथासृष्टी उभारली. रूढ वीरनायकाची प्रतिमा त्यांच्या या कथेतून आढत नाही, हे अपेक्षितच आहे. हे एकूण नवकथेचेच वैशिष्ट्य म्हणता येईल. सामान्य माणसाची कहाणी सांगणाऱ्या अशा प्रत्येक कथाकाराचे कथाविश्व मात्र अर्थातच स्वतंत्र आहे.

माडगूळकरांच्या पात्रचित्रणपद्धतीचे काही खास विशेष सांगता येतील. माणसाचे शरीर ही त्याच्या मनाची बाहेरची बाजू आणि मन हे शरीरातले आतले अंग या अद्वैताचे मार्मिक भान माडगूळकरांच्या साहित्यातून अनुभवाला येते. पात्राचे दिसणे, उठणेबसणे, शारीरिक हालचाली, लकबी यांच्या नेमक्या चित्रणातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्म पकडणे ही त्यांची शैली आहे. नुसत्या शब्दचित्रातूनही ते बरेच काही सांगून जातात.

'काळी आई' कथेतील म्हातारी माणसे दिवस मावळायला मारुतीच्या देवळात जाऊन विसावतात. तेव्हा ही 'वयाने कली मंडळी तिथे पाठीशी पागोटी घेऊन खांबाला टेकली होती.' हे सांगणे माडगूळकरांना आगत्याचे वाटते. माडगूळकर पात्राचे नुसते बोलणेच नव्हे तर त्याचा स्वर, आवाजाची जातही नोंदवतात. उदा. 'गुप्त धन' मधील 'पाव्हण्यानं सावकाशीनं उत्तर दिलं त्याचा आवाज मेंढरासारखा होता.' त्यांनीच म्हटल्याप्रमाणे त्यांना मानसांचा गप्पपणाही ऐकू येतो. आणि तो ते आपल्या वाचक-श्रोत्यांना ऐकवूही शकतात. पात्रांच्या शारीरिक हालचालींच्या, कृतींच्या, लकबींच्या चित्रणातून ते त्याची मन:स्थिती, त्याचे व्यक्तिमत्त्व यांचेच दर्शन घडवतात असे नव्हे; पात्राचे सामाजिक स्थान, इतरांशी असलेले संबंध इत्यादी इतर गोष्टीही त्यातून सूचित होत असतात. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्याचे व्यक्तिगत स्वभावविशेष, मनोधर्म क्रियाशिल असतात. तसेच विशिष्ट सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे, सांस्कृतिक परंपरेचे घटकही प्रभावी ठरतात. विशिष्ट सामाजिक स्तरातील, जाती व्यवसायातील गटाचा एक घटक असणे यातूनही माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला, वर्तनाला वळण मिळत असते. या वस्तुस्थितीची सूक्ष्म व अचूक जाण माडगूळकरांच्या साहित्यातून प्रतीत होते. माणसाच्या व्यक्तीमत्त्वातली संगतीची त्यांची जाणीवही प्रगल्भ आहे.

माडगूळकरांच्या कथासृष्टीत पुरुषांना प्राधान्य आहे हे खरे; परंतु त्यांची स्त्रीपात्रेही

वैविध्य आणि मार्मिक चित्रण या दोन्ही दृष्टींनी लक्षणीय आहेत. उदाहरणार्थ त्यांच्या कथेतील स्खलनशील स्त्रियांच्या व्यक्तिरेखा पाहिल्या तरी त्या एका साच्यातील नाहीत हे लक्षात येईल. 'अनुभव' मधील पुतळा, 'गोकुळा' मधील गोकुळा, 'सीताराम एकनाथ' मधील वाणीण, 'फक्कड गोष्ट' मधील वाणीण, 'सर्व्हिस मोटर' मधील इजा कुंभारची सून या सर्व त्रिमिती व्यक्तिरेखा नसूनही, तसेच त्यातील काहींना कथेत अगदी मर्यादित भूमिका व अवकाश मिळालेला असूनही त्या साचेबंद नाहीत हे महत्त्वाचे आहे. तसेच याहून अगदी वेगळ्या स्वभावधर्माच्या म्हणजे कुटुंबासाठी कष्टणाऱ्या, पारंपारिक मूल्ये जपणाऱ्या, सत्त्वशील अशा स्त्रियांच्या ज्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथांतून आढळतात त्यांमागेही उदात्तीकरणाची वा गौरवाची प्रेरणा दिसून येत नाही. मूल्यादर्श साकार करणारी आदर्श स्त्रीप्रतिमा असा संदर्भ त्या चित्रणांना ते देत नाहीत.

स्त्रीच्या जीवनातील दु:ख आणि एकाकीपण, तिची असहायता यांचे चित्रण माडगूळकरांच्या कथांतून येते त्यातही एकसुरीपणा नाही. बहुधा दैन्यदारिद्र्यातून उपजणाऱ्या या दु:खाच्याही विविध छटा त्यांनी टिपल्या आहेत. 'एक प्रसंग' मधील साऱ्या जगाशी बनाते जोडणारी, मुलांची उपासमार सहन होत नाही म्हणून दारी येणाऱ्या भिक्षेकरी गोसाव्याकडेच पिठाची भिक्षा मागणारी पांढरपेशा कुटुंबातील आई; भूक सहन होत नाही म्हणून मुलाला घरात उरलेले एकमेव हळकुंड दिव्यावर भाजून खायची वेळ येते हे पाहून कळवळलेली, दारिद्र्याने आगतिक व घायाळ झालेली 'असंच...' मधील येसा महारीण, बाळंतपण सुखरूप व्हावे म्हणून चोरी करून तुरुंगात आश्रय घ्यायचा आडमार्ग हाच पर्याय उरलेली 'ओझं' मधील लाडाबाई, एकत्र कुटुंबातल्या जाचाखाली जन्मभर खपत राहिलेल्या, वैधव्याने अधिकच असहाय झालेल्या, मुलीच्या लग्नासाठी पुरत्या लाचार झालेल्या काकी (काकींच्या पाटल्या), जिचे रूप हाच पुढे शाप ठरतो अशी, दरिद्री संसारात कधीही सुखाचा वारा न लागलेली दुबळ्या नवऱ्याची रूपवान बायको (दुबळा) आणि चहूबाजूनी नाडल्या गेलेल्या विधवा सुंद्रा आणि परित्यक्ता कोंडा या मायलेकी (सीताराम-एकनाथ) - स्त्रीच्या दु:खाची अशी विविध रूपे माडगूळकरांच्या कथांतून अतिशय संवेदनशीलतेने साकारलेली दिसतील.

माडगूळकरांच्या कथांतील लहान मुलांच्या पात्रांचाही स्वतंत्रपणे उल्लेख केला पाहिजे.

'बावा' किंवा 'शाळा' यांसारख्या कथा तर मुलांच्या भावविश्वाचेच चित्रण करणाऱ्या कथा आहेत. प्रौढ पात्रे ही तिथे दुय्यम भूमिका बजावणारी, पूरक स्थान असलेली अशी आहेत. 'झेल्या' ही व्यक्तिचित्रात्मक कथा एका मुलाचीच आहे. मुलांच्या व्यक्तीरेखा केंद्रस्थानी असलेल्या अशा कथांखेरीज इतर कथांतून आलेले मुलांचे चित्रणही लक्षणीय आहे आणि कथार्थानुसार त्या चित्रणाचे प्रयोजन आणि

स्वरूप देखील बदलते राहिलेले आहे.

गैरकारभार उघडकीला येण्यात आणि त्यांनी सूडबुद्धीने अधिकाऱ्याची खोड मोडण्याच्या कामगिरीत मुले अपरिहार्यपणे साक्षीभूत असतातच. एरवीही प्रौढांच्या जगाचे, कुटुंबजीवनाचे त्यातील सुखदुःखाचे चित्रण लहान मुलांच्या अस्तित्वाशिवाय पूर्ण होत नाही. 'पारधी' कथेतील मिठू शिपाई निवेदकाला भेटायला येतो तेव्हा कोंबडीच्या पंखाखाली पिले बसावीत तशी त्याची पोरे त्याच्या मांडीवर, काखेतून बसली हा तपशील सांगायचा रहात नाही. लहान मुलांच्या व्यक्तिरेखांना कथेत असे अंगभूत, प्रयोजनपूर्व स्थान वा अस्तित्व असणे ही गोष्ट गाडगीळ वा माडगूळकर यांच्या कथालेखनातले एक समान सूत्र आहे.

कथात्म अवकाश किंवा कथेतील स्थळकाळादी वातावरण या घटकाची माडगूळकरांनी कथाशयाच्या निर्मितीसाठी केलेली सर्जक योजनाही विचारात घेण्यासारखी आहे. त्यांच्या कथेतील निसर्गपरिसर झाडापेडांच्या, फुलाफळांच्या, पशुपक्ष्यांच्या, नाना जीवांच्या नेमक्या तपशिलांसह येतो. सूक्ष्म निरीक्षण, चहू अंगांनी अनुभव घेण्याची क्षमता, ऐंद्रिय संवेदनांची समृद्धी या वैशिष्ट्यांना अशा चित्रणात स्वायत्त स्थान वा मूल्य नसते. कथेच्या आशयसूत्राशी, तिच्यातील अनुभवरूपाशी या घटकाचे अतूट नाते असते, हे महत्त्वाचे असते.

कथा या साहित्यप्रकाराचा मर्यादित पैस लक्षात घेता मोजक्याच वेचक तपशिलांच्या निवडीतून परिणाम साधावा लागतो. माडगूळकरांचे मितव्ययाचे कौशल्य त्यांच्या कथेतील वातावरणनिर्मितीतूनही प्रत्ययाला येते.

कथात्म अवकाश हा एक सांस्कृतिक अवकाशही असतो. ग्रामजीवनाचे चित्रण करणाऱ्या माडगूळकरांच्या कथेतील देऊळ, शाळा, तक्क्याची इमारत, चावडी ही आणि अशी स्थळे तिच्यातील सांस्कृतिक प्रदेशच आहेत. या स्थळांचे चित्रणही प्रसंगाच्या मुळात कथार्थाच्या मागण्यानुसार भिन्न भिन्न प्रकारे पण नेहमीच नेमक्या आणि किमान तपशिलांतूनच साधलेले दिसेल. ते ते प्रसंग त्या त्या स्थळी घडणे याला विशिष्ट अर्थ असतो, हेही जाणवते.

माडगूळकरांच्या कथेतील निवेदनाविषयीची काही निरीक्षणे सूत्ररूपाने मांडता येतील. निवेदकाच्या दृष्टिकोनाला कथारचनेत, कथार्थाच्या निर्मितीत जे कळीचे स्थान असते त्याचे कलात्म भान त्यांच्या कथांतून व्यक्त होते. त्यामागे आधुनिक व प्रगल्भ अशी कथादृष्टी असल्याचे जाणवते. माडगूळकरांनी देशी मौखिक परंपरेतील कथनाची कला आधुनिक युगातील लिखित परंपरेतील कथानिर्मितीच्या स्तरावर, नव्या कथात्म प्रयोजनांसाठी योजली, तिला नवी कळा दिली. त्रयस्थ निवेदकाच्या दृष्टिकोनात माडगूळकरांनी लक्षणीय असे वैचित्र्य आणले आहे, असे दिसून येत नाही. मात्र असे असूनही आपल्या कथांमध्ये ते वैचित्र्यपूर्णता निर्माण करू शकले आहेत.

एकोक्तींचा (internal monologue) वापर करणे, त्याच्या मनातील वातावरण उभे करणे, या साधनांची योजना माडगूळकर करीत नाहीत, असे नाही. उदाहरणार्थ 'काळी आई' कथेतील शेतारानाचा निरोप घेणाऱ्या आप्पांचे मनोगत किंवा 'नामा सुढाळाचे सुखदु:ख' कथेतील मुलासाठी झुरणाऱ्या नामाच्या बायकोच्या मनातील उलघाल. परंतु त्रयस्थ निवेदकाचे असे सर्वज्ञत्व माडगूळकरांनी अगदी मर्यादित प्रमाणात वापरले हे खरे.

वाचकाच्या कल्पक संवेदनशीलतेला आवाहन करणाऱ्या मोकळ्या जागा कथनात असणे, प्रत्यक्ष भाष्याचा किमान वापर हे माडगूळकरांच्या कथांचे एक वैशिष्ट्य आहे. 'माणूस स्वत:पेक्षा दुसऱ्याची समजूत फार चांगल्या रीतीने घालू शकतो.' अशी थेट भाष्ये त्यांच्या कथांत मोजकीच असतील. 'सर्व्हिस मोटार' या कथेतील निवेदन हे देखील या संदर्भातले अपवादात्मक उदाहरण म्हटले पाहिजे. निवेदकाच्या दृष्टिकोनातच भाष्य गर्भित असणे, प्रांत, प्रसंग वा वातावरण यांच्या आणि त्यांच्या संबंधातल्या तपशिलांच्या निवडीतूनच भाष्य ध्वनित होणे, अशी व्यंजनेवर भर देणारी माडगूळकरांची कथनशैली आहे.

संयत, मितव्ययी, किमान साधनांचा वापर करणारी अशी ही निवेदनपद्धती आहे. विशेषणे-क्रियाविशेषणे यांचा वापरही तिथे कमीत कमी आढळेल. विशिष्ट प्रसंगाची, भाववृत्तीची लय ग्रहण करणारे असे माडगूळकरांच्या कथेतील निवेदन असते. शब्दांचा, वाक्यांचा नाद, तोल यांची मार्मिक जाण, शब्दांच्या निवडीतील अचूकपण त्यातून व्यक्त होते.

पात्रांकडे औपरोधिक, मिस्किल दृष्टिकोनातून पाहणे हे माडगूळकरांच्या कितीतरी कथांतून दिसून येणारे निवेदकाचे वैशिष्ट्य, व्यापक संदर्भात नवकथेच्या - नवसाहित्याच्या - प्रवाहाशी नाते सांगणारे आहे.

माडगूळकरांच्या कथेतील संवादघटकांचे स्वरूप, त्याचे उपयोजन यांतूनही त्यांची आधुनिक कथादृष्टी व्यक्त होते. पात्रप्रसंगादींच्या निर्मितीसाठी त्यांनी संवादांचा केलेला कल्पक वापर, त्यातून व्यक्त होणारे त्यांचे नाट्यात्मकतेचे सूक्ष्म व प्रगल्भ भान उल्लेखनीय आहे. अगदी नीरस, सपक असे संभाषण देखील ते कसे व्यंज, प्रयोजनपूर्ण करतात याचे एक उदाहरण म्हणून 'बाई' कथेतील बाई आणि पुढे ज्यांच्याशी त्यांचा घरोबा जुळतो ते विधुर सहकारी वाळिंबे मास्तर यांच्यातील जुजबी संभाषणांचे नमुने पाहता येतील. कथा या साहित्यप्रकारातील निर्मितीसाठी अगदी यथोचित अशी माडगूळकरांची मितव्ययी शैली त्यांच्या संवादयोजनेतूनही दिसून येतेच.

माडगूळकरांच्या कथेतील प्रतिमासृष्टीतूनही त्यांच्या निर्मितीतली मौलिकता व स्वतंत्रता दिसून येते. माणसांचे वर्णन करताना त्यांनी पशुपक्ष्यांची प्रतिमाने कशी अन्वर्थकपणे योजली आहेत याचा निर्देश आधी दुसऱ्या संदर्भात आला आहेच. 'मी

वानरासारखा गप बसून होतो.' 'जांभळाचे दिवस' या कथेतले याच जातीचे एक उदाहरण होय.

माडगूळकरांच्या कथासाहित्यातील भाषा ही प्रमाण आणि बोली अशा दोन्ही रूपांत योजलेली दिसते. संवादासाठी त्यांनी बोलीचा वापर केलेला आहे. आणि त्यातही जातिव्यवसायांनुसार भिन्न भिन्न भाषारूपे आलेली आढळतील. त्यांच्या नागरच नव्हे तर ग्रामीण कथांतील निवेदनाची भाषा देखील प्रमाणभाषा आहे. मात्र या प्रमाणभाषेत बोलीतील शब्द, वाक्यप्रयोग मिसळलेले आहेत. त्या त्या कथेतील कथाशयाशी संवादी, विशिष्ट वातावरणाचा, जीवनसंस्कृतीचा गंध जागवणारी अशी विशिष्ट भाषारूपे त्यातून साधली आहेत आणि त्यातील वैविध्य लक्षणीय आहे. ग्रामीण कथेच्या निवेदनासाठी प्रमाण भाषेची योजना करताना तिचा बोलीशी जिवंत नाते राखत, त्या त्या कथार्थाची गरज ओळखून जो कल्पक, सर्जनशील वापर माडगूळकरांनी केला आहे, तो बारकाइने लक्षात घेतला तर ग्रामीण कथेचे निवेदन ग्रामीण बोलीतच करणे आवश्यक वा अपरिहार्य आहे, या ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या नेत्यांनी घेतलेल्या आग्रही भूमिकेतील कोतेपण व वैय्यर्थ्य स्पष्ट होते.

नागर असो वा ग्रामीण, माडगूळकरांच्या एकूणच कथांतून योजलेल्या त्यांच्या भाषेचा – तिच्यातील शब्दकळेचा, भाषिक वापरांचा पैस मोठा आहे. अर्थाच्या सूक्ष्म छटा मूर्त करण्याची तिची क्षमता, तिच्या वापरातला नेमकेपणा लक्षणीय आहे. 'मी जे भोगले, जे पाहिले, जे ऐकले त्या त्या सगळ्यांनी माझी भाषा बनलेली आहे.' असे माडगूळकर म्हणतात. भाषा आणि अनुभव यांच्या या अभिन्नजीवत्वाची खूण त्यांच्या साहित्यातून पटते. **'माझ्या लेखनाची भाषा, गुऱ्हाळावर बोलावून रस द्यावा, तशी लोकांनीच मला दिली आहे.'** असेही माडगूळकरांनी म्हटले आहे. लोकांनी 'दिलेली' भाषा 'घेण्याची', साहित्यभाषा म्हणून तिचा सर्जनशील वापर करण्याची माडगूळकरांची क्षमता ही खरे तर कळीची गोष्ट आहे. भाषा ही आशयाची वाहक नव्हे, तर तीच आशयाची निर्मिती करत असते, याची जाण असलेली व प्रचीती देणारी अशी माडगूळकरांची कथा आहे.

माडगूळकरांची कथालेखनाची कारकीर्द दीर्घ असली तरी त्यांच्या कथेत मूलभूत महत्त्वाचे असे फारसे बदल झालेले दिसत नाहीत. तिच्या कलात्म गुणवत्तेतील सातत्याचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. मराठी कथेत सुमारे पन्नास वर्षांपूर्वी जे ऐतिहासिक महत्त्वाचे मन्वंतर घडून आले, त्या प्रक्रियेत माडगूळकरांच्या कथालेखनाचा अर्थपूर्ण सहभाग होता. हे कथासाहित्य एक कलात्मक निर्मिती म्हणून आजही लक्षणीय व प्रस्तुत ठरते.

डॉ. सुधा जोशी

(कथा:संकल्पना आणि समीक्षा या मौज प्रकाशनच्या पुस्तकातील काही भाग)

❐



# ओळख लेखकांची सुधा मूर्ती

सुधा मूर्ती यांचा जन्म १९५० साली कर्नाटक मध्ये झाला. त्यांनी कॉम्प्युटर सायन्स या विषयातील एम.टेक. ही पदवी प्राप्त केली आहे. पुणे येथे टेल्को कंपनीत निवडल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला अभियंता होत. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. सुधा मूर्ती या 'इन्फोसिस फाउंडेशन' च्या अध्यक्षा आहेत. या फाउंडेशन तर्फे करण्यात येणाऱ्या समाजोपयोगी कार्यासाठी त्या विख्यात आहेत. कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या त्या प्रणेत्या आहेत. १९ नोव्हेंबर २००४ रोजी त्यांना समाजकार्याच्या क्षेत्रातील त्यांच्या असामान्य योगदानाबद्दल 'राजलक्ष्मी' पुरस्कार मिळाला. २००६ मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे सन्माननीय 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

सुधा मूर्ती यांना सामाजिक कार्य आणि साहित्यसेवेसाठी सहा डॉक्टरेट्स मिळाल्या आहेत. यापैकी दोन डॉक्टरेट्स महाराष्ट्रातील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे देण्यात आल्या. कर्नाटकातील गुलबर्गा विद्यापीठाकडून आणि कर्नाटक विद्यापीठाकडून त्यांना डॉक्टरेट्स बहाल करण्यात आल्या. तामिळनाडूतील सत्यभामा विद्यापीठ आणि आंध्रप्रदेशातील श्री पद्मावती विश्वविद्यालय यांनीही त्यांना डॉक्टरेट् देऊन सन्मानित केले.

## सुधा मूर्ती यांची साहित्यसंपदा

| पुस्तकाचे नाव | अनुवाद | किंमत |
|---|---|---|
| वाइज अँड अदरवाइज | लीना सोहोनी | १५० |
| गोष्टी माणसांच्या | लीना सोहोनी | १४० |
| पुण्यभूमी भारत | लीना सोहोनी | १३० |
| थैलीभर गोष्टी | लीना सोहोनी | १५० |
| (आपटे वाचन मंदिराचा उत्कृष्ट अनुवाद पुरस्कार) | | |
| सुकेशिनी | लीना सोहोनी | १३० |
| बकुळा | लीना सोहोनी | १२० |
| महाश्वेता | उमा कुलकर्णी | १४० |
| डॉलर बहू | उमा कुलकर्णी | १२० |
| सामान्यांतले असामान्य | उमा कुलकर्णी | १३० |
| अस्तित्व | ए. आर.यार्दी | ९० |
| पितृऋण | मंदाकिनी कट्टी | ८० |







## सुधा मूर्ती यांच्या 'डॉलर बहू' यांच्या पुस्तकातील काही भाग

बेंगळूरहून मिरजेकडे जाणाऱ्या कित्तूर-चन्नम्मा एक्सप्रेसची चंद्रू अस्वस्थ मनानं वाट पाहत होता.

त्याला स्टेशनवर येऊन बराच वेळ झाला होता, पण अजूनही गाडीचा पत्ता नव्हता.

चंद्रूचा धाकटा भाऊ गिरीशही त्याच्याबरोबर होता. पण 'आलोच एका मिनिटात दोन पेपर घेऊन!-' असं सांगून तो जो निघून गेला होता, तो अर्धा तास होऊन गेला तरी आला नव्हता. चंद्रू मनातल्या मनात चडफडत पुन्हा-पुन्हा घड्याळ पाहत होता.

रेल्वे सावकाश स्टेशनमध्ये शिरताना दिसली. ती सावकाश प्लॅटफॉर्मला लागली तेव्हा चंद्रूच्या मनाची अस्वस्थता थोडी कमी झाली. तरीही मनाच्या एका कोपऱ्यात कातरता भरली होती. वाटत होतं, आजवर न पाहिलेलं गाव - धारवाड! कसं आहे कोण जाणे!

आयुष्यात प्रथमच आपलं लाडकं आणि चिरपरिचित माहेर सोडून अपरिचित पतीमागून आनंदानं, तरीही कातर मनानं जाणाऱ्या नव-विवाहितेसारखी चंद्रूची मन:स्थिती झाली होती.

बेंगळूर, मंड्य, मैसूर, शिवमोगा ह्या प्रदेशापलीकडे चंद्रू आजवर कधीही गेला नव्हता. आता शिक्षण संपल्यावर पहिल्या-वहिल्या नोकरीच्या निमित्तानं तो धारवाडला निघाला होता.

धारवाडमध्ये त्याला नोकरी मिळाली होती. आज-काल नोकरी मिळणंच कठीण असल्यामुळे हाताला लागलेली पहिली नोकरी सोडण्याचा प्रश्नच नव्हता. गावाचा मोह मोठा, की पैशाचा मोह मोठा ? राष्ट्रीय बँकेत टेक्निकल ऑफिसरच्या हुद्द्यावर काम करायचं म्हणजे चांगलीच नोकरी म्हणायची! त्यामुळे निरुपायानं तो धारवाडला जायला तयार झाला होता.

कुठूनतरी अचानक समोर आलेला गिरीश म्हणाला, 'गाडी आली चंद्रू. चल, सामान दे.'

चंद्रू विचाराच्या तंद्रीतून भानावर आला. या गिरीशचा स्वभावच असा! क्षणभरही निवांत म्हणून राहणार नाही हा! सतत काही ना काही धावपळ चालूच असते याची!-

चंद्रू आपल्या जागेवर बसला. गाडी सुटताच त्यानं प्लॅटफॉर्मवरच्या गिरीशला हात हलवून निरोप दिला. गाडीनं हळूहळू प्लॅटफॉर्म सोडला आणि ती धावू लागली.

बघता-बघता गिरीशचा हलणारा हात नजरेआड झाला.

गाडीनं वेग घेताच चंद्रूनं आत नजर टाकली. शेजारपाजारचे प्रवासीही काही वेळ आपापलं सामान नीट लावण्यात आणि आपसात गप्पा मारण्यात गढून गेले.

'यंदा पाऊस काय करतोय कोण जाणे!'

'गेल्या वर्षी बरा झाला पाऊस! यम्मी केरि- म्हशींचं तळं पूर्ण भरून गेलं होतं.'

'त्याच्या मागच्या वर्षी- सांगतो मी- घटप्रभेचा धबधबा अस्सा भरून वाहत होता म्हणून सांगू! मस्त दिसत होता!'

चंद्रू ऐकत होता. मनातल्या मनात तो गडबडला होता. भोवतालची माणसं त्याच्या मातृभाषेतच- म्हणजे कन्नडमध्येच- बोलत होती. पण त्याला त्यातले कितीतरी शब्दांचे अर्थच समजत नव्हते! एखादी परक्या प्रांतातली भाषा ऐकावी तसं वाटून तो कावरा-बावरा झाला होता.

तपकिरी रंगाचा कोट आणि काळी टोपी घातलेले एक प्रौढ गृहस्थ तळहातावर तंबाखू अंगठ्यानं मळता-मळता शेजारी बसलेल्या पागोटेवाल्या गृहस्थांना बजावून सांगत होते, 'तू काहीही म्हण- पण मला तर हुक्केरी बाळप्पाची गाणीच आवडतात.'

यावर ते पागोटं आणि धोतरवाले गृहस्थ जोरात सांगत होते, 'असेल! पण मला मात्र बाले खाँ साहेबांची सतार फार आवडते.'

मुकाट्यानं बसलेल्या चंद्रूलाही बोलण्यात ओढत त्यांनी विचारलं, 'कुठल्या गावाला निघालाय?'

'धारवाडला.'

'असं होय! धारवाडला कुणाच्या घरी?'

अरेच्चा! हा काय प्रकार आहे? साऱ्या धारवाडमधल्या प्रत्येक घराची ओळख असल्यासारखं विचारताहेत हे!

'कुठल्याच घरी नाही.'

'मग? नोकरीसाठी निघालाय वाटतं!'

'होय.' चंद्रूनं निरुत्साहानं सांगितलं. पुढचं संभाषण टाळण्याचा हेतू त्यात स्पष्ट होता.

धारवाडमध्ये त्याचा दूरचा नातेवाईक कृष्णमूर्ती राहत होता. कृष्णमूर्ती, म्हणजे किटीच्या घरची माणसं मूळची बेंगळूरची असली तरी, गेली कितीतरी वर्षं धारवाडला राहत होती. किटीच्या वडिलांनी तर तिथं स्वत:चं घरच बांधलं होतं.

किटीलाही धारवाडमध्येच नोकरी लागली होती. तो आणि चंद्रू साधारण बरोबरीच्या वयाचेच होते. आता किटीची कन्नड भाषाही बेंगळूरी ढंग सोडून धारवाडी ढंगाची झाली होती.

चंद्रूला घेऊन जाण्यासाठी आपण स्टेशनवर येत असल्याचं किटीनं कळवलं

होतं. त्याच्या घरी जास्तीतजास्त आठवडाभर राहता येईल. वेगळी खोली किंवा घर बघण्यासाठी त्यानं किटीलाही सांगून ठेवलं होतं. किटीनं घर पाहून ठेवलंय की नाही, देव जाणे!

गाडी तुमकूरला थांबली. काळ्या टोपीवाल्या गृहस्थांनी चंद्रूला विचारलं, 'आमच्याबरोबर जेवताय काय ? चपात्या आहेत.'

चंद्रू चकित झाला. अपरिचित तरुणाला आपल्याबरोबर जेवायला बोलवण्याइतकं औदार्य किती माणसांत पाहायला मिळतं? नकळत त्याच्या आवाजात सौम्यपणा आला,

'नको-नको! थँक्स! मी जेवण करूनच घराबाहेर पडलो.'

सहप्रवाशांनी आपापले जेवणाचे डबे उघडले. चंद्रू बाहेरच्या मैदानावर नजर खिळवून उद्याचा विचार करण्यात गढून गेला.

सुरेख, सुमधुर स्वर! कुणीही मोहून जावं असे स्वर!

चकित झालेल्या चंद्रूच्या मनाला ग्रासून टाकणारे सारे विचार क्षणार्धात नाहीसे झाले आणि त्याचं मन त्या स्वरांवर एकाग्र झालं.

पार्टिशनच्या पलीकडून गाणं ऐकू येत होतं-

'वसंत बनी ती गाते कोकिळ
राजमुद्रेची तिला न आशा-'

कोकिळाकंठी कुणी गायिका पलीकडे अति-सुरेल स्वरात आत्ममग्न होऊन गात होती. कुठल्याही वाद्याची साथ नाही- साधं सरळ भावपूर्ण गाणं!

अगदी हलक्या आवाजात गाणं सुरू झालं. बघता-बघता डब्यातले इतर सारे आवाज थांबले. केवळ गाण्याचा आवाज चढत राहिला आणि काही क्षणातच त्यानं संपूर्ण डबा भारून टाकला. सारेच माना डोलावत तल्लीन होऊन गाणं ऐकत होते.

चंद्रू त्या गंधर्व-लोकातल्या गंधर्व-गायनात पूर्णपणे बुडून गेला होता. मागं राहिलेल्या बेंगळूरचं आणि पुढं येणाऱ्या धारवाडचं भानही काही क्षण त्याला राहिलं नाही.

गाणं संपलं. पाठोपाठ हसण्याचा किलकिलाट कानांवर आला तेव्हा चंद्रू भानावर आला. तो तरुणींचा आवाज ऐकताना त्याला आपण कित्तूर-एक्सप्रेसमध्ये असल्याची जाणीव झाली.

पाठोपाठ मागणी झाली, 'वन्स मोअर! वन्स मोअर, विनू.'

अच्छा ! या अभिनव लता मंगेशकरचं नाव 'विनू' आहे तर! पण विनू म्हणजे काय? वनिता? वंदना? त्या सुरेल स्वराच्या मालकिणीला पाहण्याची इच्छा चंद्रूच्या मनात प्रबल झाली.

पार्टिशनमागून धारवाडी कन्नड भाषेत तोच स्वर पुन्हा ऐकू आला, 'नको गं बाई!

पुरे आता माझं गाणं! साडेदहा वाजून गेले आहेत. लवकर झोपलं नाही तर धारवाडऐवजी पुढं लोंढ्याला उतरायची पाळी येईल!' त्या विनूनं आणखी गाणी म्हणायचा प्रस्ताव धुडकावून टाकला.

चंद्रूला त्या बोलण्यामुळे बरं वाटलं. म्हणजे ही विनू आणि तिच्या मैत्रिणीही धारवाडला उतरणार आहेत तर! चंद्रूचा उत्साह द्विगुणित झाला.

'विनू, तुलाच गान-गंधर्व पुरस्कार मिळायला हवा बघ! कालच्या स्पर्धेत तुझाच पहिला नंबर येणार याविषयी आमच्या मनात तरी तिळभरही शंका नव्हती!'

म्हणजे या सगळ्या बेंगळूरला कुठल्याशा गायनाच्या स्पर्धेसाठी आल्या होत्या तर! तिथं या विनूला पहिल्या क्रमांकाचं बक्षीस मिळालं तर त्यात काहीही आश्चर्य नाही- चंद्रूच्या अंतर्मनानं न पाहिलेल्या विनूच्या वतीनं निर्वाळा दिला.

'खरंच गं! काल तू 'तुंगा-तीर विहारी' गात होतीस तेव्हा जज्जांसह सगळेच कसे माना डोलावत होते!'

'ते सगळं ठीक आहे! पण आता गाणं बंद! उद्या दुपारी लेडीज-रूममध्ये हवं तर म्हणेन. समजलं?'

बहुधा मैत्रिणींना एवढं बजावत विनू उठून उभी राहिली असावी. काचेच्या बांगड्यांचे आवाज ऐकू आले. चंद्रूच्या ज्ञानात आणखी भर पडली- या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुली दिसताहेत.

'एक्सक्यूज मी! मिस्टर- उठता ना?' तोच आवाज. चंद्रूनं मान वर करून पाहिलं.

गोरापान वर्ण, मोठाले काळेभोर डोळे, सरळ टोकदार नाक, दाट काळेभोर केस- अपरिचित तरुणाबरोबर बोलत असल्यामुळे चेहऱ्यावर उमटलेले मिश्र भाव- एका हातात बेडशिट आणि उशी, दुसऱ्या हातात तिकीट.

'माझी सीट आहे ही.'

चंद्रूचं तिच्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. तो तिच्याकडेच भान हरपून पाहत राहिला होता. धारवाडी काठा-पदराची साधी सुती साडी आणि लाल काचेच्या बांगड्या घातलेल्या निराभरण सुंदर युवतीनं त्याची ही गत केली होती!

'हा माझा बर्थ आहे.' तिनं पुन्हा सांगितलं तेव्हा चंद्रू भानावर आला.

तिच्या बोलण्याचा अर्थ समजताच तो उत्तरला, 'नाही. हा माझा बर्थ आहे- जी अठ्ठावीस!'

'नाही- हा पाहा- जी अठ्ठावीस-' तिनं तिकीट दाखवत म्हटलं. त्याच कोकिळकंठी सुंदरीच्या तोंडून बाहेर पडलेले शब्द त्याला पुन्हा गुंगवून गेले.

सुरेल स्वराची धनीण सुंदरही असली पाहिजे, असं काही नसतं. पण विनूचं सौंदर्यही स्वरांइतकंच अनुपम होतं.

दोघांनाही एकच बर्थ दिल्याचं दोघांच्याही लक्षात आलं. ज्यानं ही चूक केली तो

क्लार्क आता बेंगळूरात आपल्या घरी पांघरूण ओढून गाढ झोपला असेल! पण आता काय करायचं?

चंद्रू उठला आणि टी. सी. ला शोधायला गेला. विनू जी अठ्ठावीस बर्थवर मट्‌कन बसली.

चंद्रूबरोबर आलेल्या टी. सी.नं स्थितप्रज्ञ वृत्तीनं दोघांच्याही तिकिटांवर नजर टाकली आणि ही एक नेहमीचीच सर्वसामान्य घटना असल्याप्रमाणे म्हणाला, 'विनिता - एफ - एकोणीस- जी अठ्ठावीस- आणि चंद्रशेखर - एम - चोवीस- जी अठ्ठावीस- दोघांनाही एकच नंबर दिलाय खरा! तूर्त काहीतरी ॲडजेस्ट करून घ्या. पुढच्या स्टेशनवर बघूया काय करता येईल ते!'

अशा प्रकारे काहीही निश्चित न सांगता, आडव्या भिंतीवर दिवा ठेवल्यागत बोलून तो निघून गेला. चंद्रूपुढे प्रश्न उभा राहिला- या देखण्या विनूबरोबर कसं 'ॲडजेस्ट' करायचं?

निरुपायानं चंद्रू म्हणाला, 'तुम्ही बर्थवर झोपा. आत्ता तरी मी होल्डॉल खोलून खालीच झोपतो.'

विनिताही संकोचून म्हणाली, 'माझ्यामुळे उगाच तुम्हाला त्रास.'

'छे :! यात तुमचा काय दोष?'

पुढं काही न बोलता विनिता पलीकडे वळून झोपली. चंद्रूही होल्डॉल खोलून आडवा झाला. न राहवून त्याची तिच्याकडे नजर गेली. विनिताची जाड आणि लांबसडक नागवेणीही विसावलेली त्याला दिसली.

डोळे मिटले तरी गाण्याचे ते स्वर चंद्रूच्या कानात रुणझुणत होते. गाडी मंद लयीत हेलकावत होती. त्याच तंद्रीत चंद्रूला गाढ झोप लागली.

घाईघाईनं एका हातात सूटकेस आणि दुसऱ्या हातात कसाबसा गुंडाळलेला होल्डॉल घेऊन लुंगी नेसून स्टेशनवर उतरलेल्या चंद्रूला कुणाच्यातरी हास्याचा गडगडाट ऐकू आला.

हौशी आणि छान-छोकीनं राहणाऱ्या चंद्रूच्या दृष्टीनं हे अगदीच अपमानास्पद होतं.

स्टेशनवर येणाऱ्या किटीला कसं टेचात सामोरं जायचं याविषयी त्यानं बरंच काही ठरवलं होतं. इस्त्रीचे रुबाबदार कपडे- त्यावर सेंटचा घमघमाट- ऑफिसरच्याच थाटात स्टेशनवर उतरायचा घाट चंद्रूनं घातला होता. पण प्रत्यक्षात घडलं ते वेगळंच!

रेल्वे अलिप्तपणे पुढच्या प्रवासासाठी धावू लागली. चंद्रूनं धारवाड स्टेशनावरून नजर फिरवली.

छोटंसं स्टेशन. बेंगळूरमधल्या मल्लेश्वरम स्टेशनसारखं. स्वच्छ स्टेशन. मोजकीच माणसं इथं-तिथं वावरत होती. रेल्वे निघून गेल्यावर स्टेशन आणखी शांत वाटू लागलं.

चंद्रूनं अपेक्षेनं भोवताली पाहिलं, पण ती कोकिळकंठी रूपसुंदरी कुठंही दिसली नाही. ती आणि तिच्या मैत्रिणी केव्हा निघून गेल्या होत्या कोण जाणे!

हातातलं सामान ठेवून लुंगी सावरत चंद्रूनं पाहिलं- समोरच किटी उभा होता.

त्यानंच खदाखदा हसत विचारलं, 'हे काय रे चंद्रू? तू रेल्वेनं आलास की पायी चालत?' पाठोपाठ त्यानं जुन्या सलगीनं पाठीवर थाप मारली. त्या सलगीच्या थापेसरशी चंद्रूची पाठ वाकलीच!

'सॉरी किटी! काय सांगू तुला- भयंकर झोप आली होती. टी. सी. नं 'धारवाड आलं तुमचं! उठा -' म्हणून जागं केलं तेव्हाच जागा झालो!'

'टी. सी. नं उठवलं नसतं तर तू बेळगावला किंवा मिरजेलाच गेला असतास सरळ!'- म्हणत किटीनं चंद्रूच्या सामानाला हात घातला.

'पाच मिनिटं थांब, किटी! मी अशा अवतारात येणार नाही. आता कपडे बदलून येतो-' म्हणत चंद्रू वेटिंग रूमच्या दिशेनं गेला.

तो कपडे बदलून आला, तोवर सिटीबस निघून गेली होती. रिक्षावाल्याबरोबर किटी वाटाघाटी करत होता.

लुकड्या घोड्याचा टांगा बघून चंद्रू म्हणाला, 'किटी, तुमच्या गावातल्या रथातून जायचं काय?'

दोघंही टांग्यात चढले. आळस झटकून नुकतंच जागं झालेलं धारवाड शहर मंद हसत होतं. टांग्यातून जाताना चंद्रू आश्चर्यानं त्याचं निरीक्षण करत होता.

उंच चढाच्या रस्त्यावर घोडं धापा टाकू लागलं. हे चंद्रूला पाहावेना. तो म्हणाला, 'बाबा रे! मला स्वर्गाची काही कल्पना नाही! पण या घोड्याच्या नरक-यातना मला बघवत नाहीत.'

तो टांग्यातून खाली उतरला. पुन्हा उतार लागताच टांग्यात चढला. किटी मात्र याकडे नेहमीचीच गोष्ट असल्याप्रमाणे हसत बघत होता.

टांग्याचा आवाज ऐकून शांतम्मा बाहेर आल्या.

'ये चंद्रू, ये! बरा आहेस ना? कसा झाला प्रवास?'

'छान झाला.' चंद्रू म्हणाला. सुरेल स्वरांची सोबत असल्यावर प्रवास उत्तम होणारच ना!

'चंद्रू, आज मी रजाच काढलीय! तुला धारवाड गाव दाखवतो.' इडली खात किटीनं सांगितलं.

'ते राहू दे. आधी आपण घर बघूया.'

‘अरे, असा काय करतोयस? इथंच आमच्या घरी का राहात नाहीस?’

‘हा काही एक-दोन दिवसांचा प्रश्न नाही, किटी! इथं नोकरीसाठी मी जितके दिवस थांबेन, तितके दिवस मला खोली हवीच ना!’

‘का रे? इथं येऊन कामावर हजर होण्याआधीच इथून जाण्याचा सूर काढतोयस!’

‘तसं नव्हे रे! नाही म्हटलं तरी हे काही आपलं गाव- आपला प्रदेश नाही. इथं आपले कुणी मित्र नाहीत की कुणी नातेवाईक नाहीत. पहिलीच नोकरी सोडायची नाही म्हणून मी एवढ्या लांब आलोय. तिथंही दोन इंटरव्ह्यू देऊन आलोय. बेंगळूरमध्येच एखादी नोकरी मिळाली, पगार थोडा कमी असला तरी चालेल- पण मी लगोलग निघून जाईन हे मात्र नक्की!’

‘बरं, तुझा आग्रहच असेल तर बघू या. चार जणांना सांगून ठेवू या. इथं लवकर घरं मिळतात. तुझ्या छोट्या ब्रह्मचाऱ्याच्या संसाराला एखादी छोटी खोलीही पुरेशी आहे.’ किटी म्हणाला.

एका दिवसात सारं धारवाड पाहून झालं. धारवाड विद्यापीठाचा परिसर, सोमेश्वराचं देऊळ आणि कित्तूर चन्नम्मा पार्कही पाहून संपलं.

‘चंद्रू, मला तर धारवाडची फारच सवय झाली आहे. इथंच शिक्षण झालंय. गावभर भरपूर मित्र आहेत. काही कारणानं परगावी जावं लागलंच तर माझा श्वास कोंडल्यासारखा होतो.’

‘खरंच! प्रत्येकाला आपापल्या गावाविषयी असंच वाटतं!’ चंद्रू उत्तरला.

पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे सर्वत्र हिरव्या रंगाचा महोत्सव चालला होता. शेकडो फुलांचे ढीग मनाला भुरळ घालत होते. धारवाडची तांबडी माती चपलांशी सलगी वाढवू पाहत होती. चाफ्याच्या सुगंधाबरोबर शेवंतीचं संमेलन चाललं होतं. धारवाडचं वातावरण कितीही अरसिक व्यक्ती असली तरी तिला रसिक करून टाकत होतं. धारवाडचा श्रावण मन मोहून टाकत होता.

किटीचा हा ‘स्वर्ग’ कितीही सुंदर असला तरी चंद्रूचा बेंगळूरवरचा मोह कणभरही कमी व्हायला तयार नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे - बेंगळूर म्हणजे नखरेल आकर्षक तरुणी तर धारवाड मुग्ध बालिश तरुणी!-

बेंगळूरहून येऊन तीन दिवस झाले होते. सकाळी शांतम्मा किटीला म्हणाल्या, ‘तू चंद्रूसाठी खोली पाहिजे म्हणून सांगितलं होतंस का? माळमड्डीवरच्या भीमण्णा देसायांची जागा भाड्यानं द्यायची आहे म्हणे. तुझा तो शानबाग आला होता सांगायला.’

लगोलग चंद्रू आणि किटी चढ-उतारावर वसलेल्या माळमड्डीकडे निघाले.

तारेचं कंपाउंड असलेल्या विस्तीर्ण बागेनं वेढलेलं जुनं घर. लाल कौलांनी शाकारलेलं. भोवतालची बाग भरपूर फुलझाडं-फळझाडांनी भरलेली. कितीतरी

प्रकारची झाडं! नीट रांगेत लावलेली पेरूची, आंब्याची आणि फणसाची झाडं, केळ्याच्या झाडांचं बन, फुलांची मुबलक झुडुपं, चाफा, जुई- मोगरा, पारिजात- अगदी कौतुक वाटावं असं बकुळीचंही झाड! विविध रंगांची आणि आकारांची डेलियाची फुलं.

चंद्रूला वाटलं, किटी म्हणत होता- घराभोवती बाग आहे- इथं तर बागेमध्येच घर दिसतंय! त्यानं बेंगळूरमध्ये असं झाडांनी घेरलेलं घर पाहिलंच नव्हतं. तीस बाय चाळीस फुटांच्या साईटवर तीनमजली घरं बांधलेल्या 'किष्किंधा नगरी'चीच त्याला सवय होती. मातीच्या कुंड्यांमधून रोपं लावून तयार केलेला बगिचाच त्यानं पाहिला होता. क्षयरोगग्रस्त मानव समूहानं व्यापलेल्या बेंगळूरमध्ये तो इतके दिवस राहिला होता. आता त्याच्यासमोर आरोग्यपूर्ण धारवाड उभं होतं. त्याला मनोमन हा फरक जाणवला.

घर दुमजली होतं. बहुतेक वरचा मजला भाड्यानं द्यायचा विचार आहे की काय कोण जाणे! चंद्रू मनोमन विचार करू लागला- 'जागा केवढी असेल? आपल्याला परवडेल की नाही?'

किटीनं घराच्या दारावर थाप मारली.

दरवाजा उघडला गेला आणि चंद्रू अवाक् होऊन उभा राहिला.

घराचा दरवाजा रेल्वे-प्रवासात भेटलेल्या गानकोकिळा सुंदरी विनितानं उघडला होता.

विनितेच्या चेहऱ्यावरही आश्चर्याचे भाव उमटले.

त्या दोघांच्याही प्रतिक्रियांकडे किटीचं लक्ष नव्हतं. त्यानं विचारलं, 'आहेत काय भीमण्णा?'

विनितेनं स्वत:ला सावरत म्हटलं, 'हो - आहेत. या. येतील एवढ्यात. बसा तुम्ही.' आणि हरिणीच्या वेगानं ती आत दिसेनाशी झाली.

जुनाट सोफा आणि जुन्या खुर्च्या पाहाताच घराच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येत होती.

चंद्रूनं मनोमन ठरवलं, काही झालं तरी हीच खोली आपण भाड्यानं घ्यायची. त्यानं अकारणच आणखीही एक ठरवलं- गाडीतल्या विनितेच्या भेटीविषयी किटीला काहीच सांगायला नको.

भीमण्णांनी सांगितलेल्या सगळ्या अटी मान्य करून खोलीचं पक्कं करून तिथून निघताना चंद्रू उल्हसित झाला होता. किटीची मात्र भुणभूण चालली होती, 'काही म्हण ! मला तरी भाडं जास्त वाटतंय! तू उगाच दडपणाखाली हो म्हणू नकोस. आणखी दोन दिवसांमध्ये याहून कमी भाड्यामध्ये याहून मोठं आणि नवं घर मिळू शकेल. आपण आणखी प्रयत्न करू या.'

पण चंद्रूनं मात्र नकारार्थी मान हलवली.

त्याची फार काही बोलायची इच्छा नव्हती. कारण विनितेनं त्याचं मन व्यापून टाकलं होतं. मनोमन तो उल्हसित झाला होता.

रोजच्यासारखाच सूर्योदय झाला. हातात पाण्याची बादली आणि झाडू घेऊन विनितानं दार उघडलं. एखादं दुर्मिळ दृश्य पाहावं तशी ती कौतुकानं सूर्योदयाचं निरीक्षण करू लागली. सोनेरी आकाश, पक्ष्यांचा किलबिलाट, विविध फुलांच्या सुगंधाच्या मिश्रणातून हवेत पसरलेला विलक्षण सुगंध! त्यात पारिजातकाच्या सड्याची भर पडलेली! विनिताचं मन उत्साहानं उभारलं गेलं.

हे नेहमीचंच होतं. विनिताचा स्वभावच तसा होता. काहीही सुंदरतेनं भरलेलं समोर आलं की तिचं मन आनंदानं नाचायला सुरुवात करत होतं. त्याचंच प्रतिबिंब चेहऱ्यावर पडल्यामुळे तिचा चेहरा सतत आनंदी दिसत असे.

आज तरी वेगळं असं काय घडलं होतं? नेहमीसारखाच सूर्योदय ना? पण विनितेच्या दृष्टीनं इतकी साधी गोष्ट नव्हती. हा अनुपम सूर्योदय केवळ आपल्यासाठीच झाला आहे- या भावनेनं ती आनंदानं मोहरून गेली होती.

साऱ्या बागेचा केर लोटत ती बकुळीच्या झाडापाशी आली. मंद पिवळ्या चंद्राप्रमाणे बकुळी आपलं अस्तित्व दर्शवत होती. हातातला झाडू बाजूला ठेवून विनिता हलकेच एकेक फूल गोळा करता-करता त्या गंधानं पुलकित होऊन गेली.

माडीवरच्या खिडकीतून चंद्रू विनिताचं फुलाबरोबर रमणं तिच्या न कळत पाहात होता. तिचं मात्र आणखी कुठंही लक्ष नव्हतं ती स्वत:च्या भावना-प्रपंचात मग्न होऊन गेली होती.

दूधवाला येताच विनिता आपल्या भाव-विश्वातून बाहेर आली. फुलं घेऊनच ती दुधाचं भांडं आणायला आत गेली.

भीमण्णा देसाई भरपूर बोलके गृहस्थ होते. गप्पांच्या आखाड्यात एकदा उतरले की कुणालाच ऐकत नसत. पण चंद्रूला त्यांच्या सरळ स्वभावाचाही अनुभव येत होता. चंद्रू राहायला आला त्याच दिवशी त्यांनी सांगितलं,

'अजिबात संकोच वाटू देऊ नका! काही पाहिजे असेल तर खुशाल मागून घ्यायचं. हेही तुमचंच घर म्हणून समजा, समजलं की नाही?'

या घरात कोण-कोण राहतंय, त्यांचं परस्परांशी नातं काय याचा चंद्रूला काहीच खुलासा होत नव्हता. एक मात्र खरं- विनिता मात्र क्षणभराचीही उसंत न घेणारं सतत फिरणारं यंत्र झाली होती.

सकाळी दहा वाजता ऑफिसला जाऊन चंद्रू संध्याकाळी सहा वाजताच घरी परतत होता.

जाग आल्यापासून ऑफिसला जायला निघेपर्यंत सकाळच्या वेळी अनेकदा विनिताचं नाव त्याच्या कानांवर येत होतं.

'विनू, ताटं वाढलीस काय?'

'विनू, गिरणीला जाऊन आलीस ना?'

'विनू, धुतलेले कपडे कुठं ठेवलेस?'

'हे काय विनू! अजून फुलांचे गजरे केले नाहीस?'

'विनू, अगं, आमटीला खडाभर मीठ कमी पडलंय बघ!'

❐






*** ज्ञानेश्वर महाराज यांचे निधन**

जगद्‌गुरू श्री. संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज व देहूकर फडाचे प्रमुख ज्ञानेश्वर तथा माऊली महाराज देहूकर (वय ७८) यांचे २३ मार्च रोजी सोलापूर येथे निधन झाले. माऊली महाराज हे गेल्या काही दिवसांपासून दम्याच्या त्रासाने आजारी होते. देहूकर यांच्या मागे बंधू बापूसाहेब महाराज देहूकर, दोन मुलगे, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

*** हौसाबाई पाटील**

'पानिपत'कार विश्वास पाटील यांच्या मातोश्री श्रीमती हौसाबाई महिपती पाटील (वय ७५) यांचे २८ मार्च रोजी निधन झाले.

बिळाशी (ता. शिराळा) येथील रोकडे-पाटील कुटुंबात १९३६ मध्ये हौसाबाई पाटील यांचा जन्म झाला. नेर्ले येथील स्वातंत्र्यसेनानी आणि शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते (कै.) महिपती पाटील यांच्याशी त्यांचा विवाह झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपल्या सर्व मुलांना उच्च शिक्षण दिले. पतीच्या समाजकार्यातही त्यांनी मोलाची साथ दिली होती. नेर्ले येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नेर्ले ग्रामस्थांनी सर्व व्यवहार बंद ठेवून त्यांना आदरांजली वाहिली.

*** संगीतकार रवी**

चौदहवी का चाँद, नीलकमल, वक्त, हमराज, गुमराह अशा एकापेक्षा एक गाजलेल्या सिनेमांना तेवढ्याच उंचीची गाणी देणारे संगीतकार रवी यांचे मुंबईत निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. रवीशंकर शर्मा हे त्यांचे मूळ नाव; पण हिंदी चित्रपट सृष्टीतल्या रिवाजाप्रमाणे त्यांनी त्या काळी रवी हे छोटे आणि सुटसुटीत

नाव धारण केले. मुंबईत आल्यानंतर रहायला घर नसल्यामुळे ते मालाड रेल्वे स्टेशनवर झोपत. १९५२ मध्ये संगीतकार, गायक हेमंतकुमार यांनी त्यांच्यातील गुणवत्ता हेरली आणि त्यांना आनंदमठ या सिनेमातील 'वंदे मातरम्' गाण्यासाठी गायक म्हणून संधी दिली.

*** कवयित्री एड्रीन रीच यांचे अमेरिकेत निधन**

स्त्रीवादी आणि समलैंगिक हक्कांसाठी झगडणाऱ्या प्रख्यात कवयित्री एड्रीन रीच (वय ८२) यांचे २६ मार्च रोजी निधन झाले. कॅलिफोर्नियातील सांताक्रुझ येथे १९८० पासून त्या राहात होत्या, रीच यांचे डझनाहून अधिक काव्यसंग्रह आणि वास्तववादी लिखाणाचे पाच संग्रह प्रसिद्ध झाले. १९७४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या डायव्हिंग इन रेक या काव्यसंग्रहासाठी त्यांना अमेरिकेतील नॅशनल बुक पुरस्कार मिळाला. याशिवायही अनेक पुरस्कारांच्या त्या मानकरी होत्या.

*** बेबीताई कांबळे**

फलटण येथील दलित चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या बेबीताई कांबळे यांचे पुणे येथील खाजगी हॉस्पिटल मध्ये वृद्धापकाळाने निधन झाले. त्या८२ वर्षांच्या होत्या. बेबीताई कांबळे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील 'भीमगीते' हा कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांच्या 'जिणं आमच्या' या पुस्तकाचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. सामाजिक चळवळीताल योगदानामुळे सरकारने त्यांना 'दलितमित्र' पुरस्काराने गौरवले होते.

भटक्या जातीजमातींच्या मुलांसाठी फलटण तालुक्यातील निंभोरे येथे त्या गेली २०-२१ वर्षे आश्रमशाळा चालवत होत्या. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

❐


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरुर आणावे
ही नम्र विनंती.




Respected Sir,

I just read ur book "Steve Jobs-ek zapatlela tantradny". I like it so much....khup sundar book ahe, jobs gele tevapasun mail karaychi hoti pan rahile tasech, tumhi tumchya ya book cha mail kela teva me te vikat anale lagech..

apple he naav mi 2006 madhe MSCIT kartana first time vachle hote. tyanantar ipad, ipod, tablet pcs, iphone hi nave me eaikun ahe , n chitramadhe pahilit fakt, ajun use nahi keleli kadhi, pan hi upkarne kashi ahet he mahit aahe book vachunch..jobs yani ya field madhe ghetleli bharari khupch chan ahe...kamit kami pagemadhe tumhi khup mahiti yogya ritine mandali ahe tumhi, book vacheparynt jobs baddal mala jast kahi mahit navate, evdhch mahit hote ki IT madhil te ek navajlele vyaktimattv ahe, pan ya book mule tyncha purn parichay mala zala.

Thanks sir for writing for such Book .n ur upcoming book on Fidel Castro is also nice...Thanks...

Priyanka Mande<br>
Adhalgaon( Ahmednagar)

आगामी




# कार्गोची कणसं

**नरेंद्र माहुरतळे**

गाव, गावकीतील अनेक प्रश्न, विकासाच्या नावानं पुन्हा भकास होताना दिसतात. या भकासपणात होरपळ होते ती गावाखेड्यात राहणाऱ्या सामान्यांचीच! आर्थिक विषमतेमुळे हे भकासपण पुन्हा डोळ्यात सलू लागतं. 'इमला व पाया' संस्कृतीत गुंतून पडलेलं हे भीषण वास्तव गावाशी घट्ट जुळलेल्या नाळेपासून वेगळं होण्याचा प्रयत्नही जेव्हा करू देत नाही, तेव्हा पुन्हा भेसूर व्हायला लागतं.

**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

## मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

# भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी

## मंत्रावळी सुपारी

(मागील अंकावरून)

'आम्हाला कळला. आम्ही सगळ्यांनी ऐकला. हो ना हो किमयादेवी?'

'होय कुलगुरू.' साखरेत घोळल्यासारखा मधाळ आवाज होता तो. 'सगळीच्या सगळी बारा मंत्राक्षरे मी ऐकली. का हो बुटीमुनी?'

'होय तर. आमचे बुवा कानाचे पडदे फाटायचे बाकी राहिले.' ओम थोडा खजिल झाला. तो बेंबीच्या देठापासून ओरडला होता.

'तुला शाळेच्या बसमध्ये घेत नाही. कोण घेत नाही?' कुलगुरूंनी त्याला विचारले.

'तो बसवाहक. पण माझ्या मित्रांना आणि आर्या पशुमित्रा, त्यांना सुद्धा माझा परवलीचा ऐकू येत नाही.' ओम आपला हेका सोडायला तयार नव्हता.

'अच्छा. पशुमित्र आहेस का तू?' त्यांची शोधक नजर ओमच्या कपड्यांवरून फिरली. त्यांच्या नजरेने त्याच्या डाव्या बाहीवरचा कारंजा उडवणारा देवमासा अचूक टिपला. हे एक आक्रितच होतं. ओमने गुरुपौर्णिमेच्या दिवशी तो निळा गणवेष इतर कपड्यांमध्ये टाकला आणि त्याच्या सगळ्या कपड्यांवर देवमाश्याचा छाप उमटला. आईला वाटले होते, स्टीकर छापायचे हे ओमचे काही नवे खूळ आहे म्हणून.

'देवमासा.' दाढीवरून हात फिरवत हसत कुलगुरू म्हणाले.

'ती रानडुक्करीण आहे.' ओमने तेजाकडे बोट दाखवत सांगितले. आपला नामोल्लेख झालेला पाहताच तेजाने तोंड लपवले. या शिक्षक लोकांच्या कचाट्यात तिला सापडायचे नव्हते.

'बरे तर मुला, आता तुझी सगळी हकिकत मला सांग. तुला दीक्षा कोणी दिली? साबरी जगात तू कसा आलास? अगदी पहिल्यापासून सांग.' कुलगुरूंनी त्याच्या पाठीवर थोपटत विचारले.

ओम सांगू लागला. साबरी शाळेच्या बसविषयी त्याला वाटणारे कुतूहल. तेजाची भेट. मग ती दु:स्वप्नं सरलकाका, रुद्राक्ष माळ,

चांगदुष्टाची रिक्षा आणि मंजुघोष. आकाशमोती आणि बदल्यात मिळालेली अभिजीत जन्मनक्षत्राची माहिती, मग बारा कुंडे, बारा पिंपळाचा पार आणि बारा फेऱ्या. त्या खुणांचे विस्मरण सरलकाकाने वाजवलेली एकतारी. कळलेले उच्चार पण विसरलेला अक्षरक्रम, मग अमुदित गुरुपौर्णिमेला पशुमित्रांची झालेली भेट, शाळेच्या बसवाहकाने नेहमी त्याला ढकलून दिल्याची कागाळी, पंडी आणि त्याने क्रमवारी शोधण्यासाठी केलेले प्रयत्न. वगैरे. पुत्रंजीव देवता, कुपी, जाड्या, सर्वतोभद्र यक्ष, आज केलेली विद्याधरांकडची खरेदी वगैरे सर्व तपशील ओमने स्वतःच्या नकळत एका अंतःप्रेरणेने गाळले. कुपीचा उल्लेख तेजा, सरलकाका, मंजुघोष साऱ्यांना फार अडचणीत आणेल याची खात्री होती. निवेदन संपले.

ओम खूप उलट-सुलट, मागचे-पुढचे प्रसंग एकात एक मिसळून सांगत होता. तरी त्याला कोणी व्यत्यय आणला नाही. साऱ्यांचे चेहरे ऐकता, ऐकता गंभीर झाले होते. खरे तर सरलकाका व मंजुघोषाचा उल्लेख होताच त्यांच्या चेहऱ्याच्या रेषा कठोर होऊन गेलेल्या ओमने बघितल्या होत्या. ते दोघे शाळेतून हद्दपार आहेत. ओमला आठवण झाली. पण उशिराने.

बसमध्ये आता अतिशय शांतता पसरली. सारे मोठे विचारात हरवून गेले होते. एकाएकी कुलगुरू हलले. शांतभैरवकडे वळून म्हणाले, 'अरे शांत, सुशांतला म्हणावे कोकण नगरच्या नाक्यावर गाडी ने. मुलांना घराकडे पोचते केले पाहिजे. त्यांना फार उशीर झाला.'

'होय कुलगुरू,' म्हणत लगबगीने शांतभैरव गाडीचालकाच्या कक्षाकडे गेला.

आता लगेच आपले ठिकाण येईल. ओमला अंदाज आला.

'पण माझा परवलीचा अक्षरक्रम?' तो हेका सोडीना.

कुलगुरूंनी त्याला आश्वस्त करण्यासाठी पुन्हा कवेत घेतले, 'मुला. त्यासाठी क्रम महत्त्वाचा नसतो. मनातला भाव महत्त्वाचा असतो. सुरवातीपासून आपला परवलीचा योग्य नाही अशी शंका तुझ्या मनात होती. त्यामुळे तो कामी येत नव्हता. आज मात्र पाठलाग चुकवण्यासाठी जिवाच्या आकांताने तू ओरडलास तेव्हा तुझ्या मनात शंका उद्‌भवायला वेळ उरला नाही आणि मंत्राने काम केले. कोणताही मंत्र म्हणताना,

कायम लक्षात ठेव. त्याविषयी जर तुझ्या मनात किंचितही शंका असेल तर तो काम करणार नाही. मंत्राचे सामर्थ्य त्याच्या शब्दात आणि उच्चारांत नाही, ते उच्चारणाऱ्या मनाच्या श्रद्धेत असते.'

ओमने समजले अशी मान डोलावली. तोपर्यंत गचका खाऊन बस थांबली. ओम, तेजाचे ठिकाण आले होते. तेजा गुमान उठली आणि उतरण्यापूर्वी कुलगुरूंपासून सुरुवात करून झाडून सर्वांच्या पाया पडली. त्या सर्वांनी तिला वेगवेगळे आशीर्वाद दिले. तिचे बघून ओमही सर्वांच्या पाया पडला. त्याला मात्र दीर्घायू होण्याचा एकच आशिर्वाद प्रत्येक मुखातून मिळाला.

ओम, तेजा बसमधून खाली उतरले. शांतभैरवाने दारावर थाप मारली. बस निघून गेली.

पाऊस थांबला होता. दोघे एकटे उरले.

'ओम. कुपी तर गेली रे.' तेजा चुटपुटली

'जाड्याकडे तर आता नाही ना?' ओमने काळ्या ढगाला असलेली रुपेरी किनार तिला दाखविली, 'अलख.'

'अलख.'

दोघे दोन दिशांना आपापल्या घराकडे निघाले.

ओम विचारात दंग होता. आजचा दिवस फार चांगला गेला होता. जाड्यावर मात केली होती. मंत्रावळीच्या रूपात त्याने आयुष्यातली पहिली जादू केली होती. त्याला त्याचा परवलीचा मिळाला होता. उद्यापासून त्याला तेजाबरोबर साबरी वर्गांना जाता येणार होते. जाड्या आणि दारुड्याची त्याला काही भीती वाटत नव्हती. त्याच्या खिशात अजून अंकदाण्याची अख्खी पुडी होती. तिच्यात मोजून पुरे सत्तावीस दाणे होते. येऊ देत कोण येतात ते! बच्चू तुमचा पार फुटबॉल करून टाकतो. ओमला गोलगरगरीत फुगलेल्या जाड्याला लाथा मारून, मारून हवेत लटकवतोय असे दृश्य दिसू लागले. पण गाडीतून उतरताना कुलगुरूंनी त्याला तसे का सांगावे?

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला

९८६०४९८८६२

इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

# चित्रमय रंगतदार कथा

| | | |
|---|---|---|
| चतुर बोकोबा आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | आ.सं. |
| नशीबवान शेखर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा | चारुता पुराणिक | ३० |
| हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या | चारुता पुराणिक | ३० |
| *(फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००८)* | | |
| *('राजहंस प्रकाशन' पुरस्कार)* | | |
| *(अ.भा.म.प्रकाशक संघ-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७)* | | |
| निद्राराणी आणि इतर कथा | विजया देशपांडे | ३० |
| जादूचं खीरपात्र आणि इतर कथा | अरुंधती पंडित | ३० |
| टिंबक टू आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| गम्मत गोष्टी | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| धमाल गोष्टी | मंजूषा आमडेकर | ५० |
| मजेदार लोककथा | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| आदर्श लोककथा | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| राजाचं गुपित आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| ढुम ढुम ढुमाक ढुम आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | आ. सं. |
| चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ५० |
| छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | ५० |
| छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी | अर्चना ओक | आ. सं. |
| गंपू चिंपू आणि इतर कथा | उमा खरे | आ. सं. |
| मैत्रीचे मोल आणि इतर कथा | उमा खरे | आ. सं. |
| सिंड्रेला आणि इतर कथा | उमा खरे | आ. सं. |
| घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी | उमा खरे | ३० |
| गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी | उमा खरे | आ. सं. |
| बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी | उज्ज्वला केळकर | आ. सं. |
| गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी | उज्ज्वला केळकर | ३० |

| | | |
|---|---|---|
| बंटू बसला ढगात आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं बटण आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं रबर आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| जादूचं तळं आणि इतर गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| गोष्टी पानोपानी | ईशान पुणेकर | ३० |
| गोष्टी मनोमनी | ईशान पुणेकर | ३० |
| गोष्टी कानोकानी | ईशान पुणेकर | ३० |
| जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |
| चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी | संस्मिता गुप्ते | ५० |

## आजीने सांगितलेल्या चातुर्यकथा

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | ५० |
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | ५० |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | ५० |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | ५० |
| पंचतंत्रातील सुरस गोष्टी | निर्मला मोने | ५० |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | ३० |
| शेखचिल्लीचे किस्से | निर्मला सारडा | आ. सं. |
| मन्नो | मंजूषा आमडेकर | आ. सं. |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ४० |
| रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |

| | | |
|---|---|---|
| ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| फ्रँकलिन मालिका मूळ लेखिका : पोलेत बूर्ज्वा | | |
| फ्रँकलिन आणि दंतपरी | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन थाप मारतो | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि अंधारगुडुप | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनची दादागिरी | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन हरवतो | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा पसारा | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी | मंजूषा आमडेकर | ५० |
| चल, आटप लवकर, फ्रँकलिन | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन शाळेत जातो | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचं पांघरूण | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि सण | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा वाईट दिवस | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन सायकल चालवतो | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिनचा नवा मित्र | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि वादळी पाऊस | मंजूषा आमडेकर | ५० |
| फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल | मंजूषा आमडेकर | ५० |
| शाळेच्या नाटकात फ्रँकलिन | मंजूषा आमडेकर | ५० |
| **तेनालीराम मालिका** | | |
| बुद्धिमान तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| जगावेगळा तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| चतुर तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| न्यायप्रिय तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| समयसूचक तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| लाडका तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| प्रसंगावधानी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| निर्भय तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| राज्याचे भूषण तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| हजरजबाबी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| हुशार तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |

| | | |
|---|---|---|
| विनोदवीर तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| मजेदार तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |
| परोपकारी तेनालीराम | मंजूषा आमडेकर | ३० |

## बिरबल मालिका

| | | |
|---|---|---|
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| बुद्धिमान बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| चतुर बिरबल | निर्मला सारडा | ३० |

## विक्रम वेताळ मालिका

| | | |
|---|---|---|
| पुतळे जिवंत झाले आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| दैवी सिंहासन आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| जादूचा रत्नहार आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| राजपुत्राचा निर्णय आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| टेकडीवरचं देऊळ आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| गुप्त खजिना आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| जोतिषाचं नशीब आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| जादूची साखळी आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| समुद्रातील अप्सरा आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |
| खरं बक्षीस आणि इतर कथा | वैशाली कार्लेकर | ५० |

## ससोबा-हसोबा मालिका

| | | |
|---|---|---|
| शेपटीवालं झाड आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| ससुल्या आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| शूर ससोबा आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| चला चहा पिऊया आणि इतर कथा | राजीव तांबे | ५० |
| छत्रीची जादू आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |
| *(महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००८-०९)* | | |
| झॅकपॅक शोध आणि इतर कथा | राजीव तांबे | ३० |

## गुरुशिष्य कथा

| | | |
|---|---|---|
| कसोटी आणि इतर कथा | शरद दळवी | ३० |
| सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा | शरद दळवी | ३० |

## जंगल कथा

| | | |
|---|---|---|
| इमानी मित्र आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| पंचरंगी खार आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |

## जंगल जंमत मालिका

| | | |
|---|---|---|
| जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |
| फट्फजिती आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |
| गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| सिंहाचं उड्डाण आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| सोनेरी चोच आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| पिंटू पेलिकन आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| तल्लख मोती आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| लालतोंडी चोर आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| उंटाची मान आणि जंमत गोष्टी | निर्मला मोने | ३० |
| बुम बुम बैल आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ५० |
| तीन  छोटे मासे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ५० |

## छोटुश्या बब्बडच्या गमतीदार गोष्टी

| | | |
|---|---|---|
| चंपी मालीश आणि था..था..था! | राजीव तांबे | ३० |
| दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी | राजीव तांबे | ३० |
| गुळाची ढेप आणि सरबत | राजीव तांबे | ३० |
| सू सुटका आणि रंगीत डोंगर | राजीव तांबे | ३० |

## बोधकथा

| | | |
|---|---|---|
| महाकवि कालिदास आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |
| मोह आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |
| न्याय आणि बोधकथा | शरद दळवी | ३० |

## चातुर्यकथा

| | | |
|---|---|---|
| बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा | शरद दळवी | ३० |
| प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा | शरद दळवी | ३० |

## विज्ञान  नवलाई

| | | |
|---|---|---|
| अंतराळ | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| आपले पूर्वज | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| भूगोल | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| खगोल | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| पशू-पक्षी | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| प्राणिजगत | डॉ. बाळ फोंडके | ३० |

## कुमार साहित्य

| | | |
|---|---|---|
| एकमेका साह्य करू आणि इतर गोष्टी | शरद दळवी | आ. सं. |
| आजीचं घर आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| आजीचा धडा आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |

## सीक्रेट सेव्हन मालिका

मूळ लेखिका : एनिड ब्लायटन

| | | |
|---|---|---|
| द सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| शाब्बास, सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| आगे बढो, सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची सरशी | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन झिंदाबाद | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन आणि रहस्य | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हन समोर कोडं | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची आतषबाजी | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| 'गुणवान' सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनला धक्का | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सावधान! सीक्रेट सेव्हन | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत | प्रियंका कुलकर्णी | ८० |

## आपली सृष्टी

प्राचार्य डॉ. किशोर पवार/प्रा. सौ. नलिनी पवार

| | |
|---|---|
| जलसम्राट मासे | ११० |
| अजब सर्पसृष्टी | ११० |
| उभयचरांचे अनोखे विश्व | ११० |
| आकाशसम्राट पक्षी | ११० |
| पाणथळीतले पक्षी | ११० |
| मनोरंजक सस्तन प्राणी | ११० |
| डायनोसॉरचे अद्‌भुत विश्व | ११० |
| अनोखी मत्स्यसृष्टी | ११० |
| अनोखे सस्तन प्राणी | ११० |

| | | |
|---|---|---|
| सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग | | ११० |

## संस्कारक्षम कथा / कविता

| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | वि.स. खांडेकर | ४० |
| यज्ञकुंड | वि.स. खांडेकर | ४० |
| मध्यरात्र | वि.स. खांडेकर | ५० |
| घरटे | वि.स. खांडेकर | ४० |
| अस्थी | वि.स. खांडेकर | ४० |
| सैनिक हो...तुमच्यासाठी | आनंद यादव | ४० |

## हॅरी पॉटर मालिका

मूळ लेखिका : जे.के. रोलिंग

| | | |
|---|---|---|
| हॅरी पॉटर आणि परीस | बाळ उर्ध्वरेषे | १९५ |
| हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर | मंजूषा आमडेकर | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अझ्कबानचा कैदी | प्रियंका कुलकर्णी | २९५ |
| हॅरी पॉटर आणि अग्निचषक | मंजूषा आमडेकर | ३२५ |
| हॅरी पॉटर आणि फिनिक्ससेना | मंजूषा आमडेकर | ४९५ |
| हॅरी पॉटर आणि हाफ ब्लड प्रिन्स | मंजूषा आमडेकर | ३७५ |



❐

# ओळखा पाहू



## नवसाहित्याचे प्रभावशाली भाष्यकार आणि विद्यापीठात मराठीचे अध्यापक

विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट म्हणून पाठवण्यात येईल

आपली उत्तरे दिनांक १५ जून २०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल जुलै २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

## 'मार्च' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

संगणक क्षेत्रात क्रांती करणारा, आयफोन, आयट्यून्स आयपॅड यांचा संकल्पक - स्टीव्ह जॉब्ज

स्पर्धेचे विजेते - **अमेय गायकवाड - पुणे**

सविता माने, चैत्राली साठे, प्राजक्ता गाडे, सायली देगावकर, निलेश साबणे, साक्षी शितोळे - कोल्हापूर, समीर बारटक्के, मिनाक्षी चौगुले, सविता पाटील, रेणूका शिंदे, वैभव मारणे, सिताराम कांबळे, जाई सोनटक्के, सुमेधा पाटील, श्रेयसी धुमाळ, सारिका अवताडे - पुणे, अनिल क्षिरसागर, संदीप गायकवाड, तेजस मुळे, रामचंद्र सरनाईक, मुकुंद ढेकणे- यवतमाळ, गीता डोईफोडे - सांगली, मिनाक्षी कुलकर्णी, प्राजक्ता रासने, आरती धर्माधिकारी -अहमदनगर, संदिप कदम - उस्मानाबाद, किरण येवले, बाळासाहेब काळे - सातारा, सुधिर भिडे, रेवती नाशिककर - नाशिक, सागर मुळे, शिवमंगल चव्हाण - अमरावती,

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.







भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 May 2012

# Forthcoming

## Gayatri's Maths Mantra




Gayatri Lodha

Price Rs. - 95.00

This book explains simple techniques of basic mathematical calculations such as multiplication and division.

With the help of these techniques one can improve the speed of calculation as well as accuracy. It is possible to improve the scores in school as well as competitive examinations such as MPSC, UPSC, Scholarship, NDA, Maths Olympiad, other academic and professional exams by using the techniques explained in this book.

The author has learnt these techniques from a variety of books, periodicals, research work etc. She has learnt various techniques from her father. She has developed these techniques and explained them in very simple and lucid language in this book so that students as well as their parents will find it easy to understand. For solving the problems, it is necessary to use the conventional methods in examinations as stipulated by the examining authority but the answer obtained by conventional method can be cross checked using these techniques.

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______

______

______

______

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.